वर्ष : दुसरे

# समपथिक




समलिंगी, उभयलिंगी, द्विलिंगी
व तृतीयपंथी विषयावरचा
वार्षिक दिवाळी अंक २०२०

BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION

CIN: U85300PN2019NPL182601
A Section 8 Company under Companies Act, 2013

# समपथिक

१००४, बुधवार पेठ, ऑफिस नं.९, रामेश्वर मार्केट, पुणे ४११००२, महाराष्ट्र.

**दुसरा मराठी समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी विषयांवरचा**

**दिवाळी अंक–२०२०**

**दिनांक** : ऑक्टोबर २०२०, पुणे

**प्रकाशक :** बिंदू क्विअर राइट्स फाऊंडशेन
CIN: U85300PN2019NPL182601

**संपादक** : बिंदुमाधव खिरे

**Email** : bindumadhav.khire@gmail.com

**Contact** : 9763640480

**मुखपृष्ठ** : चंद्रशेखर बेगमपुरे

**मुद्रितशोधन** : अनुपमा पाठक

**मुद्रण** : चंद्रशेखर बेगमपुरे

**मूल्य** : १२० रुपये

● या दिवाळी अंकातील लेख, माहिती, कविता, कथा, नाटके यांचे सर्व हक्क त्या त्या लेखकांकडे आहेत. यातील कुठचाही मजकूर वापरावयाचा असल्यास लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

● या दिवाळी अंकातील लेख, माहिती, कविता, कथा, नाटके यातील मतांशी टिनेश चोपडे, संपादक–बिंदुमाधव खिरे, मुद्रक– चंद्रशेखर बेगमपुरे सहमत असतीलच असे नाही.

शुभदिपावली

## अनुक्रमणिका


| साहित्य | लेखक/कवी | पान क्र. |
|---|---|---|
| प्रस्तावना व आभार | | ४ |
| मुलाखत : लेखक, दिग्दर्शक : हितेश केवल्य (मुलाखतकार) : | सौरभ बोन्द्रे | ५ |
| चित्रपट समिक्षा : हलकाफुलका स्तुत्य प्रयत्न 'शुभ मंगल ज्यादा सावधान' | आदित्य सावंत | ९ |
| कविता : आठवणी चाफ्याच्या | निकेत देवकर | १२ |
| कविता : पुनवपूर | सॅमटन | १२ |
| श्रद्धांजली : विद्याताई बाळ | बिंदुमाधव खिरे | १३ |
| बुवाबाजीची भयानकता | प्रशांत एस. पोतदार (अं.नि.स.) | १४ |
| अनुभवकथन : अनोळखी माणुसपण | डॉ. हेमलता पिसाळ | १७ |
| श्रद्धांजली : लॅरी क्रॅमर | बिंदुमाधव खिरे | २० |
| आत्मकथन : एक विवाहित समलिंगी पुरुष | अनामिक | २२ |
| आमच्या घरावरील इंद्रधनुष्य (मराठी भाषांतर): | गोलनाज मलेक (इराण) सुरेश खोले | २७ |
| माहिती : परत एकदा सावधान !!! | बिंदुमाधव खिरे | ३३ |
| कविता : उभारणं | कुणाल धोंडगे | ३७ |
| कविता : सक्ती | संतोष उदमले | ३८ |
| लेख : माझं आदिवासी गाव | विजया वसावे | ३९ |
| अनुभवकथन : कोविडयोद्धा (मराठी भाषांतर): | अक्षय रामदास रौंधळ पुष्कर एकबोटे | ४२ |
| माहिती : तृतीयपंथियांच्या अधिकारांचा प्रवास | बिंदुमाधव खिरे | ४४ |
| लेख : प्रांजीपानी-खाजकुयलीच्या बिछान्यावर (मराठी भाषांतर): | विसाकेस चंद्रसेकरम् (श्रीलंका) पुष्कर एकबोटे | ४६ |
| कथा : तो मध्ये गुरफटलेली ती | योगश अंतरेष्वर नाईकवाडी | ५० |
| लेख : एल.जी.बी.टी. कथासूत्र ९०च्या दशकातील गाण्यातून | अनुज घाणेकर | ५३ |
| कथा : ती आणि ती | सॅमटन | ५५ |
| कथा : झुमका! झुमका! | सुरज राऊत | ६४ |
| एकांकिका : ताकाला जाऊन | बिंदुमाधव खिरे | ६७ |

| | | |
|---|---|---|
| कथा : लिपस्टिक | सिद्धांत | ७४ |
| कविता : बरसून जा | सोमनाथ बावणे | ७५ |
| कविता : मी असा का वागतो? | केतन राठोड | ७५ |
| तृतीयपंथीयांची जीवनशैली आणि करोना/कोव्हिड१९- एक धोक्याची घंटा | डॉ. हेमलता पिसाळ | ७६ |
| माहिती : स्पंदने ही समलिंगी (फेसबुकवरील खाजगी गट) | निखील समर्थ | ८१ |
| लेख : 'मुंबई प्राईड'- दशा आणि दिशा | सौरभ बोन्द्रे | ८३ |
| माहिती : कोव्हिड१९-लॉकडाऊन काळातील मदत | बिंदुमाधव खिरे | ८८ |
| प्रतिक्रिया : समलिंगी, तृतीयपंथी पात्र असलेल्या संवेदनशील जाहिराती | सूप्रसाद बारपांडे, सूरज पाटील सातारकर | ८९ |

## प्रस्तावना

२०१९ च्या दिवाळी अंकाला अनपेक्षित यश मिळालं. कितपत मागणी असेल हा प्रश्न मनात होता, म्हणून केवळ (१००) शंभरच प्रती छापल्या पण अजून मागणी असल्यामुळे परत कांही प्रती छापल्या. काही महिन्यांनंतर या दिवाळी अंकाची इ-एडिशन मोफत उपलब्ध केली, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला.

कोविड १९ चे सावट असल्यामुळे हा अंक काढतांना अनेक अडचणींना सामोर जावं लागलं आहे. तश्याही परिस्थितीत हा अंक काढायचाच हा अट्टहास धरुन हा प्रकल्प तडीस नेत आहे.

एक खेदाची गोष्ट नमूद केली पाहिजे - अनेक जणांना खूप लिहायचा उत्साह आहे पण लिहिण्याचा दर्जा म्हणावा तितका चांगला नाही; यावर्षी अनेकांनी दिलेले साहित्य नाईलाजाने नाकारावं लागलं आहे.

**आभार**

प्रदिप्ता रॉय व दिनेश चोपडे यांनी माझी व सौरभ बोन्द्रे यांची ओळख हितेश केवल्याशी (पटकथा लेखक व दिग्दर्शक -शुभ मंगल ज्यादा सावधान) करून दिली आणि सौरभ बोन्द्रेनी बरीच पूर्व तयारी करून हितेश केवल्याची मुलाखत घेतली.

ट्रान्सवुमन (तृतीयपंथी) विजया वसावे व तिचा भाऊ वसंत वसावे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतून त्यांच्या गावकडच्या समस्यांवर लेख लिहून पाठवला.

गोलनाझनी इराणमधील एल.जी.बी.टी.आय.क्यु. समुदायाची परिस्थिती दर्शवणाऱ्या इंग्रजीतून पाठवलेल्या लेखाचं मराठी भाषांतर सुरेश खोले यांनी केले. 'प्रांजीपानी खाजकुयलीच्या बिछान्यावर' हा चित्रपट बनवतांना विसाकेस चंद्रसेकरम् यांनी श्रीलंकेतून पाठवलेला इंग्रजीतील लेख व डॉ. अक्षय रौंधळ यांचे इंग्रजीतील आत्मकथन या लेखांचं मराठी भाषांतर पुष्कर एकबोटे यांनी केलं.

विद्याताई बाळ यांच्यावरील श्रद्धांजली लेख, 'मिळून साऱ्याजणी' च्या मार्च २०२० च्या अंकात छापून आला आहे. 'समपथिक' दिवाळी अंक २०२० च्या मासिकात हा लेख छापण्याची परवानगी दिल्याबद्दल डॉ. गिताली वि.म. यांचे मनापासून आभार.

चंद्रशेखर बेगमपुरे यांनी मुखपृष्ठ तयार केलं. मुद्रीतशोधन अनुपमा पाठक यांनी केलं. या सर्वांचे मनापासून आभार

**बिंदुमाधव खिरे,**

प्रकाशक आणि संचालक बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन पुणे

ऑक्टोबर २०२०



मुलाखत : हितेश केवल्य

आमच्या या आधीच्या 'शुभमंगल सावधान' च्या चित्रीकरणाआधीच आमचे एक निर्माते हिमांशु शर्मा यांची एक कल्पना होती की दोन पुरुषांची प्रेमकथा मांडायची. आणि हा विषय 'शुभमंगल सावधान' करता एक चांगला सिक्वेल ठरेल असं आम्हाला वाटलं. कारण दोन्ही चित्रपटांत असे विषय आहेत जे समाजात वर्ज्य मानले जातात.



सौरभ बोन्द्रे

# 'शुभ मंगल ज़्यादा सावधान'

**'शुभ मंगल ज़्यादा सावधान' या चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक हितेश केवल्य यांची ऑनलाइन मुलाखत**

**© मुलाखतकार : सौरभ बोन्द्रे**
संयोजक : बिंदू क्किअर राइट्स फाऊंडेशन, पुणे

मुलाखतकार सौरभ बोन्द्रे एक बहुभाषिक प्रशिक्षक असून अनेक भारतीय व परदेशी भाषांमध्ये तो लिपितज्ज्ञ म्हणून काम करतो. वाचन, संगीत, जलतरण, इ. त्याचे छंद आहेत.

**दिवस वेळ** – शुक्रवार दि. २९ मे २०२०, दुपारी १३.१५.
**माध्यम** : गूगल मीट (मुलाखतीचे दृश्यमुद्रण करता आले नाही).
संभाषणातील केवळ ठळक मुद्द्यांचेच प्रतिलेखन खाली केलेले आहे.
**ईमेल** : saurabhusbondre@gmail.com

**सौरभ:** इतका बोल्ड विषय हाताळताना बिचकलास का ? निर्माणगृहाकडून काही विरोध वगैरे अनुभवाला आला का?

**हितेश:** नाही. निर्माणगृहाला (Production House) माझ्या लिखाणाबद्दल खात्री होती. किंबहुना आमच्या या आधीच्या 'शुभमंगल सावधान' च्या चित्रीकरणा आधीच आमचे एक निर्माते, हिमांशु शर्मा यांची एक कल्पना होती की दोन पुरुषांची प्रेमकथा मांडायची. आणि हा विषय 'शुभमंगल सावधान' करता एक चांगला सिक्वेल ठरेल असं आम्हाला वाटलं. कारण दोन्ही चित्रपटांत असे विषय आहेत जे समाजात वर्ज्य मानले जातात.

२०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कलम ३७७ रद्द केल्यानंतर लैंगिकतेविषयी सर्वत्र चर्चा सुरू झाली आणि LGBT समुदायाचा एक समर्थक असल्याने मला वाटलं की आयुष्मान खुराणासारख्या एका अभिनेत्यासोबत अश्या विषयावर चित्रपट करण्याची ही योग्य वेळ आहे.

मी शिक्षण घेत असल्यापासून अनेक समैषी व्यक्तींशी माझी ओळख आणि मैत्री आहे. LGBT समाजाशी माझा चांगला संवाद आहे. आणि मला असं वाटत होतं की सर्वसामान्य माणसापर्यंत हा विचार न्यायला हवा. त्यामुळे हा चित्रपट करतांना माझ्या मनात भीतीपेक्षा जवाबदारीची भावना होती की एक डिज़ायनर, लेखक आणि दिग्दर्शक म्हणून सामान्य लोकांसमोर LGBT समाजाचं चित्रण योग्य आणि सकारात्मक व्हायला हवं आणि यातून एक चांगला संदेश सर्वच लोकांपर्यंत जायला हवा.

**सौरभ:** साधारणपणे क्वियर चित्रपट बनवताना रोमॅन्स, ट्रॅजेडी, अश्या काही सरधोपट थीम वापारल्या जातात. तू समैषी लग्नाचा विषय आणि त्यातही कौटुंबिक प्रसंगांतून घडणारं नाट्य आणि हास्य अशी कथा का दाखवलीस? शिवाय या चित्रपटाला 'शुभमंगल सावधान'चा सिक्वेल बनवण्यामागचा विचार काय होता?

**हितेश:** हां, हे दोन प्रश्न आहेत, तर मी दोन भागांत उत्तर देतो. एक म्हणजे, आपल्याकडच्या इतक्या मोठ्या सिनेमा इंडस्ट्रीत क्विअर व्यक्तिरेखा ज्या प्रमाणात आणि ज्या गांभीर्याने चित्रपटांत दिसायला पाहिजेत तितक्या त्या आतापर्यंत दिसलेल्या नाहीत. क्विअर व्यक्तींचं चित्रण करणारे उत्तम बॉलिवुड चित्रपट अक्षरशः हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. त्यामुळे अनेक भारतीय प्रेक्षकांना क्विअर व्यक्तींबद्दल काहीच माहीत नाही.

त्यातही क्विअर व्यक्तींना खऱ्या आयुष्यात जे काही भोगावं लागतं, त्यामुळे अनेकवेळा क्विअर कथा या खेदाच्या आणि दुःखाच्या असतात. मला अशी एक गोष्ट दाखवायची होती ज्यात क्विअर व्यक्तिरेखा आपलं अस्तित्व आणि आपल्या लैंगिकतेचा उत्सव साजरा करतायत आणि भारतीय समाजाचा विचार केला तर लग्न हा आपल्या आयुष्यांतला सगळ्यात मोठा उत्सव असतो.

शिवाय अनेक चित्रपटांत अनेकवेळा क्विअर किंवा शरीरिक व्यंग असलेल्या व्यक्तींवर विनोद केले जातात. मला या व्यक्तिरेखा नॉर्मल दाखवायच्या होत्या आणि समाजात असलेला जो क्विअरद्वेष आहे त्यावर विनोद करून तो कसा चुकीचा आहे हे दाखवायचं होतं. कुटुंबांतर्गत सुद्धा जो ढोंगीपणा असतो त्यावर मला भाष्य करायचं होतं.

दुसरी गोष्ट म्हणजे 'शुभमंगल सावधान'चा विषय एका लग्न होऊ घातलेल्या पुरुषाच्या लैंगिक समस्येचा होता. स्त्रियांच्या लैंगिकतेविषयी बरंच बोललं जातं पण पुरुषांच्या लैंगिकतेविषयी बोलताना समाजाला संकोच वाटतो. तर तो विषय समाजापुढे आणायचा हेतू पहिल्या चित्रपटात होता. या सिक्वेलमध्ये आता समैषितेचा विषय मी मांडत आहे. तर दोन्ही चित्रपटांतून त्याला विनोदाच्या अंगाने मांडल्यामुळे आता हळू हळू लोक त्याबद्दल बोलू लागलेत आणि या चर्चा हळू हळू नॉर्मल होऊ लागल्यात.

**सौरभ** : या विषयाबद्दल तुम्हाला काही विशेष अभ्यास किंवा तयारी करावी लागली का? काही लोकांशी बोलावं



लागलं का? तुम्ही काय काय संशोधन केलंत?

**हितेश:** होय. खूप अभ्यास आणि संशोधन केलं. दिग्दर्शक म्हणून माझा हा पहिलाच व्यावसायिक चित्रपट आहे. आणि तोही एका अश्या विषयावर ज्याला व्यावसायिकदृष्ट्या लोकप्रिय किंवा फायदेशीर मानलं जात नाही. शिवाय मी स्वतः क्विअर नाही. त्यामुळे मला क्विअर समुदाय किंवा सामान्य लोक प्रश्न विचारू शकतात. त्यामुळे, मी नेमकं काय लिहितोय आणि काय दाखवतोय याची मला सतत जाणीव होती. आणि क्विअर समुदायातला नसल्यामुळे मी याबाबत जास्त जागरूक होतो.

शिवाय माझे अनेक क्विअर मित्र असल्यामुळे त्यांनी सतत मला माझ्या कथेबाबत अभिप्राय दिले. अहमदाबादेतील NID (National Institute of Design) मधील प्राध्यापक प्रदीप्तो यांनी मला अगदी पहिल्यापासून खूप सपोर्ट केला. एक गोष्ट मात्र मी जाणीवपूर्वक केली, ती म्हणजे खूप जास्त क्विअर चित्रपट बघायचे टाळले. नाहीतर त्यांचा प्रभाव माझ्या विचारांवर झाला असता आणि मग मला जे आणि जसं मांडायचंय ते मी तसं मांडू शकलो नसतो. मला माझ्या पद्धतीने हा विषय मांडायचा होता. आणि मग ते करताना माझ्याकडून काही चुकलं असतं तर क्विअर समुदायाकडून टीकाही सहन करायची माझी तयारी होती. ती व्यावसायिक रिस्क मी घेतली. पण मला क्विअर समुदाय आणि इतरांकडूनही चांगला प्रतिसाद मिळाला आणि मी याबद्दल कृतज्ञ आहे.

**सौरभ:** ही कथा तर तू लिहिलीच होतीस, मग दिग्दर्शनही तूच करायचं कसं काय ठरलं ?

**हितेश:** मी पूर्वी अनेकदा लेखन-दिग्दर्शन केलंय. लघुपट, जाहिराती वगैरे केल्यात. पण हा विषय माझ्याकरता जिव्हाळ्याचा होता आणि मला असं वाटलं की ही मीच लिहीलेली कथा असल्यामुळे याच चित्रपटात मी माझी दिग्दर्शकीय कौशल्यं पडताळू शकतो आणि माझ्या निर्माणगृहालाही ते मान्य झालं.

शिवाय या विषयाला इतर कुणी हात घालायला फारसे उत्सुक असणार नाहीत हेही मला ठाऊक होतं. एखाद्या खूप मोठ्या प्रसिद्ध दिग्दर्शकाकडे गेलो असतो किंवा क्विअर समुदायातीलच एखाद्या दिग्दर्शकाकडे गेलो असतो तर चित्रपटाला एक प्रकारची मान्यता मिळाली असतीच, पण मग ती मान्यता मी स्वतःच का मिळवू नये असा विचार करून मीच दिग्दर्शन करायचं ठरवलं.

**सौरभ:** तू ही कथा लिहिताना जी कल्पना केली होतीस, प्रत्यक्ष चित्रपट तसाच बनला की काही अपेक्षेपेक्षा वेगळं झालं?

**हितेश:** मी नेहेमीच खूप तपशीलवार लिहितो. अगदी एकेका सेकंदाच्या फ्रेमचं वर्णन असतं. इतकं की काही इतर दिग्दर्शकांची माझ्याबद्दल अशी तक्रार आहे की हितेशच्या संहितेत आम्हाला काम करण्यासारखं काही नसतंच. पण तरीही माझ्या कथेत एखादा मुळातल्या लिखाणाहून चांगला बदल कुणी सुचवला तर तोही मला मान्य असतो. 'शुभमंगल ज़्यादा सावधान'चं लिखाण करताना, हा चित्रपट मी दिग्दर्शित करणारे हे लक्षात ठेवूनच मी लिहिला होता. त्यानंतर कलाकार, शेड्यूल, बजेट, इत्यादींमुळे काही अगदी किरकोळ बदल करावे लागले, पण एकुणात चित्रपट अगदी तंतोतंत माझ्या कल्पनेप्रमाणेच झालाय. शिवाय आमच्या चमूला आधीपासूनच साधारण याची कलात्मक भाषा आणि चित्रपटातील प्रत्यक्ष संवादांची भाषा काय असणारे हे ठाऊक होतं त्यामुळे ते पडद्यावर उतरवताना फारश्या अडचणी आल्या नाहीत.

**सौरभ:** या चित्रपटाचा तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यावर काय परिणाम झालाय?

**हितेश:** प्रचंड परिणाम झालाय. सगळ्यात पहिलं म्हणजे माझ्या मनात जे पूर्वग्रह होते त्यांचा मला कथा लिहिताना सामना करावा लागला आणि हळू-हळू मी ते दूर करत गेलो. शिवाय मी माणसांना त्यांच्या लैंगिक ओळखीपेक्षाही

इतर गुणांनी किंवा निव्वळ एक व्यक्ती म्हणून ओळखू लागलो. लैंगिकतेलाही एका साच्यातून न पाहता माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा एक नैसर्गिक आणि प्रवाही पैलू अश्या नजरेतून पाहू लागलोय. या गोष्टी आधीही माहीत होत्या, पण या चित्रपटामुळे मी त्या प्रत्यक्षात जगलो आणि अनुभवल्या.

माझ्या चमूतील इतर कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्याही बाबतीत हे घडलं. बनारसमध्ये चित्रीकरण करताना, विशेषतः चुंबनाचा सीन करताना, स्थानिक लोकांकडून काही तीव्र प्रतिक्रिया येण्याची भीती होती जराशी. पण प्रत्यक्षात तसं काही घडलं नाही. आमच्या सहकलाकार आणि तंत्रज्ञांनाही हळू-हळू त्याबद्दल मोकळेपणा वाटायला लागला.

**सौरभ:** एखादी उल्लेखनीय प्रतिक्रिया – प्रेक्षकांकडून म्हणा किंवा एखाद्या क्विअर व्यक्तीकडून म्हणा?

**हितेश:** खूप चांगल्या प्रतिक्रिया आल्या आहेत. रोज येतायत. क्विअर समुदायातून पण आणि इतर लोकांकडूनही. एकदा माझ्या कॉलेजातल्या एका ज्युनियर मित्राचा मला मेसेज आला की इतक्या वर्षांनी तो त्याच्या आई-बाबांना हा चित्रपट पाहायला घेऊन जाणारे. त्याच्या मित्रांकडे तो त्याच्या लैंगिकतेबद्दल व्यक्त झालाय पण घरच्यांना अजून सांगितलेलं नाहीये. ही प्रतिक्रिया माझ्यासाठी सगळ्यांत महत्त्वाची आहे. ज्या प्रकारच्या प्रतिक्रिया येतायत त्यांवरून आम्ही समाधानकारक काम केलंय या विचाराने खूप आनंद वाटतो.

**सौरभ:** भारतात जे महत्त्वाचे क्विअर चित्रपट आहेत त्यांत तुझ्या मते या चित्रपटाचं काय स्थान आहे?

**हितेश:** दीपा मेहतांचा 'फायर' मी पाहिलेला पहिला क्विअर चित्रपट. तो प्रदर्शित झाला तेव्हा सिनेमागृहं जाळली गेलेली मी पाहिल्येत. तेव्हापासून आजपर्यंत अनेक महत्त्वाच्या चित्रपटांनी आपापल्या परीने लैंगिकता या विषयाला आधीपेक्षा जास्त चर्चेत आणलंय आणि पुढच्या कलाकृतींसाठी एक अवकाश, एक संधी निर्माण केलेली आहे.

सामाजिक बदल कुठल्याही एका कृतीतून किंवा एका कलाकृतीतून घडत नाही. तो अनेक गोष्टींचा एकत्र परिणाम असतो आणि म्हणून आमचा चित्रपट हा क्विअर चळवळीला पुढे नेणाऱ्या अनेक मुख्य कलाकृतींपैकी आणि महत्वाच्या चित्रपटांपैकी एक आहे असं मी म्हणीन.

दुसरी गोष्ट अशी की हा चित्रपट एक व्यावसायिक चित्रपट म्हणून जास्तीत जास्त सामान्य लोकांपर्यंत चित्रपटगृहांद्वारे पोहोचावा अशी आमची इच्छा होती. त्यात आम्ही यशस्वी झालो असंही आम्हाला वाटतं. लोक हा चित्रपट पाहून परत जाताना चित्रपटाबद्दल आणि चित्रपटाच्या विषयाबद्दल चर्चा करतायत. आणि या चर्चा आता इथून पुढे कायम होत राहातील. हे सगळ्यांत महत्त्वाचं आहे.

**सौरभ:** छान. हितेश, खूप चांगल्या गप्पा झाल्या. तू खूप मनापासून बोललास असं जाणवतंय. तुमच्या आत्तापर्यंत अनेक मुलाखती झाल्यात. पण त्यातल्या बहुतेक मुलाखती मीडिया किंवा सोशल मीडियाच्या होत्या. मी एक चळवळीतला कार्यकर्ता असल्याने ही मुलाखत जराशी निराळी झाली. मला तुझ्याकडून बरंच नवीन समजलं आणि शिकायला मिळालं. इथून पुढे अश्या संधी पुन्हा पुन्हा येतील अशी आशा करूया. तू दिलेल्या वेळाबद्दल तुझे आभार! आणि तुझ्या पुढील वाटचालीकरता शुभेच्छा!

**हितेश:** अर्थातच, इतर मुलाखतींपेक्षा या मुलाखतीचं महत्त्व वेगळं आहे. प्रत्यक्ष चळवळीतल्या व्यक्तीकडून प्रतिसाद मिळणं खूप महत्त्वाचं आहे. त्याकरता तुमचेही आभार!

# ‘शुभ मंगल ज़्यादा सावधान’

## हलकाफुलका स्तुत्य प्रयत्न

**चित्रपट समीक्षा: © आदित्य सावंत**

**एलजीबीटी समुदायाच्या प्रश्नांना जर सिनेमाच्या मुख्य प्रवाहात आणायचं, तर ‘शुभ मंगल ज्यादा सावधान’सारख्या चित्रपटांची गरज आहे. आमचे प्रश्न वेगळे, आमचा समाज वेगळा, आमचे चित्रपट वेगळे, हा हेका एलजीबीटी समुदायातील लोकांनी सोडला आणि अशा हलक्याफुलक्या प्रयत्नांचं स्वागत केलं, तर एक दिवस नक्कीच प्रेमकथा लिंगभावरहित होतील, यात शंका नाही.**

हितेश केवल्यचा ‘शुभ मंगल ज्यादा सावधान’ प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याची चर्चा सुरू झाली. समलैंगिकतेवर भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचा ॲनिमेटेड टीझर प्रदर्शित झाला, तेव्हाच हे काहीतरी वेगळं असणार आहे, याची कल्पना आली होती. मात्र चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मिश्र प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. मला स्वत:ला हा चित्रपट त्यातल्या अनेक गोष्टी खटकूनही आवडला. मात्र एलजीबीटी समुदायातल्या माझ्या बऱ्याच मित्रमैत्रिणींचं मत असं पडलं, की एका संवेदनशील विषयाला विनोदाची फोडणी देण्याच्या मोहापायी विषयाचं गांभीर्य कमी झालेलं आहे. दोन्ही बाजू समजून घेतांना ज्या गोष्टी जाणवल्या, त्या मांडण्याचा हा प्रयत्न.

अमन त्रिपाठी आणि कार्तिक सिंग एकमेकांच्या प्रेमात आहेत. अमनच्या चुलतबहिणीचं – गॉगलचं – लग्न ठरलं आहे. त्यासाठी अमनच्या घरची मंडळी त्याला घरी बोलावत आहेत. मात्र घरी गेल्यावर आपल्या लग्नाचा विषय निघेल, म्हणून अमन ते टाळतो आहे. कार्तिक त्याला आग्रह करतो आणि त्याच्यासह तोही अमनच्या घरी जातो. अमनचे वडील शंकर त्रिपाठी अमन आणि कार्तिकला रेल्वेत एकमेकांचं चुंबन घेताना पाहतात आणि अस्वस्थ होतात. पुढे गॉगलच्या लग्नाच्या दिवशी अमनची लैंगिकता त्रिपाठी कुटुंबासह इतरांनाही कळते आणि गॉगलचं लग्न मोडतं. अपेक्षेप्रमाणेच चित्रपटाची कथा पुढे सरकत जाते, अमनचे आईवडील त्याच्या वेगळ्या लैंगिकतेचा आणि कार्तिकबरोबरच्या त्याच्या नात्याचा स्वीकार करतात आणि शेवट गोड होतो.

चित्रपटात अनेक उपकथानकं आहेत. एकत्र कुटुंबपध्दतीवर केलेलं भाष्य आहे. लग्न मोडल्यावर आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या गॉगलचं, अमन आणि कार्तिकच्या प्रेमाला समजून घेणं आणि पुढे स्वत:चा स्वीकार करणं, हे महत्त्वाचं उपकथानक. मात्र त्याचबरोबर, अमनच्या आईवडिलांचं – शंकर आणि सुनयना त्रिपाठी यांचं जगणं, शंकरचा भाऊ चमन आणि त्याची पत्नी चंपा यांचं आयुष्य, दोन्ही भावांचे आणि त्यांच्या बायकांचे परस्परांशी असलेले नातेसंबंध, कुसुमने अमनच्या लग्नात स्वत:चा स्वार्थ शोधणं, अशा अनेक गोष्टी सोबत येतात. या सगळ्या उपकथानकांमध्ये एक समान सूर दिसतो, तो सामाजिक बंधनांत अडकल्यामुळे व्यक्त होऊ न शकलेल्या प्रेमाचा. या उपकथानकांमुळे मुख्य कथानकाला अधिक बळकटी मिळाली आहे.

अमन जेव्हा आईला विचारतो, ‘आपका प्यार ऑक्सिटोसिन और हमारा प्यार गुनाह?’ तेव्हा अमनचं दु:ख अधोरेखित होतं. त्याच वेळी शेवटाकडे येताना

अमनची आई म्हणते की, एका बाजूला नवरा आहे, जो काही ऐकून घ्यायला तयार नाही आणि दुसऱ्या बाजूला मुलगा, जो अपेक्षा करतोय की त्याचं वेगळेपण आम्ही एका रात्रीत समजून घ्यावं. या प्रसंगात एका विचित्र पेचात अडकलेल्या आईची अगतिकताही दिसते. या अशा प्रसंगांमुळे चित्रपट कुठेही एकांगी होत नाही. अमनचे काका चमन त्रिपाठी वकिलीवरून ऐकाव्या लागणाऱ्या टोमण्यांना वैतागले असले, तरी अमन आणि कार्तिकला पोलीस न्यायला येतात, तेव्हा ते सगळा राग विसरून अमन आणि कार्तिकच्या बाजूने खंबीरपणे उभे राहतात. चित्रपटात एकमेकांवर तोंडसुख घेणारे नातेवाईक असले, तरी प्रेमाचा एकच धागा त्यांना एकमेकांशी घट्ट बांधून ठेवतोय. त्रिपाठींच्या कुटुंबातली पात्रं वरवर खलनायकी वाटत असली, तरी मनाने अतिशय साधीभोळी आहेत. निरागस आहेत. त्यामुळेच काही ठिकाणी चित्रपट मेलोड्रामाकडे झुकत असला, तरी त्यातली पात्रं खरीखुरी हाडामांसाची माणसंच वाटतात.

चित्रपटातील एका दृश्यात अमनचे वडील कार्तिकला एका मोठ्या दंडुक्याने फटकावून काढत असतात. एका क्षणी तो दांडा त्यांच्या हातातून खाली पडतो. कार्तिक तो उचलून परत त्यांच्या हातात देतो आणि ते परत त्याला झोडपू लागतात. अमनला ते पाहवत नाही आणि तो गच्चीवर जाऊन स्वतःला एका खोलीत बंद करून घेतो. स्लो मोशनमध्ये येणाऱ्या या मारामारीच्या दृश्याच्या पार्श्वभूमीवर 'क्या करते थे साजना' या गाण्याचं रिमिक्स वाजतं. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या दोन व्यक्तींच्या प्रेमाला कुटुंबाकडून होणारा विरोध हा ट्रॅक हिंदी चित्रपटांसाठी नवीन नाही. त्यात रडारडही ठरलेली. पण इथे दिग्दर्शक ते पडद्यावर दाखवताना विखारी विनोदाचा आधार घेतो. कुणीतरी आपल्या प्रियकराच्या प्रेमाखातर त्याच्या बापाकडून मार खातोय, त्याच्या अंगावर वळ उठतायत तरी तो उलटून वार न करता सगळं सहन करतोय आणि थेटरातलं पब्लिक हसतंय, यातूनच समलैंगिकतेकडे आजचा समाज कसा पाहतो, हे स्पष्ट होतं. कार्तिकला 'आपण प्रेमाने जग जिंकू' हा विश्वास आहे, म्हणूनच तो मार सहन करतोय. एक दशक गाजवलेल्या, हाणामारी करून मुलीच्या वडिलांच्या मनात स्वत:ची प्रतिमा तयार करणाऱ्या सगळ्या नायकांचा स्टिरिओटाईप दिग्दर्शकाने या प्रसंगातून मोडीत काढला आहे.

रुपकांचा बऱ्याच ठिकाणी केलेला वापर खटकतो. सुरुवातीच्या दृश्यात कार्तिक आणि अमन जी 'विवाह एक्सप्रेस' पकडण्यासाठी धावत असतात, त्या रेल्वेचा क्रमांक '०३७७' आहे. ही मुद्दाम केलेली योजना वाटते. शंकर त्रिपाठीने केलेली काळ्या कोबीची शेती सडक्या मानसिकतेचं प्रतीक म्हणून चित्रपटात येते. सगळ्या कोबीमध्ये किडे आहेत, याकडे दुर्लक्ष करून सगळं चांगलच चाललंय, अशी स्वत:ची समजूत काढत जगणारे शंकर त्रिपाठी शेवटी कोबीची होळी करतात, हा प्रसंग उत्तम जमला आहे. मात्र काळ्या कोबीचं हे रुपक चित्रपटात सहजपणे, कथेच्या अनुषंगाने आल्यासारखं न वाटता उगाच समलैंगिकता नैसर्गिक असल्याचा मुद्दा ठासून सांगण्यासाठी वापरल्यासारखं वाटतं. कार्तिक रेल्वे प्लॅटफॉर्मवरच्या एका कुटुंबाला 'जॅक अँड जिल'ऐवजी 'जॅक अँड जॉनी'ही असू शकतं, हे प्रचारकी थाटात सांगतो, तो प्रसंग तर पुरता बेगडी वाटतो. चित्रपटातल्या अशा त्रुटींचा स्वीकार करूनही चित्रपट मनोरंजन करण्यात यशस्वी ठरतो, हे नक्की.

जितेंद्र कुमारने या चित्रपटाद्वारे चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं असलं, तरी तो कुठेही नवखा वाटत नाही. अनेक वेबसीरिजमधून स्वत:ची दखल प्रेक्षकांना घ्यायला लावणाऱ्या जितूने या चित्रपटात संयत अभिनयाचा वस्तुपाठ घालून दिला आहे. कुटुंबाच्या विरोधात जायला घाबरणाऱ्या हळव्या, परंतु आपल्या जोडीदारावर प्रेम करणाऱ्या अमनच्या भूमिकेत तो चपखल बसतो. आयुष्मान खुराणाचा कार्तिक मात्र काही ठिकाणी अतिउत्साही वाटतो. गजराज राव, नीना गुप्ता, मानवी गागरु, सुनीता राजवर, मनु रिषी या सर्वच कलाकारांनी रंगत आणली आहे. पंखुरी अवस्थीने साकारलेली कुसुमही नेटकी. अगदी लहानशा भूमिकेतील भूमी पेडणेकरही भाव खाऊन जाते.




राहता राहिला प्रश्न विषयाचं गांभीर्य कमी होण्याचा. हा खरं तर एक वेगळ्या चर्चेचा विषय होऊ शकतो, पण मला जे जाणवलं, ते मांडतो. दिग्दर्शक अगदी पहिल्या फ्रेमपासूनच चित्रपट निखळ मनोरंजक अंगाने जाणार आहे, हे स्पष्ट करतो. आपण स्वत:च्या मनातला एक चित्रपट घेऊन चित्रपटगृहात जाणार असू, तर दिग्दर्शकाने दाखवलेला चित्रपट आपल्याला पाहताच येणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, गेल्या वर्षी मेनस्ट्रीम चित्रपटांमध्ये याच विषयावर भाष्य करणारा एक सुंदर चित्रपट आला होता, 'एक लड़की को देखा तो ऐसा लगा' नावाचा. त्यात गंभीर भाष्य असूनही तो गाजला नाही. एलजीबीटी चित्रपट महोत्सवांत एलजीबीटी समुदायाच्या समस्या संवेदनशीलतेने आणि गांभीर्याने मांडणारे अनेक चित्रपट असतात. या महोत्सवांना सो कॉल्ड स्ट्रेट समाजातले किती लोक जातात, ही विचार करण्यासारखी बाब आहे.

एलजीबीटी समुदायाच्या प्रश्नांना जर सिनेमाच्या मुख्य प्रवाहात आणायचं, तर 'शुभ मंगल ज्यादा सावधान'सारख्या चित्रपटांची गरज आहे. आमचे प्रश्न वेगळे, आमचा समाज वेगळा, आमचे चित्रपट वेगळे, हा हेका एलजीबीटी समुदायातील लोकांनी सोडला आणि अशा हलक्याफुलक्या प्रयत्नांचं स्वागत केलं, तर एक दिवस नक्कीच प्रेमकथा लिंगभावरहित होतील, यात शंका नाही. असे चित्रपट जेव्हा 'डीडीएलजे'सारख्या गाजलेल्या प्रेमकथांचा आधार घेऊन मोडक्यातोडक्या शब्दांत काही सांगू पाहतात, तेव्हाच प्रेक्षकांनी 'तुमचं आमचं सेम असतं'च्या दिशेने वाटचाल करायला निदान सुरुवात तरी केलेली असते.

# कविता

## आठवणी चाफ्याच्या

**© निकेत रवींद्र देवकर**
मेकॅनिकल इंजिनीयर. वाचन व लिखाणाची आवड.
**ईमेल :** niketdevkar21@gmail.com

वा! रे प्राजक्ता तुझ्या
गंधाचा हा पसारा,
माझ्याच चाफ्यास तू
उगा का बिलगावे ?

सावळीशी आर्तता
अन सावळीशी ओढ ती,
रे पुन्हा झाली कशी
कोमेजून ती कोवळी ?

आठवणी त्या आंधळ्या
अन पांगळ्या त्या भावना,
गुंफण्या अधीर व्हावे
कुंचल्याने त्या आज का ?

ते तुझे अन हे माझे
तेच ते आकाश ना ,
तोडण्या कुणी झुरावे
काळजाचे पाश त्या?

हीच माझ्या आठवांची
अधुरी रे कहाणी,
वाटेत तुझ्या आजही
का तो गुलाब एकटा होता ?

## पुनवपूर


**© सॅमटन**
सॅमटन हि ४४ वर्षांची पुण्यातील अभिमानी लेस्बियन आहे. ती 'व्हॉइस ट्रेनर' व डबींग आर्टिस्ट म्हणून काम करते.

तुझ्याचसाठी हा सारा प्रयास
तुझ्याचसाठी हा शब्दांचा प्रवास
तुझ्यापुढे व्यर्थ, अर्थांचे गाभारे
खोल खोल गहिरे तुझेच अस्तित्व सारे

किती लावसी जीवास हा घोर
तुझ्या स्पर्श पारिजातकांचा अबोल मोहोर
नि:शब्द मी, नि:स्तब्ध मी, भावविभोर
बरसूदे आतातरी, अव्यक्ताचे चांदणे टिपूर

डोळ्यात तुझ्या उमटले सारे ओळखीचे सूर
तुझे–माझे वाहून गेले, फक्त उरला पुनवपूर

## !! श्रद्धांजली !!



# विद्याताई बाळ

**सामाजिक  कार्यकर्त्या, स्त्रीवादी मराठी लेखिका व 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या संपादिका**

जन्म: जानेवारी १२, १९३७; मृत्यू: जानेवारी ३०, २०२०

''अरे बिंदू खरं सांगू का... मला या विषयातलं काहीच कळत नाही. पूर्वी आमच्याकडे एक मुलगा आला होता. म्हणाला, की मी समलिंगी आहे. खूप बोलला. रडून रडून बोलला. त्याची वेदना आम्हाला कळत होती, जाणवत होती. पण काय करायचं हेच कळत नव्हतं. कारण या विषयाची आम्हाला खरंच काही माहिती नव्हती.'' विद्याताई प्रांजळपणे म्हणाल्या.

विद्याताई आणि मी, नयनताई (कुलकर्णी) यांच्या कडे बसलो होतो. विद्याताई आणि माझी गाठ नयनताई व उज्ज्वला मेहेंदळे यांच्यामुळे झाली. पुढे म्हणाल्या की 'तू म्हणतोयस की तू समलिंगी आहेस व या समाजासाठी तू काम करायला लागला आहेस तर तू एकदा घरी ये व मला हा विषय समजून सांग.'

हा पंधरा-सतरा वर्षां पूर्वीचा काळ. समलिंगी स्त्रिया/पुरुष, उभयलिंगी स्त्रिया/पुरुष, तृतीयपंथी व द्विलिंगी समाजाबद्दल कधी बोललं जात नव्हतं. त्या काळी या विषयाची मांडणी करायला कोणी आयुष्यमान खुराणा सारखा धीट हिरो सिनेमात नव्हता. मराठी माध्यमे या विषयावर बोलत नव्हती. आमच्या समाजावर उघडपणे भेद भाव होत होता. ३७७ कलम, प्रौढांमधील संमतीने केलेल्या समलिंगी संभोगाला गुन्हा ठरवत होतं . या अशा काळात विद्याताईंनी मला घरी बोलावलं व हा विषय शांतपणे समजून घेतला. म्हणाल्या, 'विषय पटोत वा ना पटोत, सगळ्या तुझ्या विचारांशी मी सहमत असेनंच असं नाही, पण निदान पहिल्यांदा विषय समजून तर घेऊ देत.' माझं सर्व बोलणं ऐकल्यावर अनेक प्रश्न व शंका विचारल्या आणि मग म्हणाल्या, 'तू तुझ्या या प्रवासाबद्दल आमच्या मासिकात लिहिशील?' मी लगेच हो म्हणालो कारण, तेंव्हा आम्ही नॉर्मल आहोत, आम्ही आजारी नाही, विकृत नाही, अनैसर्गिक नाही, आमचं प्रेम भिन्नलिंगी प्रेमाइतकच नैसर्गिक व शुद्ध आहे अशी भूमिका मांडायला फारशी व्यासपीठे उपलब्ध नव्हती.

समाजानी ठरवून दिलेल्या चौकटीबाहेरील विषय सुद्धा त्यांनी ज्या सहजपणे व प्रगल्भतेने समजून घेतला याचं मला आजही कौतुक वाटतं. कारण आजही हा विषय समजून घ्यायला तयार असेलेली फार थोडी मंडळी आढळतात.

पुढे एकदा त्या आमच्या कार्यक्रमाला आल्या व विविध समलिंगी व तृतीयपंथी मुला-मुलींची  वेदनामय आत्मकथने ऐकून एकदम भारावून म्हणाल्या, 'मला तुम्हा सर्वांची आई व्हायला आवडेल.'

आमच्या हक्कांच्या लढाईला त्यांचा पाठिंबा मिळत राहिला व २०१८ च्या पुण्याच्या वार्षिक समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी व द्विलिंगी  पदयात्रेत त्या व मनीषा गुप्ते ताई, साधना दधीच ताई, गीताली ताई व तथापि ट्रस्ट चे अच्युत बोरगावकर यांना आम्ही ग्रँड मार्शल म्हणून निमंत्रण दिले. या सर्वांनी स्त्रीवादी चळवळीला व लैंगिक अल्पसंख्याक समाजाच्या चळवळीला एवढा मोठा हातभार लावला आहे, की यांचे ऋण मानावे तेवढे थोडे आहेत. तब्बेत ठीक नसतानाही विद्याताई आल्या व थोडा वेळ चालल्या. नंतर मासिकात या अनुभवावर त्यांनी एक सुंदर लेख लिहिला.

शेवटी एवढं  म्हणीन की एकदा  त्यांनी 'नारी समता मंचात' या विषयावर माझं सत्र ठेवलं होतं व शेवटी ओंजळ भर मोगरा मला दिला  होता. त्याचा वास कायम माझ्या आयुष्यात दरवळत राहील.

**बिंदुमाधव खिरे**

*लेख पुनरप्रकाशित.'मिळून साऱ्याजणी' (मार्च २०२०) मासिकाच्या सौजन्याने.



प्रशांत एस. पोतदार

**चमत्काराशी जोडलेल्या या बुवाबाजीसोबत संघर्ष करणे तुलनेने सोपे असते. आणि असे अनेक संघर्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने गेल्या ३० वर्षात आव्हानाच्या रूपाने तर कधी संघर्ष करून केलेले आहेत. असे चमत्कार राज्य घटनेतील वैज्ञानिक दृष्टीकोनाशी विसंगत ठरतात. उघडपणे शोषण व फसवणूक करणाऱ्या अघोरी व अनिष्ट प्रथांच्या विरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १८ वर्षांचा प्रदीर्घ लढा दिला.**

# बुवाबाजीची भयानकता

## अंनिसचा बुवाबाजी विरुद्धचे कृतीशील प्रबोधन आणि संघर्ष.


**© प्रशांत एस. पोतदार**

सामाजिक कार्यकर्ता, राज्य प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा.

**ईमेल:** prashantspotdar@gmail.com


ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनी म्हणती साधू ।
अंगा लाऊनिया राख । डोळे झाकून करिती पाप ।
दाऊन वैराग्याच्या कळा । भोगी विषयाचा सोहळा ।
तुका म्हणे सांगू किती ।जळो तयांची संगती ।

असा रोख ठोक संदेश देणारे संत तुकोबाराय यांच्या विचारांना कृतीशीलतेची जोड देत, बुवाबाजी विरूद्धचा संघर्ष हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चळवळीचा नेहमीच आकर्षण बिन्दू राहिला आहे .मात्र बुवाबाजी या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे. कथित बुवा–बाबा, स्वामी, महाराज, मांत्रिक, देवऋषी, काही स्वतःला आध्यात्मिक दैवी शक्ति प्राप्त आहे, असे सांगणारे अध्यात्मिक बुवा–बाबा असे सर्वजण छुपेपणाने व खुलेपणाने प्रसार करत जनतेची मानसिक, आर्थिक व शारीरिक फसवणूक, दिशाभूल करण्याचा धंदा करत असतात. प्रत्येकाची कार्यपद्धती वेगवेगळी असते एवढेच .

भूत उतरवणारा भगत, करणी काढणारा मांत्रिक, हातातील कुंकवाचा बुक्का करणारी, अंगात देवी आलेली बाई, शरीरात नसलेली कुंडली जागृत करणारी माता आणि स्वतःला चमत्काराचा अवतार म्हणवून घेणारा एखादा बाबा हे सगळे आपापल्या पातळीवर बुवाबाजीच करीत असतात. असे चमत्कार, घटनेतील वैज्ञानिक दृष्टीकोनाशी विसंगत ठरतात.

उघडपणे शोषण व फसवणूक करणाऱ्या अघोरी व अनिष्ट प्रथांच्या विरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिलेल्या १८ वर्षाच्या प्रदीर्घ लढयामुळे, अघोरी व अनिष्ट प्रथा यांच्या संदर्भात स्पेशल असा, 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश २०१३' हा कायदा महाराष्ट्रात लागू झाला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील, शाखांच्या कार्यकर्त्यांच्या संघटित कामाच्या प्रभावामुळे आजपर्यन्त ६०० च्या वर सर्व जाती धर्मातील भोंदूंवर गुन्हे दाखल झाले. या कायद्या अंतर्गत पहिला गुन्हा हा, नांदेड जिल्ह्यात मुस्लिम बाबावर दाखल झाला. यामुळे हा कायदा केवळ हिंदू धर्मियांसाठी व त्यांच्या विरोधी आहे हा खोडसाळ आरोप निकामी ठरला.या कायद्यांन्वये पहिला ऐतिहासिक निकालही भंडारा जिल्ह्यात १२ फेब्रुवारी २०१५ रोजी लागला. त्यानुसार भोंदू बाबाला पाच वर्षे सक्तमजूरी व ५० हजार रुपये दंडही झाला. या दोन्ही घटना या कायद्याचं

महत्व अधोरेखित करतात.यामुळे ही लढाई थोडी सोपी झाली. पण अशा स्वरूपाचा कायदा नसतानाही उपलब्ध तोकड्या कायद्यांन्वये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने अनेक वर्षे हा संघर्ष केला, हे वास्तव आहेच.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामधील वहागाव या गावातील आतिश संभाजी पाटील (गुरुआई) वय ४० या तृतीयपंथीयाने, जादूटोणा करून लोकांच्या समस्या सोडवण्याचा धंदाच जोमात सुरु केला होता. याबाबतची लेखी तक्रार अंधश्रद्धा निर्मूलन समिती सातारा शाखेकडे, पिडीत असलेले तक्रारदार सुभाष जगन्नाथ यादव वय ४५, व्यवसाय- नोकरी, राहणार- कोर्टी, ता. कराड, जि. सातारा यांनी दिली होती. तक्रारीमध्ये त्यांनी स्वतःला गुरुआई म्हणून घेणाऱ्या तृतीयपंथीय आतिश संभाजी पाटील, याने घरी येऊन तुझ्यावर कोणीतरी करणी केली आहे, असे सांगून नारळ आपोपाप पेटवून चमत्कार करून दाखवला. तुमच्या घरातील सर्व ईडा-पीडा जाण्यासाठी वेळोवेळी पैश्यांची मागणी केली, मागणी प्रमाणे घाबरून जाऊन सुभाष यादव यांनी एकूण २४ हजार रुपये रोख दिले. तरीही आणखी पैश्यांची मागणी केली. आणखी पैसे देत नसल्याचे पाहून मोठमोठ्याने आरडा ओरडा करून भीती दाखवण्याजोगे हावभाव करून, 'तुला आता माझ्या देवाकडून सुट्टी देणार नाही. तुला दाखवते, तुझी करणी तुझ्यावरच उलटवते, तुझे नाका-तोंडातून रक्त बाहेर काढते, तुझे मुला-बाळांचा संसार उध्वस्त करते, तुला माझे सारखे बनवून टाळया वाजविण्यास लावते.' असे म्हणून भीती दाखविली.

वरील तक्रारीतील वस्तुस्थितीची खात्री, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सातारा व कराड शाखेच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष तक्रारदार सुभाष यादव यांच्या घरी जाऊन केली. घडलेल्या सर्व बाबी या जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा ठरत असल्याने याबाबतची कायदेशीर लेखी तक्रार देण्यास आम्ही पीडितांना सांगितले. यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती तुम्हाला पूर्ण सहकार्य करेल असा विश्वास त्यांना दिला. या नंतर त्यांचे मनोधैर्य वाढले व ९ फेब्रुवारी २०१६ रोजी उंब्रज- कराड, जि. सातारा येथील पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्याचे ठरले.

ठरल्याप्रमाणे पुण्याहून जिल्हा कार्याध्यक्ष नंदिनी जाधव, सातारचे बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह भगवान रणदिवे, कराडचे सीताराम चाळके, मारुती थोरात, मल्हारपेठ शाखेचे दादा पवार, तळबीडच्या शालिनीताई वाघमारे, व मी स्वतः असे आम्ही सर्वजण सकाळी १० वाजता उंब्रज पोलीस स्टेशन मध्ये पोहोचलो. तक्रारदारही तेथे आले होतेच, उंब्रज पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक मा.विद्या चव्हाण यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तक्रारीचे गांभीर्य ओळखून त्या स्वतः या भोंदूवर कारवाई करण्यासाठी त्यांच्या टीमसह आल्या. अंनिस कार्यकर्ते व पोलीस टीम हे एकत्रितपणे मौजे- वहागाव, ता.कराड हद्दीतील, राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या पश्चिमेला असणाऱ्या टेकडीवरील, झोपडपट्टी येथे वास्तव्यास असलेल्या 'गुरुआई' च्या घरी पोहोचले.

बाहेरून अत्यंत साधे दिसणारे घर, आत गेल्यानंतर मात्र सर्व अलिशान अशा सुख वस्तूंनी भरगच्च भरल्याचे पाहून आम्ही सर्वजण थक्क झालो. घरामध्ये गुरुआईची साथीदार बसली होती. तिच्याकडे गुरुआई विषयी चौकशी केली असता 'गुरुआई आत्ताच बाहेर गेली आहे' असे उत्तर मिळाले. ताबडतोब दोन पोलीस व काही कार्यकर्ते हायवे पर्यंत पाहण्यास गेले असता, जीप गाडी मधून बसून गुरुआई पळून जाण्याच्या बेतात असताना पोलिसांनी जीप गाडी थांबवली व गुरुआईला खाली उतरवले आणि सरळ तिच्या घरी आणले. घरी आणल्या नंतर मात्र गुरुआईला अक्षरशः घाम फुटला. पोलीस इन्स्पेक्टर व कार्यकर्त्यांनी प्रश्नांचा भडीमार करताच 'मी असे काही जादूटोण्याचे प्रकार करत नाही व कोणाचीही मी फसवणूक केली नाही' असा हात जोडून सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. पोलीसांनी थोडा पोलिसी खाक्यातील आवाज काढताच मात्र परत हात जोडून 'माझी काही चूक झाली असेल तर मला माफ करा, पण मला पोलीस स्टेशनला घेऊन जाऊ नका' अशी विनवणी सुरु केली.

'माझ्यावर जर गुन्हा दाखल झाला आणि मला अटक झाली तर आमच्या समाजातील मोठ्या गुरुआई मला माफ करणार नाहीत व कायमचे समाजातून काढून टाकतील.'

गुरुआईचे सर्व ऐकून घेतल्यानंतर पोलीस इन्स्पेक्टर म्हणाल्या, 'आपल्या विरुद्ध जादूटोण्याची भीती दाखवून आर्थिक व मानसिक फसवणूक केल्याची गंभीर लेखी तक्रार आलेली आहे. त्यानुसार आपण कायद्याने गुन्हा केला आहे,त्यामुळे आपणास पोलीस स्टेशनला यावे लागेल.' यानंतरही 'मला माफ करा मी असे काहीही केलेले नाही' असा सूर सतत येत राहिला. त्यावेळी मात्र पोलिसांनी 'आम्ही तुम्हाला याच ठिकाणी अटक केली आहे. आता मुकाट्याने आमच्याबरोबर चला!' असे म्हणताच गुरुआईला घेऊन आम्ही सर्वजण पोलीस स्टेशन मध्ये पोहोचलो.

सुभाष जगन्नाथ यादव यांच्या आलेल्या तक्रारी प्रमाणे एफ.आय.आर. नोंदवण्याचे काम सुरु झाले.'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश २०१३, कलम ३सह अनुसूची २ व ५, तसेच भारतीय दंडविधान संहिता कलम ५०६' अन्वये, गुन्हा दाखल करण्यात आला. सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत हि सगळी प्रक्रिया पूर्ण झाली.

ही केस कोर्टात प्रत्यक्ष उभी राहीलच. जेव्हा केव्हा उभी राहील तेव्हा कोर्टाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईलच. कोणतीही बुवाबाजी ही विशिष्ठ धर्म, जात अथवा लिंग यामध्ये अडकलेली नसते. तर बुवाबाजी ही सर्व जाती धर्म, लिंग यामध्ये चालू असते हे गुरुआईच्या प्रकरणावरून पुढे आले आहे.

स्वत:च्या जीवनात येणाऱ्या अडचणींवर कोणतेही जादुटोण्याचे प्रकार उपयोगी ठरत नसतात. अशा भ्रामक गोष्टींकडे समाजातील लोकांनी जाऊन आपला वेळ, पैसा व बुद्धी वाया घालवू नये असेच आवाहन या निमित्ताने करावे वाटते. अशा फसवणूक करणाऱ्या प्रकारांच्या बाबतीत जनतेने पोलीस प्रशासन अथवा अंनिसची जरूर मदत घ्यावी.

शेवटी मंगेश पाडगावकर यांच्या बुवाशक्ती निरूपण यामधील काही ओळी समाजाचं अचूक वर्णन करतात त्या अशा,



गुरुआई वर फौजदारी कारवाई

माणसे खपाट खंगलेली, आतून आतून भंगलेली
अदृश्य दहशतीने तंगलेली... आधार नाही ,,,
प्रत्येकास येथे हवा, कोणीतरी जबरी बुवा
जो काढील साऱ्या उवा , मनातील चिंतेच्या
आधी म्हणायचे जय साई , मगचि अधिकारी लाच खाई
अजून पकडला गेला नाही, कृपा मानी बाबांची
आपण शोधायचे नाही, आपण लढाईचे नाही
आपण भिडायचे नाही आयुष्याला.....
कणा झिजून गेला पार, शिरजोरी पुढे सर्व लाचार ...
बुवा नाम जपाचा उच्चार ... नशा देई .....

या काव्यात दर्शवलेली वस्तुस्थिती बदलायची असेल तर या लढ्यात आप-आपल्या पातळीवर शक्य तो सहभाग देणे आवश्यक आहे.

वाचकांना याबाबत अधिक जाणून घेण्याची, अथवा या कामात कोणत्याही स्वरुपात सहभागी होण्याची मनोमन ईच्छा झाली तर त्यांचे या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीत मनापासून स्वागत आहे.

# अनोळखी माणूसपण

**© डॉ. हेमलता पिसाळ**
**ईमेल** : hemal1762@gmail.com

**या अभ्यासाच्या निमित्ताने मला अनेक तृतीयपंथीयांचे आयुष्य जवळून पाहता आले. त्यांच्यातील माणूसपणाचा अनुभव घेता आला. त्यांच्यातील हे माणूसपण इतरांनाही समजावे म्हणून काही अनुभव या लेखात शब्दबद्ध करत आहे. माझ्या अभ्यासादरम्यान तृतीयपंथीची मुलाखत घेऊन झाली की मी त्यांना एखादी छोटीशी भेटवस्तू द्यायचे**

तृतीयपंथीयांबद्दल नेहमी विचारले जाणारे प्रश्न म्हणजे, भीति नाही वाटत या लोकांशी बोलायला? हे सामाजिक शिष्टाचार पाळू शकतात का? हे समाजात सामावू शकतात का? खरं म्हणजे सर्वसामान्यांना माहीत असतात ते रस्त्यावर, दुकानासमोर, रेल्वेत मंगती करताना पाहिलेले तृतीयपंथी. अशा सार्वजनिक ठिकाणी बरेचदा यांचे भांडकुदळ, आक्रमक रुपचं अनेकांनी बघितलेले असते. त्यांच्याबद्दल असलेल्या भीतिमुळे त्यांच्याशी मैत्री तर दूरच, त्यांच्याशी बोलण्याची हिंमत सुद्धा अनेकांमध्ये नसते. सगळ्यांना त्यांच्या जीवनाबद्दल कुतूहल तसेच शंकाकुशंका मात्र असतात. अर्थात तरीही यांची विचारपूस करण्याची गरजही कुणाला वाटत नसते. मलाही ती वाटली नव्हती. पण मनी ध्यानी नसताना अचानक एक दिवस यांच्यावर अभ्यास करायचा ठरवलं आणि काही काळ यांच्याबरोबर घालवल्यावर इतर सर्वांसारखेच गुण-दोष यांच्याही स्वभावात कमी जास्त प्रमाणात पहायला मिळाले. खरं तर कुटुंबापासून, आप्तांपासून दूर ढकलल्या गेल्यामुळे, एका विशिष्ट चौकटीतील आयुष्य जगताना कौटुंबिक प्रेमाला, प्रेमळ सहवासाला, आपुलकीच्या चार शब्दांना ही मंडळी आसुसलेली असतात. कुणाकडून अशी वागणूक मिळाली तर यांना होणाऱ्या आनंदाचा, यांच्यातील प्रेमळ स्वभावाचा, कुणासाठी काहीही करण्याच्या यांच्या स्वभावाचे अनेक पैलू पहायला मिळतात आणि लक्षात येतं की व्यक्तीची लैंगिक ओळख, लैंगिकता काहीही असली तरी माणूस म्हणून भावनिक गरज ही सर्वसामान्यांसारखीच आहे.

या अभ्यासाच्या निमित्ताने मला अनेक तृतीयपंथीयांचे आयुष्य जवळून पाहता आले. त्यांच्यातील माणूसपणाचा अनुभव घेता आला. त्यांच्यातील हे माणूसपण इतरांनाही समजावे म्हणून काही अनुभव या लेखात शब्दबद्ध करत आहे.

माझ्या अभ्यासादरम्यान तृतीयपंथीची मुलाखत घेऊन झाली की मी त्यांना एखादी छोटीशी भेटवस्तू द्यायचे. एकदा अशीच एक भेट म्हणून मी रेखाला सोनेरी रंगाची छोटाशी कर्णफुले दिली. ती मिळाल्यावर रेखाचा आनंदाने खुललेला चेहरा माझ्या डोळ्यासमोर आजही तरळतो. पण रेखाचा हा आनंद जास्त वेळ टिकला नाही. कारण नेमकं त्यातील एक कर्णफूल खोलीबाहेरून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या उघड्या नाल्यात पडलं. नाल्यात किती घाण पाणी वाहत आहे याचा कसलाही विचार न करता रेखाने ते कर्णफूल शोधण्यासाठी घाण पाण्याच्या

नाल्यात हात घालून ते मिळवण्याचा खूप प्रयत्न केला. मला तर ते बघतानासुद्धा किळस येत होती. बऱ्याच प्रयत्नाअंती ते मिळत नाही म्हटल्यावर रेखाचा चेहरा पडला. रेखाचा तो पडलेला चेहरा बघितला आणि लक्षात आलं की खूप काही किंमत नसलेली ती कर्णफुले रेखासाठी किती किंमती आहेत. एवढीशी भेट म्हणून मिळालेली वस्तू रेखाला एवढा आनंद देऊन जाईल आणि ती हरवल्यामुळे एवढी हुरहुरही लावून जाईल याची मी त्याआधी कल्पनाही केली नव्हती आणि हा प्रसंग घडला नसता तर अशा छोट्याशा भेटीचंही यांना किती अप्रूप असतं हे ही मला समजलं नसतं.

मुलाखती घेण्याच्या निमित्ताने झालेल्या भेटी भेटीमध्ये ज्योतीने माझ्याबरोबर बहिणीचे नाते जोडले. त्याची कहाणीही गंमतशीर आहे. म्हणजे एकदा एका दावतच्या (पार्टी) कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ज्योतीने मला तिची साडी नेसायला लावली होती. त्यामागची पार्श्वभूमी समजल्यावर नाते मानलेले असले, तरी एकदा का ते जोडले गेले की तृतीयपंथी व्यक्ती त्याबाबत किती संवेदनशील असू शकते याचा प्रत्यय आला.

त्याचं असं झालं, गोरेगावच्या एका प्रतिष्ठित तृतीयपंथ्याकडे देवीची मूर्ती खराब झाली म्हणून मूर्तीच्या प्रतिस्थापनेचा कार्यक्रम होता. त्यानिमित्ताने त्याने एक दिवस जोगत्यांना आणि एक दिवस तृतीयपंथीयांना दावत ठेवली होती. अभ्यासाच्या दृष्टिकोनातून मी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या दावतला फक्त मुंबईतलेच प्रतिष्ठित तृतीयपंथी नाही तर इतर ठिकाणचे जोगती आणि तृतीयपंथीही आले होते. या कार्यक्रमाला शंभर एक तरी तृतीयपंथी उपस्थिती होते. दावत रात्रीची होती आणि यांच्या प्रथेप्रमाणे सगळे तृतीयपंथी ऐपतीप्रमाणे होता होईल तेवढे सजून आले होते. मुंबईतील नामांकित गुरू आणि नायकही दावतला उपस्थित होते.

त्यामुळे भारी साड्या, भडक मेकअप आणि मोठ्या आणि जड दागिन्यांनी सजलेल्या तृतीयपंथीयांची कार्यक्रमात रेलचेल होती. ज्योतीसुद्धा गुरू मुनिरा आणि इतर चेल्यांबरोबर आली होती. कामाच्या निमित्ताने मुनिरा गुरूकडे माझ्या ३-४ भेटी झाल्या होत्या. त्यामुळे मुनिराकडे राहणाऱ्या ज्योती आणि इतर तृतीयपंथीयांशी माझी चांगली ओळख झाली होती. सुरुवातीला ज्योतीने पहिल्या भेटीमध्ये तिचे नाव आणि मुलाखत देण्यास नकार दिला होता. मला दावत मध्ये बघून तिला खूप आश्चर्यही वाटले आणि आनंदही झाला. बराच वेळ माझ्याशी गप्पा मारल्यावर ती इतर तृतीयपंथियांच्यात जाऊन बसली. थोड्या वेळाने दावत मध्ये द्यायची भेटवस्तू घरीच राहिली म्हणून ती आणण्यासाठी ती परत घरी निघाली होती.

त्यावेळेस माझ्याबरोबर चल आपण लगेच परत येऊ म्हणून तिने आग्रहच धरला. तिने खूपच आग्रह केला म्हणून मी तिच्याबरोबर त्यांच्या घरी गेले. घरी गेल्यावर तिने साड्यांचा ढीग माझ्यापुढे टाकला आणि त्यातली साडी निवडायला सांगितली आणि मला म्हणाली तुला यातली साडी नेसावीच लागेल. आता माझ्याकडे ना ब्लाऊज ना पेटीकोट, कशी नेसणार होते मी तिची साडी मला काही कळेना. तर हिने स्वतःचे तेही कपडे माझ्यापुढे केले. ज्योती खूप उंच आणि सडपातळ असली तरी चणीने मोठीच. त्यामुळे तिचे कपडे कसे बसणार हा प्रश्नच होता. पण तिचा आग्रह काही तिने सोडला नाही. शेवटी मी एक साडी निवडली आणि त्याचावरचा ब्लाऊज आणि पेटीकोटही घालून बघितला. अर्थात ते बसणार नाही मला माहीत होते पण ज्योतीने माघार घेतली नाही. पठ्ठिने पेटीकोट आणि ब्लाऊजवर खुणा करून घेतल्या आणि शेजारील कुणाकडून तरी हवे त्या मापावर शिलाई मारून ते टाचून आणले. झालं मी साडी तर नेसले. आता तिचा आग्रह लिपस्टिक लावण्यासाठी. तिच्याकडच्या सगळ्या लिपस्टिक या भडक रंगाच्या. एक तर मी लिपस्टिक लावत नाही आणि लावली तरी खूप हलक्या रंगाची म्हणून मी तिला लिपस्टिक न लावण्यासाठी कसं तरी पटवलं आणि तिची साडी नेसून दावत मध्ये सहभागी झाले. जाताना तिने रस्त्यात मला काय घडले ते सांगितले. ज्योतीला माझ्याशी बोलताना ज्या तृतीयपंथ्यांनी बघितलं होतं त्यांनी तिला माझ्याबद्दल जेव्हा विचारलं तेव्हा तिने मी तिची बहीण आहे म्हणून सांगितलं. मात्र माझा अवतार बघून

त्यांनी तिला हिणवलं की, ''ये कैसी तेरी बहन, कपडा भी ढंग का नही पहना है उसने, दावत को कोई ऐसा आते है क्या?''

खरं तर माझ्या कामाचा भाग म्हणून मला कुठल्याही स्तरातल्या लोकांकडे आणि कुठेही जावं लागतं. दिवसातील २४ तासात कामासाठी मी कुठल्याही वेळेला घरातून बाहेर पडते, कुठल्याही वेळेला घरी येते आणि कुठल्याही माध्यमाने प्रवास करते. त्यामुळे फिल्डला जाताना एकदम साधा पेहरावच असतो माझा. असंही लग्नकार्यातही छोटासा दागिना घातला तरी आपण खूप सजलो आहोत असं वाटतं रहातं मला. तर तृतीयपंथींइतका मेकअप, दागदागिने, भडक कपडे घालणं दूरच. त्यामुळे त्यांच्या त्या झगमगाटात माझा अवतार कुणाला खटकला नाही तर नवल. बरं असंही नाही की तिथे आलेले सगळेच तृतीयपंथी झकपक होते पण ज्योतीला माझ्याबद्दल काढलेल्या उद्गारांमुळे खूप अपमानीत वाटलं. सुरुवातीला नावही न सांगणाऱ्या, मुलाखतीला नकार देणाऱ्या आणि नंतर तिच्या प्रियकरालाही भेटावं म्हणून आग्रह करणाऱ्या आणि मला बहीण मानणाऱ्या ज्योतीत झालेले हे स्थित्यंतर मला अपेक्षित नव्हते. त्यामुळेच त्याबद्दल आश्चर्य आणि अप्रूपही वाटत होते.

त्याचबरोबर माणसा माणसांमधील नात्यांच्या बंधांबद्दल विचारही करायला लावत होते, मग भलेही ते नाते चौकटीबाहेरचे आयुष्य जगणाऱ्यांचे होते. चमेलीमुळे तर मला मुंबईमध्येही काश्मीरच्या नावाने बाग आहे हे कळलं. मुंबईमध्ये छोटा काश्मीर नावाची एक सुंदर बाग आहे. चमेली बरोबर मी या बागेत गेले तेव्हा आम्ही तिथे पोहचताच १६-१७ मुलामुलींनी चमेलीला गराडा घातला आणि बागेच्या गेटकिपरबद्दल तिच्याकडे तक्रार केली. त्यांच्याकडे तिकीट असूनही गेटकिपर त्यांना आत जाऊ देत नव्हता आणि तिथलं पाणी घेऊ देत नव्हता. ही सर्व मुलं चमेलीला आण्टी म्हणत होती. चमेलीने स्वतःच मुलांसाठी पाणी आणले आणि गेटकिपरला मुलांना आत सोडायला सांगितले. या मुलांमध्ये २ वर्षापासून ते ८-१० वर्षाची मुलं-मुली होते. ही सगळी मुलं चमेलीच्या प्रियकराच्या घरातली होती. त्यात तिच्या प्रियकराचीही दोन मुलं होती. चमेलीच्या प्रियकराचा भाऊ त्यांना बागेत घेऊन आला होता. या मुलांबरोबर चमेलीच्या गप्पा मस्ती चालली होती. साधारण दीड एक तास मुलांशी खेळून झाल्यावर तिने मुलांना घरी पाठवलं.

बागेत या मुलांबरोबर खेळणे हा चमेलीचा नेहमीचाच उपक्रम होता. स्वतःच्या आयुष्यात स्थिरता नसलेल्या प्रियकराच्या या नात्यातील मुलांबरोबर तन्मयतेने खेळत बसलेली चमेली बघितल्यावर जिव्हाळयाचा झरा पाझरण्यासाठी रक्ताचंच नातं असावं लागत नाही हे वाटून गेल्याशिवाय रहात नाही.


अशा एक नाही अनेक प्रसंगातून मला मात्र समाजाने अव्हेरलेल्या या तृतीयपंथी लोकांमधील माणुसकीचे दर्शन होत गेले अर्थात त्यासाठी आपल्यालाही त्यांना सन्मानाने वागवावं लागतं आणि विश्वासाने जवळही करावं लागतं.

।। श्रद्धांजली ।।

# लॅरी क्रॅमर

अमेरिकेतील गे ॲक्टिविस्ट, लेखक

जन्म : २५ जून १९३५ मृत्यू : २७ मे २०२०




**माझं एक महत्त्वाचं प्रेरणास्थान**

मी समपथिक ट्रस्ट सुरु करते वेळी लॅरी क्रॅमरला एक इमेल लिहिली होती व त्यांच्या 'फॅगॉटस' या कादंबरीची स्तुति केली होती आणि पुण्यात एलजीबीटी साठी काम सुरु केलं म्हणून लिहिलं होतं. लगेच उत्तर आलं ज्यात तो म्हणाला, येवढी वर्षं होऊन आजही लोकांना 'फॅगॉटस्' कादंबरी आवडते याचा मला खूप आनंद आहे.

'येल' युनिवर्सिटीत इंग्रजी (आर्टस्) शिकताना लॅरीनी पहिल्या वर्षी आत्महत्त्या करायचा प्रयत्न केला. नंतर आपल्या भावाला आपण 'गे' असल्याचं सांगितलं. पुढे तो चित्रपटसृष्टीत 'प्रोडक्शन असिस्टन्ट' म्हणून काम करू लागला. नंतर एक्झीक्युटीव्ह बनला. त्यांनी डि.एच. लावरेन्स याच्या 'वुमन इन लव्ह' कादंबरीवर आधारीत चित्रपट कथा लिहिली ज्यासाठी त्याला ऑस्कर पारितोषकाचं नामांकन मिळालं.

१९८० च्या दशकात अमेरिकेत एचआयव्ही पसरु लागला व अमेरिकन सरकारने तो समलिंगी लोकांना होणारा आजार आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. गे मंडळीही एचआयव्ही कडे दुर्लक्ष करत होती. अश्यावेळी लॅरी क्रॅमरने सरकारी विरुद्ध आक्रमकपणे आवाज उठवला. त्यांनी इतर काही मंडळींबरोबर GMHC (गे मेन्स हेल्थ क्रायसीस) आणि ACTUP (एड्स कोलिशन टू अनलीश पॉवर) हे गट स्थापन केले व समाजाचे, डॉक्टरांचे आणि मुख्यत: राजकीय नेत्यांचे एचआयव्ही कडे व समलींगी समुदायाकडे लक्ष वेधून घेतलं. अनेक ठिकाणी निदर्शनं करून अनेक वेळा अटकही झाली. १९८५ साली त्याने एचआयव्हीच्या प्रश्नांवर 'द नॉर्मल हार्ट' हे नाटक लिहलं जे खूप गाजलं.

'फॅगॉट्स' कादंबरीत लॅरीने समलिंगी जीवनशैली चे काही अतिशयोक्ती पैलू मांडले आणि ही कादंबरी वादग्रस्त ठरली आणि अनेक समलिंगी व्यक्तींनी कादंबरीला व लॅरीला नावं ठेवली. (पण तरी फॅगॉटस कादंबरीला माझ्या सारखे अनेक चाहते लाभले.)

अर्थात लॅरीला कोणाची पर्वा नव्हतीच.

'गे' समाजाची त्यांनी खैर केली नाही तशीच त्यांनी राजकीय नेत्यांची, डॉक्टरांचीही खैर केली नाही. रिपब्लीकन नेत्यांवरही टीका केली. (उदा. राष्ट्रपती रोनाल्ड रेगन) तसेच डेमोक्रॅटस्‌वरही (उदा. राष्ट्रपती बिल क्लीन्टन)

डॉ. ॲन्थोनी फौसी (डायरेक्टर NIAID – नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ ॲलर्जी ॲन्ड इन्फेक्टीव्ह डिसिजेस) यांच्यावरही त्यांनी अत्यंत कडव्या शब्दात टीका केली. तरी कालांतराने हे दोघे मित्र बनले व लॅरी डॉ. फौसी यांचा पेशंटही बनला. (लॅरी एचआयव्ही + होता)

वयाच्या ७७ व्या वर्षी लॅरीनी त्याचा जोडीदार डेविड वेबस्टरशी लग्न केलं.

एलजीबीटी समाजासाठी लॅरी क्रॅमरनी केलेले योगदान अविस्मरणीय आहे. प्रामाणिकपणे, तळमळीने, आपल्या कार्याला आयुष्य वाहिलेला असा एलजीबीही ॲक्टिविस्ट आता मिळणे दुर्लभच आहे.

**बिंदुमाधव खिरे**

# एक विवाहित समलिंगी पुरुष

## अनुभवकथन

अनामिक

**मी मुळचा मुंबईचा, जन्म, लहानपण सर्व शिक्षण मुंबईतच. आयुष्याची सुरुवातीची ३० वर्षे मुंबईत घालवली. त्यानंतर काही वर्षे परदेशात काम केले व आता गेली अनेक वर्षे पुण्यात स्थायिक असून वैद्यकीय व्यवसाय करीत आहे. परदेशातून पुण्यात परतल्यावर एका इंग्रजी वृत्तपत्रात श्री. बिंदुमाधव खिरे यांची मुलाखत सर्वप्रथम वाचण्यात आली. त्यांच्या कामाबद्दलची माहिती मिळाली. मी यापूर्वी भारतात असताना अशाप्रकारचे काहीच लिखाण वाचण्यात आले नव्हते.**

मी मुळचा मुंबईचा. जन्म, लहानपण, सर्व शिक्षण, मुंबईतच. आयुष्याची सुरुवातीची ३० वर्षे मुंबईत घालवली. त्यानंतर काही वर्षे परदेशात काम केले व आता गेली अनेक वर्षे पुण्यात स्थायिक असून वैद्यकीय व्यवसाय करीत आहे.

परदेशातून पुण्यात परतल्यावर एका इंग्रजी वृत्तपत्रात श्री. बिंदुमाधव खिरे यांची मुलाखत सर्वप्रथम वाचण्यात आली. त्यांच्या कामाबद्दलची माहिती मिळाली. मी यापूर्वी भारतात असताना अशाप्रकारचे काहीच लिखाण वाचण्यात  आले नव्हते. त्यामुळे श्री. बिंदू यांना भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची इच्छा निर्माण झाली; परंतु असे करण्यास मन धजावत नव्हते. याचे मुख्य कारण म्हणजे मी विवाहित होतो (आजही आहे), त्यामुळे असे काही करण्यात अपराधीपणाची भावना वाटत होती. अनेकदा त्यांना फोन करण्याचा विचार केला, पण तो प्रत्यक्षात येऊ शकला नाही. काही दिवसांनंतर मात्र धाडस करून बिंदूला फोन केला व त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊन भेटलो. ते माझ्याशी छान मोकळेपणे, मित्रत्वाच्या नात्याने बोलले. त्यांनी समपथिक ट्रस्टबद्दल माहिती दिली. मीही माझी प्राथमिक माहिती त्यांना सांगितली. (अर्थात खरे नाव व इतर वैयक्तिक माहिती वगळून) या आमच्या पहिल्या भेटीनंतर मी बिंदूला मधूनमधून ऑफीसमध्ये भेटत होतो. त्यांची सर्व पुस्तकेही मी विकत घेऊन वाचली. समपथिक ट्रस्टसाठी काही काम करण्याची माझी इच्छा मी बिंदूकडे व्यक्त केली. त्यावर त्यांनी मला त्यांच्या एका मराठी पुस्तकाचा इंग्रजीत अनुवाद करणार का असे विचारले, मी लागलीच होकार दिला;कारण मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांवर माझे बऱ्यापैकी प्रभुत्व असल्याने मला या बाबतीत आत्मविश्वास होता. मी त्याप्रमाणे अनुवाद केला. तो बिंदूला आवडलाही व त्यांनी तो छापून प्रसिद्धही केला. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये माझा उल्लेख करून (अर्थात खऱ्या नावाशिवाय, एक हितचिंतक म्हणून) कौतुकाची थापही दिली. अशाप्रकारे समपथिक ट्रस्टच्या कामामध्ये मला 'खारीचा वाटा' उचलता आला याचे मला समाधान आहे. ट्रस्टच्या अनेक कार्यक्रमांनाही मी उपस्थित होतो. ज्यामध्ये प्राइडवॉकचाही समावेश आहे. मी आजही बिंदूच्या संपर्कात आहे. मात्र आता अनेक वर्षे पुण्यात असल्याने परिचित व्यक्ती किंवा माझे पेशन्टस् असे कुणी या कार्यक्रमांमध्ये भेटले, त्यांनी आपल्याला ओळखले तर काय होईल या अपराधीपणाच्या भावनेमुळे अशा जाहीर कार्यक्रमांना जाण्यास काहीवेळा संकोच वाटतो.

बिंदू यांनी लिहिलेली पुस्तके वाचल्यानंतर आपणही आपले अनुभव लिहावेत

असा विचार मनात आला. तो त्यांना बोलून दाखविला व त्यांनी होकार दिल्यावर आज हे आत्मकथन लिहीत आहे.

मी समलैंगिक आहे याची सर्वप्रथम जाणीव मला केव्हा व कशी झाली हे अगदी नीटपणे आठवल्यावर खूप वर्षांपूर्वीच्या दोन घटना डोळ्यांपुढे ठळकपणे येतात.

त्यावेळी माझे वय साधारण ८-१० वर्षांचे असेल. मी सुट्टीत पुण्याला माझ्या मामांकडे आलो होतो. माझा मामेभाऊ माझ्यापेक्षा वयाने २ वर्षांनी मोठा. त्याने आम्हाला क्रिकेटची मॅच बघण्यासाठी म्हणून एका जिमखान्याच्या मैदानावर नेले. तेथे आमची बसायची जागा खेळाडूंच्या ड्रेसिंग रुम ला अगदी लागूनच होती. तरुण खेळाडू कपडे बदलताना, तयार होताना, प्रोटेक्टिव्ह गार्डस् घालताना मला अगदी जवळून दिसत होते. मला आठवते की त्यावेळी माझी नजर प्रत्यक्ष मैदानावरील खेळापेक्षा खेळाडूंच्या ड्रेसिंग रुमकडेच अगदी खिळून होती व मी ते एन्जॉय करीत होतो. त्या वयात लैंगिकता/स्त्री-पुरुष संबंध याबद्दल काही माहिती असण्याचा प्रश्नच नव्हता, पण इतक्या लहान वयात समलैंगिकतेची भावना निर्माण होऊ शकते का, असा प्रश्न आजही माझ्या मनात येतो. यामागचे शास्त्रीय सत्य बिंदू आपल्याला सांगू शकतील.

त्यानंतरच्या २-३ वर्षातली आणखी एक घटना आठवते.

माझे एक तरुण काका आमच्या घरी राहाण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांची पांढरी Trunk Underwear धुऊन दांडीवर वाळण्यासाठी घातली जात असे. त्या अंडरवेअरचे मला प्रचंड आकर्षण वाटत असे. एकदा सर्वांच्या नकळत मी ती अंडरवेअर घालून बघितली होती व त्यात मला मजाही वाटली होती. आपली अंडरवेअर कुणी तरी वापरल्याचे काकांच्या लक्षातही आले होते. परंतु सुदैवाने या गोष्टीची पुढे फार वाच्यता झाली नाही.

सर्वांना कदाचित आश्चर्य वाटेल पण स्त्री -पुरुषांचे लैंगिक संबंध असतात याची जाणीव सर्वप्रथम मला अकरावीत असताना (वय १७ वर्षेअंदाजे) झाली. याच्या काही काळ आधी लैंगिक ताठरता येण्यास सुरुवात झाली होती व नियमितपणे हस्तमैथुनही सुरु झाले होते. त्यावेळी पुरुषांबद्दल आकर्षण वाटत असले तरी शरीरसंबंध ठेवावेत असे वाटत नसे. मात्र पुरुषाचे लिंग (विशेषत: ताठर अवस्थेतील) बघण्याची तीव्र इच्छा होऊ लागली. त्यावेळी मुंबईत अनेक सार्वजनिक मुताऱ्या होत्या. मी नियमितपणे तेथे जाऊ लागलो (रस्त्यांवर, रेल्वे स्टेशनवर) व अगदी उघडपणे डोकावून शेजारी उभ्या असलेल्या पुरुषाचे लिंग बघण्यास सुरुवात केली. त्यावेळी मी इतका कामांध झालो होतो की आपण फार मोठी जोखीम घेत आहोत हे मला कळतच नव्हते. (म्हणतात ना, 'कामातुराणां न भयं, न लज्जा!) काही मुताऱ्यांमध्ये छुपेपणे २ पुरुषांमध्ये Oral sex होत असे,पण आपण तसे काही करावे असे मला त्यावेळी वाटले नाही व मी तसे केलेही नाही. या प्रकारात एकदा मी थोडा अडचणीतही आलो होतो, पण सुदैवाने त्यातून सहीसलामत बाहेर पडलो.

त्यावेळी मुंबईत शिवाजी मंदिरजवळ, रस्त्यावर पिवळ्या कागदातील पुस्तके विकली जात असत. एकदोनदा ती पुस्तके विकत घेऊन रस्त्यावरच आडोशाच्या ठिकाणी बसून वाचली होती. एकूणच तीव्र कामेच्छेमुळे मी सैरभैर झालो होतो. मात्र याबद्दल बोलण्यासाठी, मन मोकळे करण्यासाठी, माहिती देण्यासाठी कुणीच नव्हते. त्यावेळेला ना इंटरनेट ची सोय होती, ना समपथिक ट्रस्टसारख्या संस्थांची.

सुदैवाने माझी शैक्षणिक प्रगती उत्तम होती व मला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशही मिळाला होता.

वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना मला भेटलेल्या तीन मित्रांबद्दल इथे सांगावेसे वाटते.

वैद्यकीय शिक्षण घेताना आम्हाला पेशंटच्या भोवती उभे राहून पेशंट प्रत्यक्ष कसा तपासायचा हे शिकवले जाते. यासाठी ८-१० विद्यार्थ्यांचा छोटा गट असतो. एकदा आमचे हे प्रात्यक्षिक सुरु असताना आमच्या गटातील एक गुजराती मुलगा माझ्या मागे बसून माझ्या पाठीवरून अगदी अधाशीपणे हात फिरवून जवळीक साधत असल्याचे

माझ्या लक्षात आले. हा प्रकार २-३ वेळा घडला. माझ्या लैंगिकतेबद्दल त्याला कसे कळले होते, हे मात्र मला कोडेच होते. नंतर एकदा तर त्याने मला त्याच्या हॉस्टेल मधील खोलीवर येण्यासही उघडपणे सांगितले होते. हा मुलगा थोडा बुटका पण गोरागोमटा, देखणा व श्रीमंत घरातील होता. तो अनेकदा स्वत:च्या चार चाकी गाडीने कॉलेजला येत असे. (आम्ही इतर विद्यार्थी बस व ट्रेनने प्रवास करीत असू) मात्र त्यावेळी मी त्याला कुठलाही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. आमच्या दोघांमध्ये 'तसे काही' अजिबात घडले नाही.

आमच्या त्याच बॅचमध्ये एक सरदारजी मुलगा होता. काळासावळा पण अंगाने मजबूत, भरपूर दाढी -मिश्या असलेला व एकूणच आकर्षक व्यक्तिमत्वाचा असा तो होता. आमच्या एका प्राध्यापकांची मी एकदा त्याच्यासमोर स्तुती करीत होतो. तेव्हा तो मिस्किलपणे मला म्हणाला, "Yes, I had him one night!" नंतर एकदा बोलताना तो मला असेही म्हणाला, "I will not get married, because I don't want to be unfaithful to someone!" हा विषय नंतर पुढे गेला नाही व आमच्यात काहीच घडले नाही, पण आता विचार करताना असे वाटते की तो गे असावा व माझ्याबद्दलही त्याला अंदाज आला असावा.

नंतर पदव्युत्तर शिक्षण घेत असताना हा तिसरा मित्र भेटला, तोही गुजरातीच, पदव्युत्तर शिक्षण घेताना आम्हाला रुग्णालयाच्या हॉस्टेलमध्ये राहाणे बंधनकारक होते. हा मुलगा माझ्या जवळच्याच रुममध्ये राहात होता. दिसायला अत्यंत देखणा, गोरापान, आकर्षक व रुबाबदार व्यक्तिमत्व. स्वभावानेही तितकाच गोड व मनमिळाऊ. त्याला पाहताक्षणीच मी जणू त्याच्या प्रेमातच पडलो. त्याच्याशी मैत्री वाढवली. काहीतरी निमित्त काढून त्याच्या रुमवर घोटाळू लागलो. रुममध्ये हा कायम पांढरेशुभ्र बिनबाह्यांचे बनियन व पांढराशुभ्र पायजमा अशा वेषात असे, (त्याकाळी बहुतेक सर्वजण घरी पायजमाच घालीत असत. आजसारखी अर्धी चड्डी, बर्म्युडा, शॉर्टस् इ.घालायची पद्धत नव्हती, मी आजही घरी असताना पारंपरिक पांढरा पायजमाच घालतो.) त्याची भरदार मिशी, बनियनमधून डोकावणारे छातीवरील व काखेतील दाट केस, काखेतील घामाचा सुगंध याने मी अक्षरश: वेडा झालो होतो. माझे वय त्यावेळी २५-२६ असावे, हा मुलगा माझ्याहून १-२ वर्षे मोठा होता. महत्त्वाचे म्हणजे त्याचे लग्न झाले होते. पण त्याची पत्नी मुंबई बाहेरील हॉस्पिटलमध्ये शिक्षण घेत होती. त्यामुळे तोही शारिरीक सुखासाठी भुकेलेला व उपाशीच होता. तो त्वचारोगशास्त्रामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत होता. मला अजूनही आठवते की 'जांघेमध्ये वारंवार खाज येते' अशा त्वचेशी संबंधीत तक्रारीचे निमित्त घेऊन मी त्याच्याकडे गेलो. 'तु मुझे दिखाएगा क्या?' असे त्याने मला पहिल्या वेळी विचारले होते; अर्थात ही नॉर्मल तपासणी होती, पण लाजेखातर मी त्याला तपासणीस नकार दिला. त्यामुळे त्याने मला माझ्या तक्रारीवर डॉक्टर म्हणून उपाय सुचविले होते, पण वारंवार मी त्याच्याकडे हीच तक्रार घेऊन जाऊ लागल्याने त्यालाही शंका आली असावी. तो नक्कीच सर्व बाबतीत अनुभवी होता. विवाहित असल्याने त्याला सेक्सचाही अनुभव होताच. एकदा बोलता बोलता तो मला म्हणून गेला. "I am a married batchelor" त्यावर मी लगेच त्याला म्हटले, "But you must have had Honeymoon at least" त्यावर तो थोडासा लाजून हसला, हा विषय नंतर पुढे गेला नाही.

दर ६ महिन्यांनी आमच्या Hostel rooms चे reallotment होत असे. पुढच्या re allotment च्या काही दिवस आधी हा मुलगा स्वत:हून मला येऊन भेटला व आपण दोघे Hostel room share करूयात का, असे त्याने मला विचारले. त्यावेळी का कोण जाणे, मी त्याला नकार दिला. मी असे का केले हे मला आजही कळत नाही, पण त्याला नकार दिल्याचा पश्चाताप मात्र अजूनही वाटतो आहे.

कालांतराने विचार केल्यावर मला एका गोष्टीची स्पष्टपणे जाणीव झाली की वरील तिन्ही मित्र माझ्याशी शरीरसंबंध ठेवण्यास त्या त्या वेळेस उत्सुक होते. त्यांनी मला तसे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सुचवलेही होते व पुढाकारही घेतला होता; पण मीच त्यांचे इशारे समजू शकलो नाही व त्यांना प्रतिसाद दिला नाही. या तिघांशीही मी

स्वत:हून कुठल्याच प्रकारची शारीरिक लगट केली नाही. मागे वळून पाहता असे मी का केले, या प्रश्नाचे उत्तर आजही माझ्याकडे नाही, पण त्यामुळे मी शरीरसुखाच्या स्वर्गीय आनंदाला मुकलो हे मात्र सत्य आहे.

आज हे तिनही मित्र विवाहित असून तिघांनाही मुले बाळे आहेत. कॉलेजनंतर माझा त्यांच्याशी काही संपर्क नाही.

कालांतराने सामाजिक रीतीप्रमाणे ठरवून माझे लग्न झाले. लग्नास मी नकार देऊ शकलो नाही. लग्नानंतर सव्वा वर्षातच बापही झालो. औपचारिकता म्हणून पत्नीशी शरीरसंबंध ठेवले, पण माझ्यासाठी तरी ते नक्कीच फारसे सुखावणारे किंवा हवेहवेसे वाटणारे नव्हते.

परदेशातील वास्तव्यात खरे तर 'खूप काही' करता आले असते. (तिथली मुक्त समाजव्यवस्था व स्वातंत्र्य लक्षात घेता,) पण कुटुंबासमवेत असल्याने काही वावगे करता आले नाही. कधीतरी चोरून Gay Magazines वाचण्यापलिकडे मजल गेली नाही. खरे म्हटले तर तरूण वय असूनही 'तसे' काही करण्याची फार तीव्र इच्छाही झाली नाही. रोजच्या कामाचा व्याप, परदेशात काही 'नसती आफत' उद्‌भवेल ही भीति व कुटुंब जवळ असणे, ही याची कारणे असावीत असे आता वाटते.

आता अनेक वर्षे मी पुण्यात आहे. आज मी पन्नाशी ओलांडली आहे. पण गे सेक्सच्या बाबतीत आजही मी पूर्णपणे Virgin आहे, शरीरसंबंध तर सोडाच पण कुठचेही चोरटे स्पर्श, body sex सुद्धा अजिबात झालेला नाही. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आहे की गेल्या ८-१० वर्षांत gay sex करण्याची इच्छा प्रचंड प्रमाणात वाढली आहे. आजही ती खूप तीव्र आहे, पण ती पूर्ण होऊ शकलेली नाही. Gay sites वरून मित्र शोधण्याचे धाडस होत नाही. सुदैवाने erection power आजही उत्तम आहे. मराठी Porn magazines वाचत, Porn videos बघत हस्त मैथुनावरच समाधान मानावे लागत आहे.

माझ्या व्यवसायामुळे रोज पुरुषांना तपासावे लागते. अनेक उघडे पुरुष मी रोज बघतो. तरुण मुलेच नाही तर अनेक मध्यमवयीन व काही ज्येष्ठ नागरिक पुरुषही दिसायला खूप आकर्षक असतात. काही वेळा पुरुषांच्या जननेंद्रियानादेखील हात लावून तपासावे लागते. अशा वेळी मनावर जबरदस्त ताबा ठेवावा लागतो.

तरुण जोडपी बघितल्यावर, 'त्यातली तरूणी किती भाग्यवान आहे, तिला या तरुणाकडून रोज शरीरसुख मिळते आहे, तिच्या जागी आपण असतो तर किती बरे झाले असते', असे विचार मनात येतात.

वर म्हटल्याप्रमाणे गे सेक्स च्या बाबतीत आजही मी virgin आहे. पण ही virginity लवकरात लवकर तुटली जावी अशी तीव्र इच्छा मनामध्ये आहे. मासा जसा पाण्याबाहेर काढल्यावर तडफडतो, तसा शरीरसुखासाठी मी तडफडत आहे. Passive पार्टनर होण्याचे हे स्वर्गीय सुख एकदा तरी मला मिळावे अशी माझी इच्छा आहे.

मुंबईत Gay seenagers चा गट कार्यरत आहे. पुण्यातही असा गट सुरु करता येईल का याबाबत बिंदूशी माझे बोलणे झाले आहे व मी त्याबाबतीत पुढाकार घेण्यासही तयार आहे.

तसेच माझ्यासारखे अनेक समलैंगिक पुरुष सामाजिक रीत/दबाव म्हणून भिन्नलिंगी व्यक्तिशी विवाह करून दुहेरी आयुष्य जगत आहेत. अशा व्यक्तिंचाही एक स्वतंत्र गट करता येऊ शकेल का? असाही विचार माझ्या मनात आहे. जेणेकरून त्यांच्यातील समान धागा पकडून त्यांची होणारी मानसिक घालमेल/कुचंबणा काही प्रमाणात कमी करता येऊ शकेल. याबाबतीत कुणाच्या सूचना/प्रस्ताव असतील किंवा कुणी पुढाकार घेण्यास तयार असेल तर समपथिक ट्रस्टला जरूर कळवावे.

आपल्या असंख्य सहकाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे ३७७ कलम रद्द करण्यात आपल्याला यश आले आहे. पुण्यात भारती विद्यापीठ रुग्णालयात LGBT समुदायासाठी वैद्यकीय सुविधा पुरवली जात आहे. काही डॉक्टर्स त्यांच्या खाजगी दवाखान्यांमध्ये सुद्धा अशा व्यक्तिंना सेवा देत आहेत. समपथिक ट्रस्टचे कार्यही बिंदूच्या

मार्गदर्शनाखाली जोरात सुरु आहे. LGBT समुदायाच्या विविध प्रकारच्या समस्या बिंदू व त्यांचे सहकारी यशस्वीपणे हाताळीत आहेत. 'Pride walk' साहित्य संमेलन, चर्चासत्रे, कायदे विषयक सल्ला पुरविणे असे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. गेल्या वर्षीपासून सुरु झालेला समपथिक ट्रस्टचा दिवाळी अंक हाही या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा! यावर्षीच्या दिवाळी अंकासाठी माझे आत्मकथन स्वीकारून मला मोकळे होण्याची संधी दिल्याबद्दल बिंदूचे मन:पूर्वक आभार! यापुढेही समपथिक ट्रस्टच्या उपक्रमांमध्ये एक सामान्य नागरिक तसेच वैद्यकीय व्यावसायिक म्हणून सहभागी होऊन खारीचा वाटा उचलण्याचा माझा नक्कीच प्रयत्न राहील. ट्रस्टला तसेच संपूर्ण समलैंगिक चळवळीला  माझ्या मनापासून शुभेच्छा!

# आमच्या घरावरील इंद्रधनुष्य



गोलनाझ मलेक

© गोलनाझ मलेक

तेहरान (इराण) मधील सामाजिक कार्यकर्त्या. लैंगिकता व लिंग भाव विषयांवरच्या प्रशिक्षणकर्त्या. प्रशिक्षणाचं मुख्य केंद्र- HIV चा प्रसार रोखणे व लहान मुलामुलींच लैंगिक शोषण रोखणे.
**ईमेल** : golnazm@gmail.com

**मराठी भाषांतर: सुरेश खोले**
फ्रिलान्स अनुवादक, संशोधक. स्त्रीवादी, लैंगिकता हक्कांच्या, डाव्या, मुक्तस्त्रोत सोफ्टवेयरच्या अशा वेगवेगळ्या सामाजिक चळवळींचा मिलाफ़ घडवून आणण्याच्या वेड्या प्रयत्नात सतत गुंतलेला असतो.
**ईमेल** : sureshkhole.com@gmail.com

**तुम्हांला हे जाणून घ्यायचे असेल ना? की इराणचे इंद्रधनुष्य नक्की कोणत्या रंगाने रंगवले जाते? इथे गे पुरुषांना मृत्यूदंडाची शिक्षा केली जाते की नाही? इथल्या क्वीर संस्कृतीवर नक्की कोणाचा प्रभाव आहे? पाश्चिमात्य जग की मानवी हक्क लढ्याचा? ज्यातला मानवी हक्कांचा लढा इराणविरोधातला कट तर नाहीना? वगैरे वगैरे. मी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा नक्की प्रयत्न करीन पण त्या आधी मी इतिहासाबद्दल काही सांगत आहे.**



सुरेश खोले

मी हे लिहित असताना, एका बाजूला कोरोना रोगाचे संकट सर्व जगाला भेडसावत आहे दुसऱ्या बाजूला मी ज्या देशात राहते तो देश आमच्या इतिहासात आर्थिकदृष्ट्या सर्वात वाईट काळातून जात आहे. सध्या कोरोनामुळे सारे जग जरी लॉकडाऊन अनुभवत असले तरी मला हे नवे नाही. माझ्या देशातल्या परिस्थितीमुळे मी माझ्या जीवनातला बहुतांश काळ लॉकडाऊनमध्येच घालवला आहे. त्यातच आमच्या देशावर अमेरिकेच्या आक्रमणाचे सावटही आहे. मी आमच्या देशाच्या राजधानीमध्ये म्हणजे तेहरानमध्ये राहते, येथे मी लैंगिकता आणि लिंगभाव प्रशिक्षकाचे काम करते. मी २००७ मध्ये भारतात राहायला आले होते, तेव्हा भारताची इराणमध्ये ओळख ही डाव्या, स्त्रीवादी, पर्यावरणवादी कार्यकर्त्यांची आणि सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमी अशी होती. मी भारतात २००७-२०१४ या काळात राहिले, इथेच मानसशास्त्र शिकले, एड्स बद्दलच्या समाजकार्यात भाग घेतला आणि औपचारिकरित्या माझ्या लैंगिकतविषयी सर्वांना सांगितले आणि त्यानंतर मी मागे वळून पाहिलेले नाही. भारतात काम करताना मी सतत अशा क्षेत्रांमध्येच काम करत होते, ज्या क्षेत्रांमध्ये काम करणे माझ्या देशात मला शक्यच होणार नाही. सात वर्षांनी जेव्हा मी इराणला परत आले तेव्हा, मला इथे काम सुरू करायला जवळपास एक वर्षाचा कालावधी लागला, (कारण, मी भारतातून निघताना बिंदूचा सल्ला घेतला होता आणि त्याच्या म्हणण्यानुसार मी इराणमध्ये माझं काम सुरु करायला वेळ घेतला, त्याचे म्हणणे होते की, गेल्या गेल्या लगेचच कामाला सुरुवात करू नकोस, स्थानिक समाजाला समजून घेण्यास थोडा वेळ दे आणि मग काम सुरू कर.) त्यानुसार मी एक वर्ष वाट

पाहून, हळूहळू स्थानिक एन.जी.ओ., सी.बी.ओ., शाळांबरोबर एच. आय. व्ही, लैंगिक हिंसा, बाल लैंगिक हिंसा या विषयांवर काम करण्यास सुरूवात केली. आणि जेव्हा मी इथे काम सुरू केलं तेव्हा तो भारतापेक्षा अगदीच वेगळा अनुभव होता. त्यामुळे माझे हे लिखाण माझ्या एलजीबीटीक्यू+ आयुष्याच्या, क्विअर लैंगिकता प्रशिक्षक म्हणून आणि आंतरछेदीत स्त्रीवादी कार्यकर्ता म्हणून असलेल्या आणि जगाच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये घडत गेलेल्या पैलूं विषयी असणार आहे.

२०२० च्या जानेवारीमध्ये मी तेहरान विद्यापीठाच्या सोशल सायन्स विभागामध्ये(या विद्यापीठाला तुम्ही इराणची जेएनयु म्हणू शकता!) लैंगिकतेवरचा(आमच्या देशात लिंगभाव अभ्यास असा अभ्यासक्रम नाही) एक अभ्यासक्रम अनौपचारिक पातळीवर शिकवण्यास सुरूवात केली. सध्या १४ विद्यार्थी हा अभ्यासक्रम शिकत आहेत. त्या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तासाला मी सर्वांना त्यांना हा अभ्यासक्रम का करायचा आहे? त्यांच्या या अभ्यासक्रमाकडून अपेक्षा काय आहेत? असा प्रश्न विचारला. तेव्हा अगदी मला माझ्या स्थानिक हेटेरोनॉर्मेटीव्ह(विषमलैंगिकता आग्रही) विद्यार्थी, कार्यकर्ते, अभ्यासकांबद्दलच्या अनुभवाप्रमाणे जसे अपेक्षीत होते त्याचप्रमाणे त्यांनाही, क्विअर थेयरी, एलजीबीटी+ लोकांबद्दल, लोक गे किंवा ट्रान्स कसे होतात याबद्दल जाणून घ्यायचे होते.  मी त्यांना विचारले तुम्हांला क्विअर लोकांबद्दल का जाणून घ्यायचे आहे? तुम्हांला त्यांच्याबद्दल एवढे कुतूहल का आहे? त्यांची उत्तरे नेहमीप्रमाणेच तीच होती, आम्हांला त्यांना समजून घ्यायचे आहे, आम्हांला त्यांना मदत करायची आहे वगैरे वगैरे. हीच संधी साधून मी त्यांना बुचकळ्यात पाडणारे प्रश्न विचारायला सुरूवात केली; आणि मला खरेच खूप मज्जा आली! तुम्हांला असं का वाटतं की क्विअर समाजाला त्यांचा स्वत:चा आवाज नाहीये?, विषमलिंगी लोकांनी समलिंगी लोकांना आवाज द्यावा असं तुम्हांला का वाटतं? तुमची मदत त्यांना हवी आहे असं तुम्हांला का वाटतय? आणि मुळातच तुमच्या सारख्याच समस्यांना क्विअर लोकांनाही सामोरे जावे लागते असे तुम्हांला का वाटते?, छोट्या शहरात राहणाऱ्या एखाद्या ट्रान्स सेक्स वर्करला येणाऱ्या समस्या, किंवा ग्रामीण भागात रहाणाऱ्या एखाद्या गे पुरुषाला येणाऱ्या समस्या या वेगवेगळ्या असू शकतात? अशा प्रश्नांच्या मदतीने मी त्यांच्या डोक्यात आंतरछेदीता (म्हणजेच वेगवेगळ्या सामाजिक आणि इतर परिस्थितींचा एकत्रित परिणाम) समजवण्याचा प्रयत्न सुरू करते, आणि या सिद्धांतानेच माझ्या अभ्यासक्रमाचा शेवट होतो. म्हणजेच लैंगिकतेविषयीच्या प्रश्नांनी सुरुवात करून लिंगभाव आणि लैंगिकता समजून घेता घेता मी त्यांना आंतरछेदीतेकडे नेण्याचा प्रयत्न करते.

पण, तुम्हांला हे जाणून घ्यायचे असेल ना, की इराणचे इंद्रधनुष्य नक्की कोणत्या रंगाने रंगवले जाते? इथे गे पुरुषांना मृत्यूदंडाची शिक्षा केली जाते की नाही? इथल्या क्विअर संस्कृतीवर नक्की कोणाचा प्रभाव आहे? पाश्चिमात्य जग की मानवी हक्क लढ्याचा? ज्यातला मानवी हक्कांचा लढा इराणविरोधातला कट तर नाहीना? वगैरे वगैरे. मी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा नक्की प्रयत्न करीन पण त्या आधी मी इतिहासाबद्दल काही सांगत आहे.

मी १९७९ साली इराणमध्ये झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर, चार वर्षांनी जन्माला आले. ही क्रांती पाश्चिमात्य जगाचा म्हणजेच अमेरिकेचा आमच्या देशावर होणारा वाईट परिणाम रोखण्यासाठी करण्यात आली होती. मी मोठी झाले ते क्रांतीनंतर दोन वर्षांनी सुरू झालेल्या इराण–इराक(सद्दाम हुसेन) युद्धाच्या काळात जे जवळपास आठ वर्षे चालले. त्यामुळे माझ्या आयुष्यातला मोठा भाग शरिया कायद्यांच्या छायेमध्ये गेलेला आहे. वास्तविक १९५३ च्या आसपास अमेरिकेने इराणच्या सत्तापालटामध्ये मदत केली होती. जेव्हा तरुण शहाने आपली सत्ता हातात घेतली तेव्हा, त्याने शहरी, मध्यम आणि उच्च वर्गीय लोकांची मदत घेतली होती. देशात आधुनिकीकरण आणण्याचे प्रयत्न केले होते. जसे की, सौदी अरेबीयाचा राजा बिन सालेमान ज्याला पाश्चिमात्यांचा मित्र आणि आधुनिक राजा मानले जाते, तो सध्या सौदी अरेबियामध्ये आधुनिकीकरण

राबविण्याचा प्रयत्न करत आहे. त्याच आधुनिकीकरणाचा भाग म्हणून न्यायव्यवस्थेमधून शरियाचे कायदे काढून टाकणे, आणि खासकरून स्त्रियांविषयीचे शरियाचे कायदे काढून टाकणे हा मानला गेला. (उदाहरणादाखल, पुरुषांनी अनेक स्त्रियांशी विवाह करणे बेकायदेशीर मानले गेले आणि स्त्रियांना घटस्फ़ोटाचा अधिकार मिळाला. जो या आधी इस्लामने फ़क्त पुरुषांनाच दिला होता.) समलैंगिकता ही कायद्यानुसार जरी गुन्हाचा राहिली असली तरी समलैंगिकतेबद्दल समाजात जाणीव जागृती निर्माण झाली होती, निदान समाजाच्या काही स्तरांमध्ये तरी समलैंगिक व्यक्तींचा स्वीकार केला गेला होता. (फ़ेरेयुदोन फ़रोकझाद हा त्यावेळचा प्रसिद्ध गे होता. [१]. पण या सर्व सुधारणांना पाश्चिमात्य लोकांचा दुष्प्रभाव मानले गेले, तसेच कायद्यात केले गेलेले हे बदलही पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणाऱ्या चिडक्या नोकरशाहीनी लादलेले आहेत असे मानले गेले. त्यामुळे इस्लामिक क्रांतीनंतर, शरीयाचे कायदे लैंगिकतेच्या सर्वच पैलूंवर लागू करण्यात आले आणि पहिली दोन दशके त्यांची अंमलबजावणी खूपच कठोरतेने करण्यात आली.

समलिंगी संभोगासाठी इराणच्या इस्लामिक प्रजासत्ताकमध्ये वेगवेगळ्या प्रकारची न्यायालयीन शिक्षा दिली जाते. त्यासाठी इस्लामच्या कायद्यांमधील निदान चार न्याय्य पुरुषांनी गुदमैथुन होताना पाहिले असण्याची साक्ष देणे किंवा गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभागी व्यक्तींपैकी एकाने, चार वेळा गुन्ह्याची कबुली देणे. जर यांपैकी एका मार्गांनी सिद्ध झाल्यास टॉप पुरुषाला शंभर चाबकाचे फ़टके तर बॉटमला मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाते पण जर त्या समलैंगिक लोकांनी/गुन्हेगारांनी त्यांच्या गुन्ह्याबद्दल क्षमायाचना केली तर त्यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा केली जात नाही. त्यामुळे गे पुरुषांना न्यायालयाकडून शिक्षा होण्याचे प्रमाण लाक्षणिकरित्या कमी आहे. वकील अनेकदा गुन्हेगारांना साक्षीसमोरच आपल्या गुन्ह्याबद्दल पश्चाताप व्यक्त करून क्षमायाचना करण्यास सुचवतात. अनेक खटले तर बलात्काराचे असतात तेही अशा क्षमायाचनेद्वारे सोडवले जातात. पण गे असण्यासाठी इराणमध्ये मृत्यूदंडाची न्यायलयाद्वारे सुनावणी होणे जवळपास अशक्य आहे.

गे प्रमाणेच लेसबियन संभोगासाठीही शिक्षेची तीच प्रक्रिया आहे, दोन्ही गुन्हेगारांसाठी शंभर चाबकाच्या फ़टक्याची शिक्षा सुनावली जाते. आणि जर त्या दोघींनींही गुन्हा कबूल करून पश्चाताप व्यक्त करून क्षमायाचना केल्यास त्यांना माफ़ केले जाते. त्यामुळे लेसबियन असण्यासाठी न्यायालयीन शिक्षा होणे आणखीनच अवघड आहे. मला असे वाटते की, हे इस्लाम लेसबियनसाठी चांगली वागणूक देतो असे नाही तर स्त्रियांच्या लैंगिक आविष्कारालाच अंधारात ठेवण्याचा प्रयत्न आहे. जसे की, स्त्रियां स्त्रियांमध्ये होणारा संभोग पुरुष लिंगाच्या अभावी पूर्ण होत नाही. त्यामुळे तो गंभीरतेने विचारात घ्यायची गरज नाही, असा इस्लामचा दावा असावा.

ट्रांस व्यक्तींची कथा या दोन्हींपेक्षा खूपच वेगळी आहे. ट्रांस असणे हा कोणे एके काळी गुन्हा होता पण, मर्यम खातून मोलकारा या ट्रान्स कार्यकर्तीमुळे [२]. इस्लामिक क्रांतींनंतरच्या काही वर्षांतच ट्रान्स असणे कायद्याने गुन्हा ठरवणारा कायदा काढण्यात आला. त्यांनी आपल्या हक्कांची लढाई इस्लामिक क्रांतीपूर्व काळात १९७४ साली सुरू केली. त्यांना इराणमधल्या ट्रान्ससेक्स्युल्सची आई मानले जाते. त्यांनी तत्कालिन राणी फ़राह यांची भेट घेऊन ट्रान्स समुदायाची परिस्थिती सांगितली, त्यावेळी मर्यम या फ़क्त २४ वर्षांच्या होत्या. त्या भेटीमधून फ़ार काही साध्य झाले नाही. परंतू, त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले नाही, त्यांनी नंतर १९७५ मध्ये अयात्तूल्ला खोमिनींना पत्र लिहिले, त्यावेळी त्या पत्रामध्ये त्यांनी जन्माच्या वेळी ठरवण्यात आलेल्या लिंगभावापेक्षा इतर लिंगभावाची ओळख सांगणाऱ्या समुदायाच्या प्रश्नांविषयी इस्लामच्या मतांविषयी विचारले होते. त्यावेळी खोमिनी इराणमधून तडीपार होते आणि इराकमध्ये रहात होते. त्यांनी खोमिनीला लिहिलेल्या पत्रात लिहिले होते, माझ्या आईला स्पष्ट आठवते की, जेव्हा मी लहान होते तेव्हा मला मुलींबरोबर खेळायला, मेकअप करायला खूप आवडायचे. त्यावर खोमिनी यांच्या उत्तरामध्ये ते म्हणतात की, त्यासाठी तुम्हांला स्त्री बनावं लागेल. क्रांतीच्या

काही महिने आधी, खोमीनींना भेटून आणि त्यांना ट्रान्सजेंडरच्या हक्कांविषयी माहिती द्यायची होती त्यासाठी त्यांनी पॅरिसला प्रवास केला, तेव्हा अयातुल्ला पॅरिसमध्ये रहात होते. परंतू त्यांना खोमिनींना भेटणे शक्य झाले नाही. क्रांतीनंतर परिस्थिती खूपच वाईट झाली, मर्यम यांना त्यांच्या टीव्हीच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आले. त्यांना मानसरोगी म्हणून वेड्यांच्या दवाखान्यात दाखल करून त्यांना पुरुषी (हार्मोन्सची)उत्प्रेरकांची इंजेक्शन्स देण्यात आली. धार्मिक नेत्यांशी असलेल्या चांगल्या नातेसंबंधांमुळे मर्यम यांना लवकरच सोडण्यात आले, त्यांनी आपली लिंगबदलाच्या शस्त्रक्रियेसाठी चालू असलेली लढाई पुढे चालू ठेवली. शेवटी त्यांना खोमिनींना भेटणे शक्य झाले, त्या खोमिनीच्या घरी गेल्या तेव्हा त्यांनी पुरुषाचे कपडे घातले होते, एका हातात कुराण घेतले होते. खोमिनीच्या सुरक्षा रक्षकांनी मर्यम यांना अडवले आणि मारहाण करायला सुरूवात केली. पण खोमिनींचा भाऊ मध्ये पडला आणि त्याने रक्षकांना थांबवले. मर्यम पुढचा किस्सा खूप आनंदाने सांगायची की, अय्यातुल्ला यांनी खुल्या मनाने मर्यमचे स्वागत केले आणि रक्षकांवर राग दाखवला. मर्यम यांनी त्यांना एकतर लिंगबदलाच्या शस्त्रक्रियेसाठीचा किंवा मृत्यूदंडाची शिक्षा देण्याचा फ़तवा काढण्याची विनंती केली. त्यावर खोमिनी यांनी लिंगबदलाच्या शस्त्रक्रियेसाठी परवानगी दिली आणि आपल्याकडून मर्यम यांना स्त्रियांचे कपडे आणि हिजाब भेट म्हणून दिला. खोमिनींच्या घरातून मर्यम स्त्री च्या कपड्यात स्त्री म्हणूनच बाहेर पडल्या. १९८६ साली खोमिनीने मर्यम खातून आणि तिच्यासारख्या इतरांसाठी लिंगबदलाच्या शस्त्रक्रियेचा फ़तवा काढला आणि त्यामुळे आता ही शस्त्रक्रिया करणे इराणमध्ये सहज शक्य आहे. आज अनेक एनजीओ आणि सिबिओ येथे ट्रान्स समुदायाच्या हक्कांसाठी काम करत आहेत, इतकेच नव्हे तर त्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत करतात, मानसिक आरोग्यासाठी काम करतात, समुपदेशनाच्या फ़ोन लाईन्स चालवतात.

मला वाटतं की, कट्टरवादी आणि मुस्लिम मुलतत्ववादी, क्विअर समुदायाला फ़ार काळ दाबून ठेवू शकत नाहीत. त्यांनी कितीही क्रूर प्रयत्न केले तरी, विषमलिंगी नसलेल्या अनेक नात्यांच्या प्रकारांना पौर्वात्य जगात मान्यता नसली तरी स्वीकारले जात होते. पूर्वेकडच्या देशांमध्ये, समाजातले विषमलिंगी नसलेल्या लोकांचे अस्तित्व पाश्चात्य व्हिक्टोरियन मूल्यांमुळे मध्यकाळात दिसून येऊ लागले.[३] सादी शिराझी सारख्या प्रसिद्ध परशियन कवीच्या समलिंगी कविता परशियन साहित्यात मानाचे स्थान मिळवून आहेत.[४] या कवितांमध्ये दोन पुरुषांमधील प्रेमाची आणि लैंगिक नात्याची रसभरीत वर्णने आहेत. अगदी कुराणमध्येही स्वर्गाच्या उल्लेखात जसा कुमारी मुलींचा हौरी म्हणून उल्लेख येतो तसाच, कोवळ्या कुमारांचा घिलमन म्हणूनही उल्लेख होतो. त्याच बरोबर राजाच्या हराममधील बायका एकमेकींच्या प्रेमात पडण्याच्या अनेक लोककथा प्रसिद्ध आहेत.

मग आपण नक्की कोणत्या सामाजिक आव्हानांसाठी लढतो आहोत? आपल्याला नेहमी चर्चा होणाऱ्या मुद्दयां व्यतिरीक्त म्हणजे, कायदा नेहमीच सामाजिक नैतिकता आणि राष्ट्रीय सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित करतो पण त्याही पेक्षा वेगळे तीन महत्वाचे मुद्दे आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. ते म्हणजे, आरोग्याच्या सेवा, सामाजिक-राजकिय दृश्यता-ताकद आणि विषमलैंगिक संस्कृतीचे वर्चस्व. पण त्या आधी आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, जरी आपण सगळेच दडपले जात असलो तरीही सगळेच व्यवस्थेचे फ़क्त बळी नाहीयेत. क्विअर समुदायाला आपले स्वत:चे असे कर्तेपण आहे. अर्थातच आपली ताकद आपल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पातळीवर अवलंबून आहे. माझ्यासारखे/सारख्या काहीजण/जणीं उघडपणे आपल्या लैंगिकतेविषयी मोकळेपणाने बोलतात, आमली वेगळी लैंगिकता उघडपणे सांगतात, असेही लोक आहेत. आम्हांला लांबच्या ग्रामीण भागांत राहाणाऱ्या क्विअर व्यक्तींपेक्षा नक्कीच जास्त मोकळेपणा आहे, कुटुंबाचा पाठींबा, आर्थिक सहाय्य आहे. पण तरीही येथे अनेक लपून-छपून चालवले जाणारे सपोर्ट ग्रुप आहेत, समुदायाचे आपल्या स्वत:च्या जागा, गट आहेत. खास करून सध्याच्या इंटरनेटच्या काळात हे सर्व खूपच सोपे झाले आहे.

मला आरोग्याच्या सेवा या आपल्या समुदायासाठी खूप महत्वाच्या वाटतात, कारण माझ्यामते इराणचा विचार करता आरोग्याच्या सेवांच्या खूप समस्या आपल्या समुदायाला भेडसावतात. सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे गेल्या दोन दशकांमध्ये खास करून १९९५नंतरच्या सरकारी भाषेमध्ये समलैंगिकता ही पाप किंवा गुन्ह्यापेक्षा आता आजार म्हणून जास्त प्रकर्षाने पाहिली जाते. इराणमध्ये १८ वर्षांवरील सर्व पुरुषांना दोन वर्षांची सैनिकी सेवा सक्तीची आहे, पण गे पुरुष या सक्तीच्या सेवेमधून वगळले जाऊ शकतात, कारण गे असणे हे अपंगात्वासारखे किंवा मानसिकदृष्ट्या आजारी असल्यासारखेच रोग म्हणून पाहिले जाते. आमच्या देशातील मानसरोगावर इलाज करणाऱ्या संस्था आणि मानस वैद्यकशास्त्रही खूपच समलैंगिकताविरोधी आहे.

मला अगदी रोजच असे फ़ोन येतात ज्यांमध्ये समलिंगी लोकांचे उपचार करून त्यांना बरे करू शकणाऱ्या आधुनिक वैद्यकशास्त्राची जाण असलेल्या मानसरोगतज्ञ किंवा मानसोपचार तज्ञांच्या माहितीची विचारणी केली जाते. या तज्ञांच्या मदतीने त्यांना त्यांच्या मुलाला किंवा मुलीला समलिंगीपणाच्या आजारातून बरे करायचे असते. आमच्या सुदैवाने आमच्याकडे अशी काही नावे आहेत, ज्यांच्याकडे आम्ही अशा पालकांना पाठवतो, जे सीबीओ बरोबर काम करतात आणि स्वत: क्विअर आहेत. आणि त्या पालकांना ते समजावतात. पण अशा तथाकथित समलैंगिकतेचा आजार बऱ्या करण्याच्या प्रयत्नांमुळे अनेक लोकांना मानसिक आजारांना सामोरे जावे लागते किंबहुना अनेकांची आत्महत्या करण्यापर्यंत वेळ येते.

दुसरा मुद्दा सामाजिक ताकद आणि दृश्यतेचा आहे. आमच्या देशात अशी खास चळवळ म्हणता येईल अशी काही चळवळ लैंगिकतेच्या मुद्याला धरून नाही. शिवाय कोणत्याही प्रकारची चळवळ सुरू करण्याचा कोणताही अगदी लहानसा प्रयत्नसुद्धा लागलीच क्रुरतेने चिरडून टाकला जातो. अगदी तीच परिस्थिती जी कोणत्याही निरंकूश राष्ट्रात असते आणि इतर निरंकूश राष्ट्रांपेक्षा आमच्याकडे वेगळे काही करत नाहीत. या मुळेच स्थानिक एलजीबीटी कार्यकर्ते इराणच्या बाहेर सामाजिक आश्रय मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत, अशा प्रकारचा आश्रय मिळवण्यासाठी त्यांना अमेरिकेसारख्या तथाकथित मोकळ्या विचारांच्या देशांकडून आर्थिक सहाय्यही केले जाते. अशी कामे करणाऱ्या सामाजिक संस्थाही अस्तित्वात आहेत. अमेरिकेसारख्या मुक्त विचारांच्या देशांकडून इराणसारख्या मागासलेल्या देशांमध्ये सत्तापालट करण्याच्या अनेक प्रयत्नांमध्ये अशा प्रकारची मदत देणे अंतर्भूत आहे. त्यामुळे एका बाजूला आमच्या देशातील क्विअर समुदाय स्थानिक इस्लामिक एकाधिकारशाही आणि इतर देशांवर सत्ता मिळवण्याची महत्वाकांक्षा असलेल्या देशांच्या प्रयत्नांमध्ये अडकलेला आहे. त्यात आमचा शत्रू कोण आणि मित्र कोण हे तपासणे खूपच अवघड आहे.

आणि शेवटाकडे आपण जरा अवघड असलेल्या विषमलैंगिक वर्चस्वाच्या मुद्याकडे वळूयात. यामुळे पूर्ण एलजीबीटी समुदायच पण जास्त प्रमाणात ट्रान्स समुदायाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. कारण, ट्रान्स असणे आणि हार्मोन्स थेरपी न करणे आणि लिंगबदलाची शस्त्रक्रिया न करणे शक्य नसते. ट्रान्स समुदायाच्या व्यक्तिंना आपल्या आयुष्यात लवकरात लवकर शस्त्रक्रिया आणि उत्प्रेरक उपचार करून घेण्याची आवश्यकता असते.(अर्थात याची त्यांच्यावर कसलीही जबरदस्ती नसते पण ते करुन घेणे त्यांच्या अस्मितेचा महत्वाचा भाग असतो.) या शस्त्रक्रिया आणि उत्प्रेरक उपचारानंतर समाजात त्यांना स्वीकारले जाणे अगदी त्यांच्या ट्रान्स समुदायामध्ये सुद्धा त्यांना स्वीकारले जाणे खूप महत्वाचे असते. ट्रान्स व्यक्तींना लिंगभावांमध्ये निवड करावी लागते आणि या निवडीच्या गोंधळात त्यांच्या मानसिक आणि शारिरीक स्थितीवर त्याचे वाईट परिणाम होतात. लिंगबदलाची शस्त्रक्रिया इराणमध्ये फ़ार सुधारित किंवा आधुनिकही नाही, इराणमध्ये ट्रान्स लोकांच्या आणि क्विअर समुदायाच्या आरोग्याच्या सेवांचा प्रश्न असल्याने, तसेच लैंगिकतेच्या मुद्यांवर असलेल्या बंधनांमुळे, अशा शस्त्रक्रिया इराणमध्ये करणे सोयीचे नाही. म्हणूनच मर्यम खातून यांनी आपली लिंगबदलाची शस्त्रक्रिया

थायलंडमध्ये केली.

पण, या सगळ्या काळ्या अंधारात मी आशेचा किरण सोडत नाही, मला अशी आशा आहे की, या काळ्या अंधाराच्या दुसऱ्या टोकाला नक्कीच उजेड आहे, मला माहीत आहे, की मी माझ्या आयुष्यात कधीही सक्रीय क्विअर चळवळ बघू शकणार नाही किंवा, मला कधी इराणमध्ये प्राईड मार्च बघायला मिळणार नाही. पण मला ते कधीतरी घडेल या आशेसाठी लढण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही. माझी काकू, माझ्या आईची लहान बहिण, यांना मी माझ्या लहानपणीच राजकिय तुरुंगवासातच देहदंडाची शिक्षा झाल्याचे पाहिले आहे. तो काळ राजकिय कैद्यांना मोठ्या संख्येने मारले जाण्याचाच होता.[५] माझ्या मावशीला मी जन्माला आले तेव्हा तुरुंगात टाकण्यात आले होते, मी लहान असताना तिला तुरुंगात जाऊन भेटल्याचे आठवतेही, तिच्याबद्दलच्या माझ्या आठवणी तशा पुसटही आहेत.

तिला गोळ्या घालून मारले जाण्यापूर्वी तिने आम्हांला लिहिलेल्या पत्रात, ती म्हणाली होती, आपल्यासाठीचे सुरक्षित घर आपल्या वाटेवर आहे, तिथे शांतता आणि आत्मसन्मानही आहे, सध्या जरी वातावरण वादळाने गढूळ झालेले असले तरीही आपण जेव्हा किनाऱ्यावर सुरक्षित पोहोचू तेव्हा आपण जिवंत असू किंवा मेलेले. आपल्याला फ़क्त एवढेच लक्षात ठेवायचे आहे की, एक दिवस असा येणार आहे जेव्हा मुक्त जगावर माणूसकीचे राज्य असेल.

मी सुद्धा त्याच दिवसाची वाट पहाते आहे, कदाचित मी तो दिवस पाहू शकणार नाही तरीही. . .

**संदर्भ**

[१] https://en.wikipedia.org/wiki/Fereydoun_Farrokhzad

[२] https://en.wikipedia.org/wiki/Maryam_Khatoon_Molkara

[३] https://www.gaystarnews.com/article/secret-gay-history-islam/

[४] https://en.wikipedia.org/wiki/Saadi_Shirazi

[५] https://en.wikipedia.org/wiki/1988_executions_of_Iranian_political_prisoners

# परत एकदा सावधान !!!

**बिंदुमाधव खिरे**

लेखक LGBTIQ ॲक्टीव्हीस्ट आहेत.



**बिंदुमाधव खिरे**

**मला अनेक तरुण समलींगी मुलं, तृतीय पंथी भेटतात ज्यांना एचआयव्हीची लागण गेल्या २-४ वर्षात झाली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे कि तरुण पिढी पर्यंत एचआयव्ही व एसटीआयचं गांभीर्य पोहचलं नाही. या लेखात काही महत्त्वाच्या गोष्टी मी परत सांगतोय. आतातरी जरा गांभीर्यानं घ्या!!!**

२००० च्या दशकात माध्यमांमध्ये एचआयव्ही व एसटीआय (लैंगिक संबधातून पसरणारे आजार) बद्दल बोललं जातं होतं. एचआयव्हीवर काम करणारी एआरटी औषधं मोफत उपलब्ध झाली. जसं एचआयव्ही विषयाचं नाविन्य कमी झालं तस तसं या आजारांवरचं लक्ष कमी झालं. आता हे विषय एआरटी औषधाचा तुटवडा जाणवायला लागल्यावर किंवा '१ डिसेंबर' (जागतिक एचआयव्ही प्रतिबंध दिन) पुरते मर्यादीत राहिले आहेत.

**एचआयव्ही**

पण आजही (२०२० साली) मला अनेक तरुण समलींगी मुलं, तृतीयपंथी भेटतात ज्यांना एचआयव्हीची लागण गेल्या २-४ वर्षात झाली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, की तरुण पिढी पर्यंत एचआयव्ही व एसटीआयचं गांभीर्य पोहचलं नाही. या लेखात काही महत्त्वाच्या गोष्टी मी परत सांगतोय. आतातरी जरा गांभीर्यानं घ्या!!!

समोरच्याला एचआयव्ही चा संसर्ग झालाय का नाही हे बघून कळत नाही! अनेक वर्षे एचआयव्ही संक्रमीत (HIV+) व्यक्तीमध्ये कोणतीही लक्षणं दिसत नाहीत. म्हणून दिसायला चांगला आहे, बॉडी छान कमावलीय म्हणजे त्याला एचआयव्ही ची लागण नसणारच असा समज बाळगू नका!

समलिंगी तृतीयपंथी समाजात एचआयव्ही ची लागण होण्याचा सर्वात मोठा मार्ग असतो, तो म्हणजे एचआयव्ही संक्रमीत पुरुषाबरोबर किंवा तृतीयपंथी बरोबर असुरक्षित म्हणजे निरोध न वापरता गुदमैथुन करणं. समलिंगी संबंधात गुदमैथुन करणार असाल (मागून सेक्स करणार असाल) तर 'टॉप' नी ('संभोगात पुरुषाची भुमिका घेणारा') न चुकता निरोध (कोंडोम) चा वापर करायचाच! जर 'टॉप' बिना कंडोमच्या संभोगाची मागणी करत असेल तर 'बॉटम' नी ('संभोगात स्त्रीची भुमिका घेणारा') स्पष्ट पणे नकार द्यावा.

**काही एचआयव्ही संक्रमीत (HIV+) समलिंगी पुरुष व तृतीयपंथी आहेत जे मुद्दामहून बिन कंडोमचा इतरांबरोबर संभोग करतात, जेणेकरून इतरांनाही एचआयव्ही ची लागण होईल. सावधान!!**

आपणं अनेक जाहिराती बघतो ज्यात 'एचआयव्ही/ एड्स संपूर्णपणे बरा होतो' म्हणून सांगितलं जातं. या जाहिराती फसव्या आहेत. लक्षात ठेवा एकदा एचआयव्ही ची लागण झाली की एचआयव्ही आयुष्यभर आपल्या शरीरात राहतो.

आपण बिनाकंडोम चा गुदमैथुन केला असेल तर अशा शेवटच्या असुरक्षित संभोगानंतर ३ महिन्यांनी एचआयव्ही ची चाचणी करून घ्या. ही चाचणी सरकारी दवाखान्यातील आयसिटीसी (इंटीग्रेटेड काऊन्सलींग अॅन्ड टेस्टींग सेंटर) मध्ये मोफत उपलब्ध आहे.

जर एचआयव्ही ची लागण झाली तर लगेच एचआयव्ही वर नियंत्रण ठेवण्याचा गोळ्या (यांना एआरटी औषधं म्हणतात.) सुरु करा. या गोळ्या तुम्हाला आयुष्यभर न चुकता डॉक्टरांच्या सल्यानुसार घ्यावा लागतात. या गोळ्या सरकारी दवाखान्यात मोफत उपलब्ध आहेत.

तुम्हाला खाजगी प्रयोगशाळेमध्येही एचआयव्ही ची चाचणी करता येते व एआरटी औषधं खाजगी एचआयव्ही स्पेशालिस्ट डॉक्टरांकडूनही घेता येतात.

**एचआयव्ही संक्रमीत व्यक्तीचे चुंबन घेतल्याने एचआयव्हीची लागण दुसऱ्या व्यक्तीला होत नाही.**

## एसटीआय (लैंगिक संबंधामधून पसणारे आजार)

एचआयव्ही व्यतिरिक्त लैंगिक संबंधामधून पसणारे अनेक आजार आहेत. (एसटीआय) यातील काही आजारांची थोडक्यात माहिती खाली दिली आहे.

**परमा** (गनेरिया/क्लमायडिया) हा आजार असलेल्या व्यक्तींसोबत असुरक्षित गुदमैथुन किंवा मुखमैथुन (लिंग तोंडात घेणं) केल्यानं होतो.

लिंगाला लागण झाली तर लिंगातून पाण्यासारखा किंवा पांढरा, हिरवा थेंब थेंब स्त्राव येऊ लागतो. त्याला कुबट वास येतो. पूर्ण अंडरपॅन्ट ओली होईल इतक्या प्रमाणातही हा स्त्राव येऊ शकतो. इतर लक्षणं– लघवीला जळजळ होणं, अंडकोशांना (गोट्यांना) सूज येणं. डोळ्यांची जळजळ होणं, सांधे दुखणं.

जर लिंगाला लागण झाली व त्याच्या वर मुखमैथुन केलं तर घशातही या आजाराची लागण होते. लक्षणं – घसा दुखणं, गिळायला त्रास होणं.

ही लक्षणं दिसल्यावर लगेच अॅलोपॅथिक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विशिष्ट अँटीबायोटिक्स घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होतो.

**जनायटल वार्टस :** हा आजार असलेल्या व्यक्तीसोबत असुरक्षित गुदमैथुन केल्याने हा आजार होतो.

लिंगावर किंवा गुदावर न दुखणारे गव्हासारखे किंवा फ्लॉवर सारखे कोंब येतात ते दुखत नाहीत पण काही वेळा त्यातून रक्त येतं. गुदावरच्या कोंबांकडे दुर्लक्ष केलं तर ते गुदात आत पसरू लागतात व अशा वेळी शस्त्रक्रिया करून ते काढावे लागतात.

या आजाराला गोळ्या, इंजेक्शन औषधं नाहीत. एका विशिष्ठ रसायनाने ते कोंब जाळावे लागतात.

**गरमी** (सिपिलीस्स) हा आजार असलेल्या व्यक्तीसोबत असुरक्षित गुदमैथुन किंवा मुखमैथुन केल्याने हा आजार होतो.

लिंगावर एक न दुखणारा व्रण/फोड/जखम होते. ती काही काळानी आपोआप जाते. पण तो आजार रक्तात वाढत राहातो. काही वर्षांनी तळ हातावर, पाठीवर लाल पुरळ दिसतात. हा आजाराचा दुसरा टप्पा. ते पुरळही आपोआप काही आठवड्यात जातात. मग काही वर्षांनी तिसरा टप्पा दिसतो. या टप्प्यामध्ये त्या व्यक्तीला मेंदूचे

आजार, हृदयाचा आजार होऊ शकतो व ती व्यक्ती दगाऊ शकते.

या आजारावर विशिष्ठ इंजेक्शन किंवा गोळ्यांनी उपचार केले जातात. उपचार ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली घ्यावे.

**शँक्रॉइड :** हा आजार असलेल्या व्यक्तीसोबत असुरक्षित गुदमैथुन किंवा मुखमैथुन केल्याने हा आजार होतो.

लागण होते तिथे अत्यंत वेदना होणाऱ्या जखमा होतात.

या आजारावर ॲन्टीबायोटिक गोळ्यांनी उपचार केले जातात. उपचार ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली घ्यावे.

**हे सर्व आजार फक्त समलिंगी संबंधातूनच होतात असं नाही. जर पुरुष किंवा स्त्री मध्ये असा कोणता आजार असेल तर त्या व्यक्तीपासून पुरुष – स्त्री संभोगातूनही (योनीमैथुन, गुदमैथुन, मुखमैथुन) हे आजार पसरतात.**

एचआयव्ही किंवा एसटीआय बद्दल अधिक माहिती हवी असल्यास संपर्क साधा :

**ईमेल:** bindumadhav.khire@gmail.com

**बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन**

**हेल्पलाईन :** ९७६३६४०४८० (सोमवारी संध्याकाळी ८ ते ९ फक्त. इतर वेळी कॉल घेतले जाणार नाहीत.)

**हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !**

## केईएम हॉस्पिटल (रास्ता पेठ, पुणे)

यांनी वैद्यकीय सेवेत
समलिंगी, द्विलिंगी, तृतीयपंथी समावेशक धोरण *
बनवण्यास प्रारंभ केल्याबद्दल
त्यांचे
**हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !**



**शुभेच्छुक**

## बिंदू क्विअर राइटस फाऊंडेशन (पुणे)

* हे धोरण बनवण्यास त्यांना तांत्रिक साहाय्य
‘बिंदू क्वीअर राइटस फाऊंडेशन’ करत आहे.

# कविता

## उभारणं

लहानपणी होती मला
भांडीकुंडी खेळण्याची आवड
पण 'मुलींचा तो खेळ' म्हणून,
करता आलीच नाही त्याची निवड.

घरचे नेहमी म्हणायचे
मुलासारखा वाग,
बुरसटलेल्या समाजविचारांचा
'ते'ही होते एक भाग!

शाळेत असताना मुलींमध्ये खेळण्यात
होऊन जायचो मी गर्क,
मुले मात्र तेव्हापासूनच
लावू लागले होते तर्क.

हळू हळू मोठे होतां
लागले सगळे कळू,
सर्वजण सारखे नसतात
याचे पुरावे लागले मिळू.

अस्तित्वाचा शोध घेण्याची
येऊन ठेपली वेळ,
तेव्हा मात्र समजला
नियतीचा हा सारा खेळ.

स्वतःबद्दल समजले जेव्हा,
आली मोठी निराशा
'मीच असा का?',
हीच मोठी हताशा.

समजून घेऊ लागलो पुन्हा
या जगताचे दुवे,
मग समजले हा शाप नव्हे,
हे 'वरदान' नवे!

सोपं कधीच नव्हतं मात्र
हे सगळं स्वीकारणं,
अजूनही बाकीच आहे
'समलैंगिक' म्हणून उभारणं!



**© कुणाल धोंडगे**
पुण्यात बी. टेकचं शिक्षण घेत आहेत. इतिहासाची आवड.
**ईमेल :** dhondgekunal119@gmail.com

# कविता

## सक्ती....

उदासतेच्या जिवंतपणाला-
इथे जगायची पण सक्ती आहे
आणि मरायची पण सक्ती आहे
आपले लैंगीकत्व लपवुन नेहमी
मर्द बनायची पण सक्ती आहे.

स्त्रीसुलभ भावना असल्या तरीही
मित्रां बरोबर रंगेलपणा करून
मुलीलाच पटवण्याची सक्ती आहे
आपल्याला पटत नसतानाही
पटवून घेण्याची पण सक्ती आहे

पुरुषी देहात स्त्री मन असलं तरीही
पौरूषत्व गाजवत पुरूष बनून
स्त्रीत्व नाकारण्याची सक्ती आहे.
मनातल्या विचारांचा गोंधळ लपवून
मर्द बनायची पण सक्ती आहे.

सेक्सचे प्रश्न मनात उद्भवले तरीही
परंपरांचा बागुलबुवा दाखवून
गप्प बसण्याची पण सक्ती आहे
कंबरे खालचे आजार दाबवून
सहन करण्याची पण सक्ती आहे.

एका मुलीचं जीवन विखुरतंय तरीही
आपलं समलैंगिकपण लपवत
तिच्याशी लग्न करायची सक्ती आहे
शरीरसुखाचा आजीवन उपवास करत
आयुष्य ढकलायची पण सक्ती आहे.

योनि लिंग आवडत नसलं तरीही
मनाविरुद्ध आवड निर्माण करून
त्यात लिंग घुसवण्याची सक्ती आहे
घराण्याला वारस देण्यासाठी मात्र
बाप बनायची पण सक्ती आहे.

पंख पसरवुन उडावसं वाटलं तरीही
समाजात मात्र इज्जत वाचवण्याठी
पंख छाटून जटायु होण्याची सक्ती आहे.
आपल्या मनाला मुरड घालून उदासीने
समाजाप्रमाणे जगायची पण सक्ती आहे

कीती वाटलं ओरडावं धिक्कारावं तरीही
आपल्या जीवनाला आपणच कवटाळून
समलिंगीपण धिक्कारण्याची सक्ती आहे
हे ओरडणे आपल्याच घशात बंद करून
सुरात सूर मिळवण्याची पण सक्ती आहे

आपल्या लैंगिकतेचा शोध कळला तरीही
आपलंच अस्तित्व आपणच नाकारत
प्रवाहा बरोबर पोहण्याची सक्ती आहे
आपला प्रवास कुटुंबाच्या डांबरीकरणावर
ओढत रडत पार करण्याची पण सक्ती आहे

अर्धवट जीवन घेऊन जन्माला आलो तरीही
अर्धी अर्धी दोन मानसिकता सांभाळतच
अर्धवट जीवन जगण्याची पण सक्ती आहे
आपल्या अर्धवटीला आपल्यातच दफन करून
अर्धवट जगून पूर्ण मरण्याची पण सक्ती आहे.

**© संतोष उदमले**
**ईमेलः** s.udmale@yahoo.com



# माझं आदिवासी गाव

**© विजया वसावे**

**विजया वसावे**

**मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते कारण येथे सपाटीकरण करून शेती नाही, तर डोंगर उतारावरील शेती असल्याने पावसाच्या पाण्यावर शेती केली जाते. तीही ४ महिने त्यानंतर हिवाळ्यात येथील काही लोक गुजरात येथे ऊस तोडणीचे काम करण्यासाठी निघून जातात.**

मी वसावे विजया. मी ट्रान्सवुमन आहे. मागच्या समपथिक दिवाळी अंकात (२०१९) मी माझं आत्मकथन दिलं होतं. या वेळी मी ज्या ठिकाणी राहाते म्हणजेच आदिवासी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या सातपुड्यातील नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात काय समस्या आहेत ते मांडते आहे.

चरूहश गाव दहेल. हे गाव ३००० हजार लोकांची वस्ती असलेल गाव आहे. दहेल या गावापासून मोलगी हे गाव १५ मैलांवर आहे आणि अक्कलकुवा हे ६० मैलांवर आहे. मोलगी व धडगाव ही त्यातल्या त्यात जवळची छोटेखानी बाजारपेठेची ठिकाणं. दहेल, सरी, मोगरा, चिखली, वालंबा, डनेल, जागठी, वडफळी, सिपान इ. येथील लोकांची भाषा भिलरी आहे व येथील भाषा ही साधारणत: सारखी आहे.

सातपुडा म्हटले की डोंगर कपारीतली ती विरळ वस्ती, कुठं पिण्याच्या पाण्यासाठी दिवसभराची वणवण, तर कुठं पोटापाण्यासाठी भाकर, कुठं स्थलांतरीत मजूर, कुठं कुपोषित बालकांचा प्रश्न, नर्मदा विस्थापितांचे प्रश्न, असे अनेक ज्वलंत प्रश्न आपले डोके वर करून असतात. येथील शहरात पिण्याचे पाणी शुध्द करून पिण्यासाठी वापरले जाते परंतु या ठिकाणी पाणी शुध्द करण्यासारखं साधन उपलब्ध नाही. त्यामुळे या ठिकाणी येथील अनेक लोक हे वाहत्या नदी वा नाल्यातील पाणी, बाजूला खड्डा काढून, त्यात जमा होणारं पाणी पिण्यासाठी वापरतात.

मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते कारण येथे सपाटीकरण करून शेती नाही, तर डोंगर उतारावरील शेती असल्याने पावसाच्या पाण्यावर शेती केली जाते. तीही ४ महिने. त्यानंतर हिवाळ्यात येथिल काही लोक गुजरात येथे ऊस तोडणीचे काम करण्यासाठी निघून जातात.

शाळा : जि. प. प्राथमिक शाळा आहे पहिली ते ४ थी पर्यंत व एक आश्रम शाळा पहिली ते सातवी पर्यंत आहे. परंतु शाळेत ना शिक्षकांचा पत्ता असतो ना मुलांचा असतो. शाळा भरली तरी दिवसात जेमतेम चार पाच तास, मग सुट्या दिल्या जातात. पदवीधर झालेली मुलं ही क्वचीत आढळतात. एका गावात फक्त ७ ८ मुलं असतील.

रस्ते : रस्ते तयार झाले तर सहा-सात महिन्यांत त्या ठिकाणी रस्ता होता की नव्हता हेच कळून येत नाही. त्यामुळे या ठिकाणी रस्ते हे असून नसल्यासारखे

आहेत. सबंध गावात मोजून १३ ते १४ जणांकडेच मोटर सायकल आहेत व इतरांना खाजगी जीपने गावातून बाजारपेठेत जावं लागत.

शहरात आजारी माणसांना घेऊन जाण्यासाठी गाडी मागवली जाते परंतु सातपुड्यातील अनेक गावांत लोकांसाठी ॲम्ब्युलन्स नावाची गोष्टच नाही. काही ठिकाणी कोणी आजारी पडलेच तर आजारी लोकांना बांबूची झोळी बांधून पायी दवाखान्यात नेले जाते.

या अनेक समस्यांमध्ये अजून तीन समस्यांनी आपली जागा पक्की केली आहे. त्या म्हणजे वीज, रस्ते आणि दूरसंचारचे तीन तेरा वाजले आहेत. त्यामुळे जगाशी संपर्क जवळपास शून्यच.



माझ्या गावाकडचा प्रवास

वीज : आज शहरात एक तास लाईट गेली की लोक कासावीस होतात. आमच्याकडे तार ओढलेले लाईटचे खांब दहेल व दहेलच्या आजूबाजूला असणाऱ्या गावांमध्ये दिसून येत असले तरी विजेचा तो देखावा आहे. उदा जर मोबाईल चार्जीग करण्यासारखे काही उपकरण घरात वापरले जात असेल तर मोलगी या ठिकाणी ज्या दिवशी लाईट आहे म्हणून माहित पडते त्या दिवशी त्या ठिकाणी जाऊन मोबाईल विकणाऱ्या दुकानामध्ये पैसे (१० रु) देऊन ती उपकरणं चार्ज करून घेतली जातात.

बँक : 'बँक ऑफ महाराष्ट्र' ही मोलगी या ठिकाणी असलेली एकमेव बँक आहे. परंतु बँकेत कधी लाईटचा प्रश्न असतो तर कधी पैसे नसतात.

हॅलो, हॅलो : जग ४ G ची सेवा ओलांडून ५ G च्या सेवेकडे वेग घेत असतांना आमच्याकडे नेट चालवायचा प्रश्न तर सोडाच पण साधा फोन करायला रेंज नसते. आज जगभरात कोरोना महामारीने मानवी जीवनात धुमाकूळ घातलेला असल्याने सर्व शाळा महाविद्यालयांचे नवीन शैक्षणिक वर्षं सुरु झालेले आहे. तेही ऑनलाईन पद्धतीने. तर आमच्याकडे ऑनलाईन अभ्यास कसा करावा हा मोठा प्रश्न आहे. ऑनलाईन वर देण्यात


येणारे धडे पाहण्यासाठी येथील मुलांना ज्या ठिकाणी मोबाईलचं नेटवर्क असेल त्या ठिकाणी जाऊन ते धडे पाहावे लागणार आहेत. ऑनलाईन अभ्यास तर दूरची गोष्ट; टॉवर नाही तर रेंज कुठून येणार? मग शेवटी प्रश्न हाच की ग्रामीण विद्यार्थांचे काय? एक साधा Whatsapp चा संदेश बघायला डोंगरावर २०-२५ चकरा माराव्या लागतात.

BSNL ही एकमेव दूरसंचार कंपनी आता कुठेतरी Gio टॉवर उभे करतांना दिसून येत आहे. परिस्थिती अशी आहे की, एखादा माणूस एखाद्या पुणे मुंबई सारख्या ठिकाणी राहात असेल आणि त्यांना काही घरी काम असेल तर गावातील एखादा मोबाईल वापरणारा माणूस नेटवर्क असेल त्या ठिकाणी आला असेल तर त्याच्याकडे घरच्यांना फोन करायला सांगा म्हणून निरोप पाठवावा लागतो व त्यानंतर जेव्हा घरातील व्यक्तीचा फोन येईल तेव्हा जे काम असेल ते घरच्या माणसांना सांगावे लागते.

LGBTIQ : या समुदायाविषयी येथे कोणालाच काही माहिती नाही. माझ्या कुटुंबाव्यतिरिक्त या ठिकाणी कोणत्याच कुटुंबामध्ये या विषयावर चर्चा पाहायला मिळाली नाही. आमच्या इलाक्यातील लोक हे शहरी भागापासून खूप अलिप्त असल्याचे दिसते. तालुक्याच्या ठिकाणी यात्रा भरते त्यावेळेस हिजडा समुदायातील काही लोक बाजार मागतात तेवढीच माहिती येथील लोकांमध्ये दिसून येते, त्यामुळे या LGBTIQ व्यक्तींना स्वत:च्या मनाची होणारी घुसमट कोणा समोरही व्यक्त करता येत नाही. जिथे या मूलभूत गोष्टींची वानवा आहे, तिथे LGBTIQ बद्दल माहिती, जनजागृती कधी होणार?

# कोविड योद्धा

## अनुभवकथन



डॉ. अक्षय रामदास रौंधळ

**© डॉ. अक्षय रामदास रौंधळ**
वय २५. पेशाने डॉक्टर. 'द हमसफर ट्रस्ट' मध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून कामाचा अनुभव. सध्या ते बालरोगतज्ज्ञतेचे पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत.
**ईमेल** : akshay.r.raundhal@gmail.com

**मराठी भाषांतर : पुष्कर एकबोटे**
अभियांत्रिकीत पदवी घेतली आहे. संरक्षण आणि सामरिकशास्त्र विषयाचा अभ्यागत अधिव्याख्याता आहे. बहुभाषिक भाषांतरकार आहे.
**ईमेल** : pushkarekbote@gmail.com



पुष्कर एकबोटे

**सहसा नवे तरूण डॉक्टर जेवढे मृत्यू पाहतात त्यापेक्षा जास्त मृत्यू होत होते. मी रूग्णांना त्यांच्या शेवटच्या घटकेला त्यांच्या प्रियजनांना पाहण्यासाठी विनवणी करताना, त्यांच्या हातापर्यंत पोहोचताना पाहिलं. बऱ्याचदा माझ्याकडून त्यांना त्यांच्या अखेरच्या काही मिनिटांसाठी माझा हात आणि दिलासा दिला गेला. खरं तर तुम्ही शक्य ते सर्व काही केलं आणि तरीही त्यांना वाचवू शकला नाहीत..**

लॉकडाऊनच्या मध्यात 'द हमसफर ट्रस्ट' बरोबरील माझं काम चालू होतं पण ते साथीच्या आधीच्या काळा इतकं नियमीत नव्हतं. माझे वरिष्ठ, संदीप माने यांनी मला विचारलं, तू कोविड रूग्णालयात स्वयंसेवक म्हणून का काम करत नाहीस?. पुढील काही दिवसात माझी आई आणि माझ्या दूरच्या नातेवाईकांचा पण हाच प्रश्न होता. मी स्वतःला विचारलं मला का शक्य नाही ?मी घाबरलो होतो. डॉक्टरांशी गैरवर्तन झाल्याच्या अनेक कथा मी ऐकल्या होत्या. मला माहित नाही की माझ्यात काय जागृती निर्माण झाली पण मी दुसऱ्या दिवशी वैद्यकीय अधिक्षकांच्या खोलीत होतो आणि मुख्यमंत्री कार्यालयातून आलेल्या कोविड योद्ध्यासंबधी कॉलला उत्तर देत होतो.

मला अजूनही माझा पहिला दिवस आठवतो. तो सोमवार होता. दोन वाजता मी वैयक्तिक संरक्षणासाठीची उपकरणे (पी.पी.ई.) परिधान केली ज्याने माझी उणीपुरी पंधरा-वीस मिनिटं खाल्ली. मी वॉर्डात प्रवेश केला आणि मला आण्विक युद्धक्षेत्रात असल्यासारखं वाटू लागलं. कॉरिडॉर मध्ये भयानक शांतता होती पण वॉर्ड, बाजारासारखा व्यग्र होता. एक पाऊल आत टाकलं आणि परिचारिकेने माझ्याकडे दिल्या गेलेल्या कामाची यादी माझ्या हातात ठेवली. मी काम सुरू करून १५ मिनिटं देखील झाली नव्हती आणि मला हातमोजे घामानं भरल्याचं जाणवू लागलं. मुखपट्ट्यांमुळे सहसा श्वास घ्यायला त्रास होत नाही पण जेव्हा तुम्ही दोन वापरता तेव्हा ते त्रासदायक ठरू शकतं. श्वास जोरात घेण्याचा प्रयत्न केल्यास पी. पी. ई. गॉगल धुरकटायचे आणि माझ्या उरलेल्या कामाच्या तासात माझी दृष्टी धूसर व्हायची. दूषित होण्याच्या भितीने मी माझे हातमोजे घातलेले हात चेहऱ्यावरील काहिही ठीक करण्यासाठी वापरू शकत नव्हतो.

मी दररोज रूग्णांशी संवाद साधायचो. त्यातील बहुतेकांना या विषाणूची

अजिबात भीती वाटत नव्हती. ते येऊ घातलेल्या उपासमार आणि आर्थिक संकटामुळे भयभीत होते. त्यातील काही जण महिन्याहून जास्त काळ भरती होते आणि तरीही त्यांची इच्छाशक्ती बलवान होती. जेव्हा त्यांना सोडण्यात आले तेव्हा त्यांची कृतज्ञतेची भावना, 'हॅलो!' म्हणण्यासाठी त्यांच्या घरच्यांना केल्या जाणाऱ्या व्हिडीओ कॉल वर येण्यासाठी मला विचारणा करणं, त्यांच्या घरून आलेल्या डब्यातील एक घास खाण्याची विनंती करणं, त्यातील काही जणांनी माझी तीन तास सलग चाललेली धावपळ पाहून, मला काही मिनिटे पलंगावर बसायला लावलं, या सर्वांमुळे माझा थकवा कमी होत असे आणि मी अधिक उत्साहाने काम करू शकायचो. सहसा नवे तरूण डॉक्टर जेवढे मृत्यू पाहतात त्यापेक्षा जास्त मृत्यू होत होते. मी रूग्णांना त्यांच्या शेवटच्या घटकेला त्यांच्या प्रियजनांना पाहण्यासाठी विनवणी करताना, त्यांच्या हातापर्यंत पोहोचताना पाहिलं. बऱ्याचदा माझ्याकडून त्यांना त्यांच्या अखेरच्या काही मिनिटांसाठी माझा हात आणि दिलासा दिला गेला. खरं तर तुम्ही शक्य ते सर्व काही केलं आणि तरीही त्यांना वाचवू शकला नाहीत, ही एका डॉक्टरसाठी व्यर्थतेची भावना असते जी नैराश्याचा सर्वोच्च बिंदू असते. हे काम शरिरिकदृष्ट्या नक्कीच धावपळीचं होतं. पण मानसिकदृष्ट्या ते पूर्ण थकवणारं होतं. दररोज कामानंतर हॉटेलमधील तुमच्या रिकाम्या खोलीत जाणं तुमच्यात एक प्रकारची पोकळी निर्माण करतं जी तुम्ही भरू शकत नाही. प्रत्येक दिवस तुम्ही योग्य केलं का ह्याच्या पर्यायांच्या चिंतनात गेला.

असे काही दिवस होते ज्यांनी मला आशा दिली. मी माझ्या काही रूग्णांना मरणाच्या दारात जाण्याचा अनुभव आल्याचं पाहिलं. त्यांच्यापैकी एक जण भ्रमिष्ट झाला आणि माझ्यावर धावून आला, आणि स्वतःच्या मुलांना भेटण्यासाठी गयावया करू लागला, त्याचा शेवट जवळ आला असं त्याला वाटत होतं. माझं काम संपल्यावर मला खूप सुन्न वाटत होतं.मला वाटत होतं की तो ही रात्र काढू शकणार नाही. पण आश्चर्य म्हणजे, तो तरला आणि काही दिवसांतच मला तो रोगमुक्त होण्याची लक्षणे दिसू लागली.फेरी मारताना, रूग्णाची विचारपूस करताना आणि त्यांना धीर देताना, ते रूग्ण जणूकाही आमचे कुटुंबीय झाले.

नेहमी तत्पर असणाऱ्या परिचारिका, वॉर्डबॉय आणि सेवकांच्या सहाय्यामुळे माझं काम सुकर झालं. आता तीन महिन्यानंतर घरी परतल्यावर, हमसफर कुटुंबाबरोबर माझं काम चालू ठेवत माझ्या नेहमीच्या आयुष्याकडे परतत असताना मला जरा वेळ लागत आहे. मानसिकदृष्ट्या पूर्वपदावर येण्यासाठी मला जवळपास एक महिना लागला. ह्या जगद्व्यापी साथीनं अनेकांना अकल्पनीय मार्गांनी प्रभावित केलं आणि मागे वळून पाहताना हा अनुभव कायम माझ्या स्मरणात राहील.कारण एका डॉक्टरला एक चांगला मनुष्य बनण्यासाठीचे समानुभूती आणि करूणेचे मौल्यवान धडे मी शिकलो.

# तृतीयपंथीयांच्या (ट्रान्सजेंडर) अधिकारांचा प्रवास



बिंदुमाधव खिरे

लेखक LGBTIQ अॅक्टीव्हीस्ट आहेत.

**विधेयक – क्रिमीनल ट्राइम्स अॅक्ट १८७१**

तृतीयपंथी समाज संभाव्य गुन्हेगार म्हणून ठरवण्यात आला. त्यांची नावे, पत्ता, संपत्तीची नोंदणी करण्याचे अधिकार पोलीसांना दिले गेले. सर्व तृतीयपंथी समाजातील व्यक्ती गुदमैथुन करतात (जो गुन्हा होता) चोऱ्या करतात व मुलांना पळवतात ही ब्रिटीशांची दृष्टी होती.

↓

**क्रिमीनल ट्राइम्स अॅक्ट १८७१ रद्द करण्यात आला**

स्वातंत्र्यानंतर, ऑगस्ट १९४९ साली क्रिमिनल ट्राईम्स अॅक्ट (१८७१) कायदा रद्द करण्यात आला. व नवीन कायदा करण्यात आला, ज्यात तृतीयपंथी समाज हा उल्लेख वगळण्यात आला होता.)

**देशातील पहिले तृतीयपंथी कल्याणकारी मंडळ**

एप्रिल २००८ साली तामिळनाडू राज्यानी देशातील पहिल्या तृतीयपंथी कल्याणकारी मंडळाची (ट्रान्सजेंडर वेलफेअर बोर्ड) स्थापना केली.

२०१२

सर्वोच्च न्यायालय (SC)

WP(C) क्र. ४००/२०१२

{NALSA विरुध्द भारत सरकार}

तृतीयपंथी व्यक्तींना कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी NALSA ची जनहित याचिका दाखल

↓

१५ एप्रिल, २०१४

{NALSA विरुध्द भारत सरकार}

WP(C) क्र. ४००/२०१४

(न्या.के.एस.राधाकृष्णन आणि न्या.ए.के. सिक्री)

**निकाल** : तृतीयपंथी व्यक्तींना कायदेशीर मान्यता आणि त्यांना स्वओळख करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला, पण भा.दं.सं. ३७७ बद्दल कोणतीही भूमिका घेतली नाही.

↓

**ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राईटस्) अ‍ॅक्ट २०१९ विधेयक**

२०१९ मध्ये ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राईटस्) बील २०१९ संसदेत पारित झाले.

↓

**२०१९ च्या विधेयकातील ठळक मुद्दे**

**जमेच्या बाजू**

* तृतीयपंथीयांना स्वत:चा लिंगभाव (जेंडर आयडेंटी) ठरवण्याचा अधिकार

* शिक्षण, नोकरी, आरोग्य क्षेत्रात तृतीपंथीयांवर भेदभाव करण्यास मज्जाव.

**मोठ्या उणिवा**

* तृतीयपंथीयांना शिक्षण व नोकरीत आरक्षण देण्याबद्दल विधेयकात उल्लेख नाही.

↓

**सप्टेंबर २०२०: ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राईटस्) अ‍ॅक्ट २०१९ नियमावली (रुल्स)**
**ठळक मुद्दे**

**जमेची बाजू**

* ओळखपत्र मिळवण्यासाठी तृतीयपंथीयांना शारीरिक तपासणी करावी लागणार नाही.

**देशातील दुसरे तृतीयपंथी कल्याणकारी मंडळ**

जून २०२० मध्ये महाराष्ट्र सरकारनी तृतीयपंथी कल्याणकारी मंडळ (ट्रान्सजेंडर वेलफेअर बोर्ड) काढण्याचा जि.आर. काढला. ट्रान्सजेंडर वेलफेअर बोर्ड काढणारे महाराष्ट्र हे देशातील दुसरं राज्य आहे.

**राष्ट्रीय तृतीयपंथी कल्याणकारी मंडळ**

ऑगस्ट २०२० मध्ये राष्ट्रीय तृतीयपंथी कल्याणकारी मंडळ स्थापन झालं.

# फ्रांजीपानी– खाजकुयलीच्या बिछान्यावर



डॉ. विसाकेस चन्द्रसेकरम्


**© डॉ. विसाकेस चन्द्रसेकरम्**

हे वकील, चित्रपटनिर्माते, कादंबरीकार व नाटककार आहेत. सध्या ते फॅकल्टी ऑफ लॉ (कोलंबो विद्यापीठ) मध्ये सिनियर लेक्चरर आहेत.

**ईमेल** : visakesa@hotmail.com

**मराठी भाषांतर : पुष्कर एकबोटे**

अभियांत्रिकीत पदवी घेतली आहे. संरक्षण आणि सामरिकशास्त्र विषयाचा अभ्यागत अधिव्याख्याता आहे. बहुभाषिक भाषांतरकार आहे.

**ईमेल** : pushkarekbote@gmail.com


**या चित्रपटातील भूमिकेमुळे त्यांच्या नावाला बट्टा लागेल आणि त्यांना पुढील कामं मिळणार नाहीत. अगदी चित्रीकरण सुरु होण्याच्या १० दिवस आधीपर्यंत मला चमथच्या भूमिकेसाठी कलाकार मिळाला नव्हता. शेवटी माझ्या संयमाचे फळ मिळालं आणि मला अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम तीन कलाकार मिळाले – स्त्री भूमिकेसाठी यशो आणि पुरुषाच्या भूमिकेसाठी दसुन आणि जेहान.**



पुष्कर एकबोटे

ह्या प्रकल्पाची सुरुवात २०१२ मध्ये झाली. न्यू साऊथ वेल्स सरकारात मधल्या फळीच्या व्यवस्थापनाचे काम करत असताना मी माझी पीएचडी. ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी मधून पूर्ण केली. आता शिक्षण संपल्यामुळे मला काहीतरी धाडस दाखवण्याची खुमखुमी आली होती. माझ्या नोकरीच्या ठिकाणी वेगाने मनुष्यबळाची पुनर्रचना करण्यात येत असल्यामुळे त्यांनी स्वेच्छानिवृत्ती योजना आणली होती. त्याच सुमारास मला ऑस्ट्रीयातील गाझ येथे दोन आठवड्यांच्या, कलाकारांच्या शिबिरासाठी आमंत्रण आलं. मग मी मला मिळणारी स्वेच्छानिवृत्तीची मोठी रक्कम खिशात घालून, माझ्या सर्व वस्तू स्टोरेज मध्ये टाकून, यूरोपच्या भटकंतीसाठी उड्डाण केलं. त्यानंतर मी श्रीलंकेत आलो, जिथून मी माझ्या 'फ्रांजीपानी' या पहिल्या पटकथेच्या लेखनाला सुरवात केली. हा श्रीलंकेतील पहिला चित्रपट, ज्यात समलिंगी नायकाने सांगितलेली सकारात्मक समलिंगी प्रेमकथा होती. खाजकुयलीचा बिछाना (Bed of Nettles) हे माझ्या एका २००३ मधील नाटकाचं नाव होतं आणि हे श्रीलंकेच्या रंगभूमीवरील सकारात्मक समलिंगी कथा प्रस्तुत करणारं पहिलं नाटक होतं. 'खाजकुयलीचा बिछाना'वर बंदी घातली गेली पण मी एका फसव्या संहितेच्या आधारे प्रयोगाची परवानगी घेतली आणि प्रत्यक्षात श्रीलंकेच्या सेन्सॉर बोर्डाने बंदी घातलेल्या नाटकाचा प्रयोग केला, अर्थातच कायदेभंग केला. 'फ्रांजीपानी'चं भवितव्य असंच असेल का, अशी शंका होती पण तो चित्रपट कठोर सेन्सॉर बोर्डाच्या कचाट्यातून पास झाला आणि 'फक्त प्रौढांसाठी' या श्रेणीखाली देशभर प्रदर्शित झाला.

जरी मी उपजीवीकेसाठी व्यवसाय म्हणून बऱ्याच क्षेत्रात काम करत आलो होतो, तरी चित्रपट निर्मिती हीच माझी आवड राहिली आहे. मी १७ वर्षाचा असेन जेव्हा मी चित्रपट उद्योगात कामाला सुरुवात केली. विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी, मी तीन चित्रपटांत सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं. त्यानंतर

मी माझं शिक्षण आणि लॉ प्रॅक्टीस, सामाजिक सेवा आणि श्रीलंका तसेच ऑस्ट्रेलियाच्या सरकारी संस्थांसोबत कामं सुरु ठेवली. हे करत असतानाच मी वेळ काढून नाटकं, सर्जनशील लेखन आणि नृत्य कार्यक्रम अशा विविध कला प्रकल्पांवर काम करत होतो. मी ऑस्ट्रेलिया मध्ये समुदायाशी संबंधित 'कमलचा शोध' नावाचा एक लघुचित्रपट केला आणि चित्रपट उद्योगात पुनरागमन केलं.

'फ्रांजीपानी' जुन्या वसाहती कायद्यांनी चालवल्या जाणाऱ्या श्रीलंका या बेटावर घडते, जेथे समलिंगी स्त्री-पुरुषांना तुरुंगात टाकलं जाऊ शकतं. ह्या कायद्यांपासून लपून एल्.जी.बी.टी. लोक या बेटाच्या शांत गावात तसेच अस्ताव्यस्त, आधुनिक शहरातूनही राहतात. कधीकधी प्रामुख्याने स्थानिक बौद्ध लोकांमध्ये मिसळून राहतात, ज्यांना अजून समलैंगिकतेचा धिक्कार करणारी धर्म सत्ता सापडलेली नाही. 'फ्रांजीपानी' भारतीय उपखंडातील लोकप्रिय चित्रपट आणि संगीत परंपरांचा वापर करून, समलिंगी लोकांच्या प्रेमाच्या अधिकाराविषयी बोलतो. स्थानिक सांस्कृतिक प्रथांवर टीका करण्याचा विरोधात्मक दृष्टीकोन घेण्याऐवजी, हा चित्रपट माणसाला हसायला किंवा रडायला लावणाऱ्या अंगभूत मानवी भावनांवर लक्ष केंद्रीत करतो.

'फ्रांजीपानी' एका वासनायुक्त प्रेमाच्या त्रिकोणात अडकलेल्या दोन पुरुष आणि एका स्त्रीची कथा प्रस्तुत करतो, जे त्यांच्या दुर्गम पण वेगाने बदलणाऱ्या खेड्यात निषिद्ध आहे. सरसीला चमथ हा तिच्या नववधूचा पोषाख शिकवण्याच्या वर्गातील मुलगा म्हणून नको आहे आणि तिला चमथने भरतकाम केलेले पोषाख घातल्यावाचून राहवत नाही. तिला वाटते की चमथने तिला तिच्या ठरवलेल्या लग्नापासून वाचवावे, पण चमथला स्वातंत्र्याच्या शोधासाठी गावातून शहरात पळून जायचे आहे. तेव्हा चमथला नलिन हा एक नवीन मित्र भेटतो, तो वेल्डींग मेकॅनिक आहे आणि त्या गावातील स्थानिक मंदिरात काम करण्यासाठी तेथे आला आहे. सरसी अनिच्छेनेच या बाहेरून आलेल्या मुलाला तिच्या जवळच्या मित्रांमध्ये सामील करून घेते, पण तिला हे माहीत नाही की एक दिवस हा मेकॅनिकच तिला तिच्या पसंतीने लग्न करण्याची आशा देईल. जेव्हा गुप्तपणे दिलेली वचने मोडायच्या बेतात असतात तेव्हा हा अस्फुट प्रेमाचा त्रिकोण तुटायला लागतो. जेव्हा सरसी स्वतःचा पती निवडते, तेव्हा ह्या तीन सवंगड्यांमधला संघर्ष संपतो. पाच वर्षानंतर ते पुन्हा भेटतात आणि संघर्षातील आधीचे विजेते, प्रत्यक्षात चिरस्थायी प्रेम शोधण्याच्या प्रयत्नात अयशस्वी ठरले का ? हा प्रश्न उपस्थित करतात.

'फ्रांजीपानी' हा चित्रपट माझ्या स्वेच्छानिवृत्ती योजनेच्या पैशातून अत्यंत कमी बजेटमध्ये बनवला गेला, ज्यात माझे कलाकार आणि इतर सहकारी यांचे औदार्य आहे, ज्यांनी नगण्य मोबदल्यात त्यांचं योगदान दिलं. असं असलं तरी सर्वात मोठं आव्हान पैसे नव्हतं, तर तीन मुख्य भूमिकांसाठी कलाकार हे होते. ज्यात दोन समलिंगी पुरुषांचीही भूमिका होती. दहा पेक्षा जास्त अभिनेते आणि काही अभिनेत्री यांनी मला निराश केलं. त्यांना काळजी होती की या चित्रपटातील भूमिकेमुळे त्यांच्या नावाला बट्टा लागेल आणि त्यांना पुढील कामं मिळणार नाहीत. अगदी चित्रीकरण सुरु होण्याच्या १० दिवस आधीपर्यंत मला चमथच्या भूमिकेसाठी कलाकार मिळाला नव्हता. शेवटी माझ्या संयमाचे फळ मिळालं आणि मला अपेक्षेप्रामाणे सर्वोत्तम तीन कलाकार मिळाले - स्त्री भूमिकेसाठी यशो आणि पुरुषाच्या भूमिकेसाठी दसुन आणि जेहान.

मी आणि भूमी नावाची तृतीयपंथी कलाकार, आम्ही दोघेच सर्व कलाकार आणि सहकाऱ्यांमधील एल्जीबीटी समुदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती होतो. बऱ्याच जणांनी विचारलं की तुम्ही भिन्नलिंगी कलाकार आणि सहकारी घेऊन समलिंगी चित्रपट कसा बनवला ?. मी हे काम तडीस नेऊ शकलो कारण मला नशिबाने खूप चांगली माणसं, कलाकार आणि सहकारी म्हणून मिळाली. मी माझ्या कलाकारांसाठी आणि प्रमुख

सहकाऱ्यांसाठी जवळपास दोन आठवडे कार्यशाळा घेतल्या, जेणेकरून त्यांना एल्.जी.बी.टी. उपसंस्कृतीची ओळख व्हावी आणि ह्या प्रकल्पातील त्यांचं काम करण्याची त्यांची क्षमता विकसित व्हावी. त्यांना एल्.जी.बी.टी. समुदायाचा सन्मान आणि समतेसाठी चाललेला संघर्ष समजला आणि आपल्या संघर्षाचा भाग होऊन, ह्या चित्रपटासाठी ते उत्तमातील उत्तम सर्जनशीलता, ऊर्जा आणि संसाधने देण्यास तयार झाले.

ह्या चित्रपटावर श्रीलंकेत बंदी घातली जाईल असं मला अपेक्षित होतं. वास्तवात, मला हा चित्रपट बनवताना खर्च झालेले पैसे वसूल होण्याची कोणतीच आशा नव्हती, आणि राष्ट्रीय स्तरावर मुख्य प्रवाहातील चित्रपट म्हणून प्रदर्शित होईल असा विचार पण नव्हता. हा स्थानिकांना एल्.जी.बी.टी. अधिकारासंबंधी महिती करून घेण्यासाठी उपलब्ध असलेला युट्यूब चित्रपट असणं अपेक्षित होतं. असे असले तरी, तो मला काही आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित होणं अपेक्षित होतं. माझ्या अपेक्षांची मर्यादा ओलांडून, 'फ्रांजीपानी' पंचवीस पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये अधिकृतपणे निवडला गेला. त्याला अनेक पुरस्कार मिळाले जसे की २०१५ च्या 'रिओ एल्.जी.बी.टी. चित्रपट महोत्सवा'त सर्वोत्कृष्ट परदेशी चित्रपट आणि २०१७ च्या 'दक्षिण अशियाई चित्रपट महोत्सवा'त सर्वोत्कृष्ट अभिनेता इ. स्थानिक स्तरावर 'फ्रांजीपानी'ला २०१६ च्या 'सरसवीय चित्रपट महोत्सवा'त (जो श्रीलंकेचा 'ऑस्कर' च्या समांतर पुरस्कार आहे) प्रथम पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाला दिल्या जाणाऱ्या 'डॉ लेस्टर जेम्स पेरिस पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आलं.

'फ्रांजीपानी'च्या आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कौतुकाची चर्चा स्थानिक स्तरावर होऊ लागली आणि श्रीलंकेतील प्रत्येक चित्रपट रसिक हा चित्रपट पहाण्यासाठी उत्सुक झाला. ह्या चित्रपटाच्या निषिद्ध समजल्या जाणाऱ्या विषयवस्तुमुळे श्रीलंकेत असलेल्या मोजक्या वितरकांपैकी एकही राजी होणं अजूनही अवघड होतं.



शेवटी माझ्या कोलंबोतील मित्रानं एका स्थानिक वितरकाशी वाटाघाटी केल्या आणि पहिल्या प्रयोगानंतर तीन वर्षांनी हा चित्रपट, चित्रपटगृहांत झळकला. प्रदर्शित करताना आम्ही फ्रांजीपानीची 'प्रेमाचा आणि लोकशाहीचा अधिकार' या संबंधी चित्रपट अशी जाहिरात केली. श्रीलंकेतील माध्यमांमध्ये चित्रपटाचं अभूतपूर्व वार्तांकन झालं. माध्यमांमध्ये तसेच कोलंबोमधील आणि बाहेरील प्रदर्शनानंतर घडलेल्या चर्चांमध्ये लोकशाही आणि न्याय या विषयांवर जोरदार वादविवाद झाले आणि चित्रपटाचं कौतुक झालं. 'सिलोन टुडे'ने म्हटल्याप्रमाणे 'फ्रांजीपानी'च्या माध्यमातून श्रीलंकेतील एल्.जी.बी.टी. संस्कृतीवरील चर्चेला चालना दिल्याबद्दल चंद्रसेकरम् यांची प्रशंसा करायला पाहिजे'. 'द नेशन'ने अभिप्राय दिला, 'एकमेकांविरोधी दृष्टीकोन असणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक आदर्शांचा अंगिकार न करता मर्यादा विस्तारण्यात विसाकेस यशस्वी झाले आणि त्यांनी व्यक्ती आणि तिच्या विकसित होणाऱ्या भावनांवर लक्ष दिले'.

माझ्यासाठी चित्रपट आणि इतर कला प्रकार ही फक्त कलेची रूपं नसून सामाजिक कृतीची साधनं आहेत. म्हणून मी फक्त त्याच कथा निवडतो ज्या चर्चा आणि वादविवाद प्रज्वलित करतील आणि ज्या समानता, न्याय आणि मानवी हक्क यांद्वारे प्रकट होणारा, संपूर्ण लोकशाहीकडे जाणारा पुरोगामी रस्ता निवडण्यासाठी लोकांचं प्रबोधन करतील. ह्याच कारणांसाठी, मी प्रदर्शनाच्या पर्यायी पद्धतीवर भरवसा ठेवतो ज्यायोगे विषयवस्तुवर चर्चा होणं शक्य होईल. लोक चित्रपटगृहात येण्याची अपेक्षा करण्यापेक्षा, माझा चित्रपट त्यांच्याकडे घेऊन जावा असं माझं मत आहे, अन्यथा तो त्यांच्यापर्यंत पोहोचणार नाही. 'फ्रांजीपानी' अनेक सार्वजनिक मंचांवर आणि विद्यापीठांच्या सभागृहांमध्ये प्रदर्शित केला गेला आणि त्यानंतर एल्.जी.बी.टी. समानतेवर चर्चा ही झाल्या, परिणामी त्यांनी समाज माध्यमांवरही प्रभाव टाकला. माझे कलाकार आणि सहकाऱ्यांनी या चर्चांमध्ये भाग घेऊन, हा चित्रपट, त्याची कथा आणि चित्रपटामागची राजकीय विचारधारा यांचं समर्थन केलं आणि त्याद्वारे समानता आणि मानवी हक्क यांवर भक्कम प्रतिपादन केलं.

आम्ही २०१३ मध्ये आणि त्यानंतरच्या वर्षांमध्ये काय केले याकडे मागे वळून पाहताना, माझ्या चमूच्या यशाचा मला अत्यंत अभिमान वाटतो. मला वाटतं की आम्ही जे काही साध्य केलं ते खूप असामान्य आहे, आणि हा चित्रपट बनवून आम्ही, जे कदाचित पुढील काळात आमच्या मदतीला आले नसते अशा समाजातील अनेक घटकांची मनं जिंकू शकलो. आता, कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये एल्.जी.बी.टी. समानतेवर चर्चा करण्यासाठी, श्रीलंकेतील अनेक गट आणि व्यक्तींद्वारे 'फ्रांजीपानी'चा वापर शैक्षणिक साधन म्हणून केला जात आहे. आपल्या चळवळीच्या इतिहासात आपल्या समुदायाला मिळालेला हा संदर्भ बिंदू आहे, कारण समलिंगी प्रेमकथा असलेला चित्रपट, राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित होणं ही जगातील कोणत्याही भागात एल्.जी.बी.टी. समुदायासाठी उल्लेखनीय कामगिरी आहे. मला वाटतं की माझ्या समुदायासाठी माझा हिस्सा मी दिलेला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, हा चित्रपट करत असताना भेटलेली सुंदर माणसं ही आजही माझी जवळची मित्रमंडळी आहेत.

# तो मध्ये गुरफटलेली ती

## कथा

**©योगेश अंतरेष्वर नाईकवाडी**
**ईमेल** : yo.naiks3361@gmail.com



**योगेश अंतरेष्वर नाईकवाडी**

**८ वर्षांची असल्यापासून घरच्यांना तिचं पोरींसारखं वागणं खटकत होतं, वयानुसार सुधारणा होईल म्हणून दुर्लक्ष केलं, पण जी गोष्ट आत आहे ती आज ना उद्या बाहेर येणारच होती ना?..... १६ व्या वर्षी ती मुलगा असणं हे तर ती विसरलीच होती. घरच्यांनी नाही नाही त्या गोष्टी केल्या, वैद्या पासून ते मांत्रिकापर्यंत. मांत्रिकाने तर बाईचा आत्मा वास करतोय तिच्यात, म्हणून खूप वेळा बेदम मारलं पण होतं. असह्य वेदना घेऊन तिनं घर सोडलं अन् सोलापूर गाठलं.**

देव, दानव, मानव, गंधर्व, किन्नर या सर्वांचा पुराणामध्ये अनेकदा उल्लेख लहानपणापासून ऐकत होतो, वाचत होतो. जसं जसं मोठं होत गेलो तसं पहिल्या चारी नावांची ओळख होत गेली, पण किन्नर बद्दल कधी जास्त ऐकलच नाही. बहुदा कोणाला माहित नसावं किंवा सांगायचं टाळत असतील, देव जाणे.....

किन्नर म्हणजे काय? जसं चांगली जनुके एकत्र आणण्यासाठी झाडांचं कलम केलं जातं तसंच देवाला काही करायचं तर नसेल...! शरीर मनुष्याचे अन तोंड अश्वाचे किंवा शरीर अश्वाचे अन तोंड मनुष्याचे. ते गायन अणि नृत्यासाठी प्रसिद्ध होते. स्वत:ला ते खूप भाग्यवान समजत कारण देवांच्या दरबारी त्यांना मान होता. पण आजच्या किन्नरांना तेवढाच मान समाजात आहे का?.....

दहावीत असताना पहिल्यांदा रेल्वेने प्रवास करायचा योग आला. तो पण भुसावळ ते आसाम इतका मोठा. त्या पहिल्या प्रवासापासून ते आजपर्यंतच्या प्रत्येक प्रवासाबरोबर हिजडा, छक्का, किन्नर असं नामकरण झालेल्या मनुष्यरूपी कलमाविषयी कुतूहल वाढतच गेलं. का नाही वाढणार? ज्या व्यक्तीच्या संपूर्ण जातीचा उल्लेख शिवी म्हणून होत असेल अन तीच व्यक्ति प्रत्यक्ष समोर उभी असायची. त्यांचा विचित्र अंत्यसंस्कार, आराध्य दैवत 'अरावण' सोबतच्या एका दिवसाच्या लग्नाचं कुतूहल वाटायचं. एवढं वाटत असलं तरी विचारणार तरी कोणाला?

त्या दिवशी नेहमीप्रमाणे सोलापूर-पुणे इंटरसिटीने प्रवास चालू होता. लोकांची तेवढीच किलकिल, कोण मोबाईल मध्ये तोंड खुपसून, तर कोणाचं तोंडावर रूमाल टाकून झोपणं, मध्येच पाणीवाला, भेळवाल्याच्या चकरा अन् त्यांच्या पायात बसलेल्या लोकांची सरका सरकीसाठीचा कालवा. एवढ्या आवाजाच्या गर्दीला चिरत एक आवाज कानात घुमत होता. विशिष्ट प्रकारची टाळी, जणू १०० मीटरची रेस सुरू करण्यासाठी आमच्या सरांनी वाजवलेला क्लॅपर.....

ती समोर येताच ज्याची त्याची नजर किळसवाणी होत होती. काही तिच्यापासून नजर चोरत, तर काही पैसे देत होते. जरी त्यांना कोणी ५०० रूपये दिले, तर त्यातले ४९० रूपये परत देण्याचं आश्चर्य वाटायचं. अय चिकणे, देणा रे... टाळी वाजत तिचा आवाज कानी आला. 'मी अन् तिला पैसे देणं शक्यच नाही' असं मनाशी बोलत नेहमीप्रमाणे तिच्याकडे कानाडोळा करत मोबाईल मध्ये तोंड खुपसलं. त्यांची पैसे मागायची पद्धत बघून त्यांचा राग यायचा, का नाही

येणार? त्यांना देण्यासाठी पैसे काय झाडाला उगवतात का?... तसं केलं की ती निघून जायची हा आजवरचा अनुभव, अन् तशी ती गेलीही.....

थोड्यावेळासाठी दरवाज्यात बसायला गेलो.अचानक पाठीमागून आवाज आला, ये शारूख, सरक की तिकडं जरा, टेकू दे की मला पण. असं म्हणत काही बोलायच्या आत शेजारी येऊन बसली सुद्धा. बराच वेळ शांततेत गेला. मुळात मी बोलका, शेजारी दगड जरी आणून ठेवला तरी त्याला बोलतं करीन, मग ही तर जिवंत व्यक्तीच ना!?

'क्यारे, किधर उतरने वाला है?' तिच्या प्रश्नाबरोबर आमच्या गप्पा सुरू झाल्या. तिनं तिचं नाव 'प्रियल' सांगितलं. जरा वेगळंच वाटलं म्हणून विचारलं असता म्हणाली, घरच्यांनी प्रितम ठेवलं होतं, आणि मला पायल आवडायचं. तो दोनों को आपस में घुसेड कर प्रियल बनाया, भारी है ना?

घरच्यांना आवडलं का नाव? माझा पुढचा प्रश्न तयारच होता.

''हीतं मैच नाही आवडत उनको, अन् मेरा नाम का पुछता है तू, बरं जाने दे, चल एवढे पैशे मोजायचे है, मेरेको मदत कर. अगले स्टेशन को उतरने का है मुझे.'' असं म्हणत तिच्या ब्लाउज मधून नोटांचा बंडल काढून हातात दिला. मी दंग झालो ही विनंती करतीय की हुकूम सोडतीय.

जर मी मदत केली तर मला काय मिळणार? माझ्या प्रश्नाबरोबर एक भुवई उंचावत, लाडिक स्वरात म्हणाली, बोल की चिकणे क्या चाहीए तुझे?

तिच्या तशा बघण्यानं अन् बोलण्यानं विचित्र वाटलं, तरी त्यांच्या बद्दल जाणून घ्यायची इच्छा प्रकट केली.

''समाजसेवक है क्या तू? अन् जानकर तू करेगा क्या हमारे बारे मे? जगात बहुत है जानने को, लोक चांद पे, मंगल पे जाने की सोच रे, तरीबी आम्हाला त्यांच्या समाजात नीट जगू दिनात.'' मनातला रोष आवरत उत्तरली.

''तुमच्याबद्दल मनात खूप प्रश्न आहेत, अन् उत्सुकता पण. कारण आजपर्यंत कोणत्या छक...'' जीभ चावत अन् सॉरी सॉरी म्हणत तिचे पैसे मोजायला लागलो.

''असु दे, म्हण ना छक्का, हिजडा, किन्नर, नपुंसक और कुछ नाम तयार किये है, तो वो भी बोल. वैसे भी आदत पड गयी है. अच्छा लगा जब तू बोलते वक्त रूका. जिंदगी में बहुत कम लोग मिले, एवढ्या प्रेमानं विचारपूस करणारे. बोल तुला काय माहिती पाहिजे.'' असं म्हणताना तिचे डोळे नम्र् झालेले.

मनात प्रश्नांची यादी कधीपासूनची तयार होती, विचित्र अंत्यसंस्कार, अरावण सोबतचं लग्न?... पण काय माहित माझी सगळी उत्सुकता बाजूला ठेवून, तिला म्हणालो तुझ्याबद्दलच सांग की.....

८ वर्षांची असल्यापासून घरच्यांना तिचं पोरींसारखं वागणं खटकत होतं, वयानुसार सुधारणा होईल म्हणून दुर्लक्ष केलं, पण जी गोष्ट आत आहे ती आज ना उद्या बाहेर येणारच होती ना?..... १६ व्या वर्षी ती मुलगा असणं हे तर ती विसरलीच होती. घरच्यांनी नाही नाही त्या गोष्टी केल्या, वैद्या पासून ते मांत्रिकापर्यंत. मांत्रिकाने तर बाईचा आत्मा वास करतोय तिच्यात, म्हणून खूप वेळा बेदम मारलं पण होतं. असह्य वेदना घेऊन तिनं घर सोडलं अन् सोलापूर गाठलं. जिथं होटेल- स्टेशन वर मिळेल ते काम करून पोट भागवायची. पण तिथं तरी कुठे तिच्या जीवाला चैन मिळणार होता, तिचा 'बायकीपणा' वासनांध माणसांच्या नजरेतून सुटणार होता का? एक दिवस तिच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन सुनसान ठिकाणी नेऊन अत्याचार केला. तेव्हापासून तिला तिचं जगणं नकोसं झालेलं, त्यावेळी तिच्या आयुष्यात 'लक्ष्मीआक्का' आली ती तृतीयपंथीयांसाठी देवदूतच होती. तिच्या कडून दिक्षा आणि या विखारी दुनियेत जगण्याचा मंत्र मिळाला. तिनं राहण्यासाठी आसरा दिला. तिच्यासारख्या बऱ्याचजणी होत्या तिथं. सगळं मनासारखं होतंच असं नव्हतं, पण बाहेरच्या दुनियेपेक्षा कित्येक पटींनी चांगलं

होतं. बरं ते ठिकाण सोडलं तर ती जाणार तर कुठे?... 'इथं मला कोण कशी वागतेय म्हणून मारणार तर नव्हतं, लाचारीचा कोण फायदा घेणारं नव्हतं आणि.....' बोलता बोलता ती हळूच डोळं टिपत होती, तिच्या चेहऱ्यावर त्या नराधमांबद्दलची चीड दिसून येत होती. पण तरीही एकदम शांत होती.

एव्हाना सगळे पैसे मोजून झालेले, अन् दौंड पण येणार होतं. जिथं तिला उतरायचं होतं.तिची हद्द होती म्हणे ती, ज्याची त्याला वाटून दिलेली...दौंड मध्ये ती उतरली, तिथून पुढे तासभर डोक्यात एकच विचार, तृतीयपंथीयांशी आपला स्वयंघोषित पुढारलेला समाज असा का वागत असेल?.....

शिव-पार्वतींच 'अर्धनारीनटेश्वर' पूजनीय आहे, अन् माणसातला 'अर्धनारी' का मंजूर नाही?..... महाभारतात महारथी भीष्मांचा वध करायला 'शिखंडी' चालते, का तर ते धर्मयुद्ध म्हणून का?.....

वैद्यकीयदृष्ट्या पण सिद्ध झाले आहे कि, छक्का, हिजडा होणं हा काही मानसिक आजार नाही. आपलं जसं आहे तसंच त्यांचं पण अस्तित्व आहे. पण बुरसटलेला समाज त्यांना स्विकारणार तरी कधी?.....

त्या दिवशी झेड ब्रीज वर छोटा भाऊ निलेशचा वाढदिवस साजरा करत होतो. कुठूनतरी २ किन्नर आले, त्यांनी स्वत:हून त्याला केक भरवला, 'जुग जुग जीओ' म्हणून आशीर्वाद ही दिला आणि आमचा हिस्सा म्हणून स्वत:चा केक ही घेतला. नकळत पहिल्यांदाच त्यांच्यासाठी खिशात हात गेला अन् १०० रूपये होते ते त्यांना दिले, त्यातून पण केक सारखाच त्यांचा हिस्सा म्हणून २० काढून ८० रूपये माझ्या हातात टेकवले.

त्यांच्या हसत-खिदळत जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीला बघून 'प्रियल' गुणगुणताना आठवली...'दुनिया में कितना गम है, मेरा गम कितना कम है.....'

Follow on FB Page : 'DearDiary' or search 'yo.naiks3361'.



**अनुज घाणेकर**

**नायिकेचे मन भरून गेलं आहे. त्यातून ती एका नवीन जगात आलीए, जिथे खूप बंधनं आहेत. स्वतः चा तिच्या सानिध्यात बहरणारा खरा सेल्फ कुठे दिसत नाहीये. इतक्यात नायिकेला एक नवीन साथ मिळते – तिच्या खोलीतल्या फोटो फ्रेम मधल्या शकुंतलेची. ही शकुंतला तिची नवीन सखी बनते. तिच्या चेहऱ्यावर हास्य आणते.**

# एल.जी.बी.टी. कथासूत्र ९० च्या दशकातील गाण्यातून

## लेख


**© अनुज घाणेकर**

लेखक हे मानवशास्त्रज्ञ असून शहरी आरोग्य, पर्यावरण बदल, बालहक्क आणि लिंग-लैंगिकता भेद या विषयांवर सामाजिक काम आणि लेखन करतात.

**ईमेल :** anujghanekar2@gmail.com


'मेरी चुनर उड़ उड़ जाए' हे ९० च्या दशकातले फाल्गुनी पाठक चे इंडी पॉप च्या खजिन्यातले एक गीत. एम टीव्ही वरची गाणी ऐकत मोठं झालेल्या ९० च्या पिढी साठी एक नॉस्टॅल्जिया. ऐकायला सुमधुर आणि टिपिकल फाल्गुनी च्या संगीताचा ठेका असणारं हे गाणं दोन मुलींच्या अधुऱ्या प्रेमकथेवर विराणी आहे, हे क्वचितच उल्लेखले गेले आहे. ९० च्या दशकात, जिथे एल.जी.बी.टी. कथासूत्र घेऊन कलाकृती घडवणं ही काळाच्या पुढची गोष्ट. नवरात्रीच्या दांडिया साठी प्रख्यात असलेल्या फाल्गुनी पाठक च्या अनेक अल्बम्स मध्ये दोन मुलींच्या प्रेमकथेचा हा अँगल नकळत जाणवत राहतो, आणि तो सुद्धा कुठल्याही लाऊड आविर्भाव किंवा वर्तनाच्या शिवाय. मेरी चुनर.. मध्ये ही थीम सगळ्यात ठळक जाणवते.

आपली नायिका काही कारणाने स्वतःचं शहर किंवा राज्य सोडून शिफ्ट झालीए. आधीच ती उदास आहे कारण ती आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या तिला सोडून आली आहे. त्या दोघींचं नातं तुम्ही प्रेमिकेचे समजा, घट्ट मैत्रिणींचे समजा नाहीतर जिवलग सख्यांचे. पण सत्य हे आहे की नायिकेला तिच्या आठवणीत चैन पडत नाहीये. तिने शिकवलेली छोटीशी डान्स स्टेप, दोघींनी एकत्र घालवलेल्या आठवणी यांनी नायिकेचे मन भरून गेलं आहे. त्यातून ती एका नवीन जगात आलीए, जिथे खूप बंधनं आहेत. स्वतःचा 'ती'च्या सानिध्यात बहरणारा खरा सेल्फ कुठे दिसत नाहीये. इतक्यात नायिकेला एक नवीन साथ मिळते – तिच्या खोलीतल्या फोटो फ्रेम मधल्या शकुंतलेची. ही शकुंतला तिची नवीन सखी बनते. तिच्या चेहऱ्यावर हास्य आणते. आपली नायिका जिथे राहायला आली आहे त्या राजवाड्यात एक नायक सुद्धा आहे. आणि त्याचे नायिके बद्दलचे आकर्षण, प्रेम किंवा उत्सुकता हा कथेचा अजून एक भाग आहे.

आता ५ मिनिटांच्या गाण्यात इतकी मोठी कथा दाखवायची म्हणजे गीताचे शब्द ही कथा उलगडणारेच हवेत. पण शब्दातून आणि दृष्यांतील चिन्हांतून म्हणजेच अनेक सिम्बॉल मधून कथा सांगण्याचा प्रयत्न केला आहे तो निव्वळ अप्रतिम. उदाहरणार्थ, आपल्या नायिकेच्या सोबत एक ससा असतो. ससा हे

आयुष्यात मोठा बदल असण्याचे प्राण्यांच्या चिन्ह शास्त्रातील एक चिन्ह आहे, जो बदल नायिकेच्या आयुष्यात घडला आहे. 'मेरी चुनर उड जाए, हाये दिल मेरा घबराए' हे शब्द सुद्धा सांगतात की आयुष्याचा एक भाग आता संपला आणि  मला धाकधूक वाटत आहे. फ्रेम मधल्या शकुंतलेची चुनर ही रंगीत आणि मुद्रा म्लान असते. पण फ्रेम मधून बाहेर येऊन जेव्हा ती नायिकेशी मैत्री करते तेव्हा ही चुनर पांढऱ्या शुभ्र रंगाची होते आणि शकुंतला जास्त खुश दिसू लागते. कदाचित चित्रातल्या खोट्या, रंगीत, घुसमट होणाऱ्या वातावरणातून ती बाहेर पडते. कदाचित कमिंग आऊट करते. तिच्या आठवणींशी निगडीत आणि सुरक्षित वाटायला लावणाऱ्या फरच्या जैकेटचा मोठ्या खुबीने वापर केला आहे.  अशा अनेक सिंबॉलिक उदाहरणांनी हे गाणं सजलेलं आहे. काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'स्कुप हूप पोर्टल' मधल्या एका लेखाने या गीतातील प्रत्येक सिम्बॉल दृष्यासहित उलगडला आहे.

आयेशा टाकियाने ही नायिकेची, त्रिषाने शकुंतलेची आणि फाल्गुनी पाठकने नायिकेच्या मैत्रिणीची भूमिका केलेली आहे. त्यांच्या एकमेकांशी रिलेट होण्यातला निरागसपणा खास बघण्यासारखा. वासना, स्पर्श यांचा लवलेश नसलेलं प्रेम हे ९० मधल्या इंडी पॉप अल्बम्स चं वैशिष्टय इथे पण जपलं आहे.

प्रत्येक कलाकारीकडे बघायचा वेगवेगळा चष्मा असू शकतो. कदाचित दोन स्त्रियांमध्ये असलेल्या या नात्याचा हा चष्मा कुणाला पटणार नाही. कारण सिम्बॉल जितके अधिक, तितके अन्वय अर्थ अधिक. पण प्रेमाच्या नात्याचा हा चष्मा या गाण्यात इतका सशक्त सादर केला आहे की त्याची शक्यता कुणी नाकारू सुद्धा शकणार नाही. तेव्हा ही हिंदी माध्यमांसाठी दुर्मिळ असलेली तरल प्रेमकथा, कमिंग आऊट स्टोरी नक्कीच अनुभवावी.

# ती आणि ती

## कथा

**© लेखिका: सॅमटन**

सॅमटन हि ४४ वर्षांची पुण्यातील अभिमानी लेस्बियन आहे. ती 'व्हॉइस ट्रेनर' व डबींग आर्टिस्ट म्हणून काम करते.

**NOOOO not at all. Why do I care? माझं ताड्कन उत्तर. अंड्या त्याच्या नेहमीच्या शांत सुरात म्हणाला. You do care सॅम. बाय द वे, शाल्मलीचा मेसेज आलाय, ती ठीक आहे. कधी? मी विचारलं. सकाळीच, अंड्या म्हणाला. Oh .. सो माझ्या मेसेजेसना, कॉल्स ना एकही उत्तर नाही पण**

खूप चिडचिड होतेय माझी.अस्वस्थ आहे मी .आज तीन दिवस झाले. शाल्मली ऑफीसला आलेली नाहीये . माझ्या एकाही कॉलला ,मेसेजला, ईमेल ला तिने रिप्लाय केलेला नाहीये. at least मी ठीक आहे एव्हढा तरी मेसेज तिने पाठवायला हवाय. Why is she acting so weird? का रविवारच्या ऑफिसच्या पार्टीत आम्हा दोघींमधला तो नाजूक क्षण घडायला नको होता? Have I lost her? खूप गोंधळलेय मी. कामात अजिबात लक्ष नाहीये .सिंगापुर ग्रुपचं आज फायनल अपडेशन आहे .कोणत्याही क्षणी डिसुझा,म्हणजे आमची डिपार्टमेंट हेड तिचा तोफखाना सुरु करेल.

हाय, मी समीता उर्फ सॅम.दादरच्या स्कायलाईन टूर्स कंपनीत, इंटरनॅशनल ऑपरेशन्स मॅनेजर म्हणून काम करते. आय लव्ह माय जॉब and? Yes, I am madly in love with शाल्मली.

हो, मी समलैंगिक आहे अर्थात शाल्मलीला ते माहित नाहीये . फक्त अंड्याला, आनंदला माहितेय. आनंद, माझ्याच कंपनीत डॉक्युमेंटेशन डिपार्टमेंटमध्ये काम करतो. माय बेस्ट बडी अँड पार्टनर इन क्राईम. शाल्मली त्याचीच असिस्टंट म्हणून ८ महिन्यांपूर्वी जॉईन झाली.

तो दिवस चांगलाच आठवतो मला. नेहमी प्रमाणे मी कामाच्या ढिगाऱ्यात बुडालेली होते. एका कॉलवर एअरलाईन्स, तर दुसऱ्या कॉलवर क्लायंट छळतोय. समोर सदा, आमचा ऑफिस बॉय, आजचा डिस्पॅच मागायला उभा. सगळ्यांना हॅन्डल करण्याची माझी कसरत चालू होती .

एवढ्यात, डिसुझाचा खणखणीत आवाज: गुड मॉर्निंग सॅम, मीट शाल्मली. ये आजसे जॉईन हुआ, आनंद के डिपार्टमेन्ट में.

काय कटकट आहे यार. मनातल्या मनात डिसुझाला शिव्या घालत, मी नाईलाजाने मान वर केली. समोर एक ३०-३२ वर्षांची स्मार्ट, तरतरीत, व्हेरी कॉन्फिडन्ट तरुणी उभी होती. हाय सॅम, तिने सुरवात केली आणि नवीन जॉईनी जे बोलतात तत्सम बोलायला लागली. माझं लक्षच नव्हतं तिच्या बोलण्याकडे. I was so lost in her big brown tiger eyes. `og those big brown tiger eyes. हि सिंगल असेल का ? ? हिचे डोळे काय मस्त एक्सप्रेससिव्ह आहेत. स्ट्रेट की गे ? माझं गे रडार चांगलंच कामाला लागलं होतं .

'और सुन ,ये तेरा थाना का पेले का स्टेशनसे आता है, टुमको कंपनी

होगा', मधेच डिसुझा म्हणाली. आणि माझी तंद्री भंग पावली.

'सो सॅम, नाईस मीटिंग यू, See you around, have a great day' असं म्हणत शाल्मली नी डिसुझा दोघीही निघाल्या .

'हम्म्म्म्म येस येस, सेम हियर. व  व  वेलकम. सी या.' मी अडखळत उत्तर दिलं. फॉर दी फर्स्ट टाईम, आय इंस्टंटली फेल्ट कनेक्टेड विथ समवन. Very Interesting.

'सॅम, सॅम are you there?' अचानक होल्ड केलेल्या कॉल्स मधून आवाज आले आणि घडलेलं प्रोसेस होण्याआधीच मी कामात परत बुडाले .

सॅम, काय ठरलंय तुझं, शाल्मली विषय बंद. फोकस. अर्ध्या तासांत डिसूझा डोक्यावर बसेल. आता मात्र हे ग्रुपचं काम तडीला लावायचचं. मी झपाट्याने कामाला लागले. मग पुढचे दोन तास नेहमीची मीटिंग. शेवटची १५ मिनिटं आम्ही सगळे कसे बिनकामाचे आहोत, कसा रेव्हेन्यू वाढवायला पाहिजे, यावर डिसूझाचे नेहमीचंच प्रवचन झालं. एकच चांगली गोष्ट होती. अंड्या होता मीटिंगला त्यामुळे डिसूझा जरा तरी सुसह्य झाली. शेवटी एकदाचा लंच टाईम झाला आणि आम्ही डिसूझाच्या कचाट्यातून सुटलो.

मी आणि अंड्या पॅन्ट्रीत बसलो, आमच्या नेहमीच्या जागेवर.फक्त आज शाल्मली नव्हती. अंड्याने त्याचा  पहिला  प्रश्न टाकला, 'क्या हुवा भिडू? are you missing her?'

'NOOOO not at all. Why do I care?' माझं ताड्कन उत्तर.

अंड्या त्याच्या नेहमीच्या शांत सुरात म्हणाला, 'You do care सॅम. बाय द वे, शाल्मलीचा मेसेज आलाय, ती ठीक आहे.'

'कधी?' मी विचारलं.

'सकाळीच,' अंड्या म्हणाला.

Oh .. सो माझ्या मेसेजेसना, कॉल्सना एकही उत्तर नाही पण अंड्याला मात्र तिने मेसेज केला होता. This bloody hurts. आता मात्र मला राग यायला लागला होता. बहुदा माझा पडलेला चेहरा आणि मूड दोन्ही अंड्याला कळलं.

'सॅम, but at least she is fine. काय घडलंय नेमकं तुमच्यात?'

**शाल्मली**

आज तिसरा दिवस. मी ऑफिसला जात नाहीये. बरं नाहीये असा मेसेज केलाय, डिसूझाला.

सॅमचे कॉल्स, मेसेजेस, इमेल्स कशालाही मी रिप्लाय केलेला नाही.फक्त अंड्याला 'मी ठीक आहे' एव्हढाच मेसेज केलाय, तोही आज .

I am so confused. काय करावं काहीच सुचत नाहीये . कोणाशीतरी बोलायला हवंय म्हणजे कदाचित शांत होईन मी. How can I develop feelings for another girl? त्यादिवशीच्या ऑफिस पार्टीनंतर तर, अजूनच बैचेन आहे मी. आता मात्र फोन करायलाच हवा, शिल्पाला. शिल्पा, माझी खूप घट्ट मैत्रीण अगदी शाळेपासूनची. समुपदेशक आहे एका NGO त.  ती नक्की हा गोंधळ दूर करेल. मी शिल्पाला फोन केला.

'हॅलो शिले ..'

'शमे, आज कशी काय आठवण? Whats wrong?' बहुदा माझ्या हॅलो वरूनच, माझं काहीतरी बिनसलंय याचा अंदाज आला होता तिला.

'खरंय not okay. वेळ आहे नं तुला, महत्वाचं बोलायचंय. माझ्याबद्दल.'

'अगं बोल गं, why so गंभीर ?'

माझा स्कायलाईन टूर्समधला पहिला दिवस. डिसूझा आमची डिपार्टमेंट हेड, मला सगळ्यांशी introduce करत होती. पहिली ओळख झाली ती आंनदशी, माझा immediate बॉस. आवडला मला, एकदम cool प्रकरण, मजा येणार याच्याबरोबर काम करायला. सगळ्यांना हाय, हॅलो करत सरते शेवटी आम्ही ऑपरेशन्स डिपार्टमेंटमध्ये पोचलो. My very first encounter with सॅम. क्युबिकल मागे एक आकृती खाली मान घालून बरंच काही एकाचवेळी लिलया हॅन्डल करत होती. हुन.. इम्प्रेसिव्ह... डिसूझानं तिला हाय केलें. तिने नाईलाजाने मान वर केली. मग मी माझी ओळख करून दिली, पण या सॅम नामक खडूस चं लक्षच नव्हतं माझ्या बोलण्याकडे. तिला बाय म्हणून आम्ही निघालो. अडखळत काहीतरी औपचारिक बोलली ती.. मी खडूस नावचं देऊन टाकलं तिला.

मात्र हळू हळू ही खडूस, किती मस्तमौला आहे, हे कळायला लागलं मला. आनंद आणि ती जिगरी दोस्त . आनंद कडूनच सॅम बद्दल मला बरंच काही कळलं. सॅम कशी स्वतःच्या हिमतीवर ठाण्यात एकटी राहते, छान तिचं लाईफ एन्जॉय करते,भरपूर भटकंती करते, कशी रॉकिंग डान्सर आहे, कविता लिहिते इथपासून ते अगदी तिचे पालक पुण्यात असतात इथपर्यंत सगळं.आमच्या तिघांची भट्टी आणि गट्टी झक्कास जमली. ऑफिसमध्ये एकत्र लंच करणं, ऑफिसनंतर टाईमपास करणं, वीकेंडला वरळी सीफेसला जाणं, मग तिथे भरपूर गप्पा टाकणं आणि सॅमच्या कविता ऐकणं, गाणी ऐकणं. दरम्यान मला जाणवायचं, सॅम माझी खूप काळजी घ्यायची. आनंदच्या अनुपस्थित, मला कामासंदर्भात येणारे प्रॉब्लेम्स ती आऊट ऑफ द वे जाऊन सॉल्व्ह करायची. कधी मला उशिरापर्यंत थांबावं लागलं तर माझ्यासाठी थांबायची. ती ठाण्याला आणि मी मुलुंडला राहात असल्यामुळे ऑफिसला एकत्रच जाणं येणं होत. मी मुलुंडला गाडीत चढले, कि सॅम पटकन उठून, मला बसायला जागा द्यायची. दादरचा ब्रीज क्रॉस करताना गर्दीत, अचानक प्रोटेक्टिव्ह व्हायची.

मध्यंतरी बाबा हॉस्पिटलमध्ये होते जवळ जवळ आठ दिवस. माझी अखंड धावपळ सुरु होती घर हॉस्पिटल घर. अरे हो, मी आणि माझे बाबाच असतो. आईला जाऊन ह्यावर्षी पाच वर्षे होतील. I miss my mother so much. बाबांशीही तसं ठीकठाकच पटतं माझं. तर सॅम रोज सकाळी यायची हॉस्पिटलला, बाबांशी बोलायची, चौकशी करायची आणि मग ऑफिसला जायची. रोज न चुकता तिचे फोन यायचे, मला धीर द्यायची. सॅमने बाबांवर काय जादू केली होती कुणास ठाऊक! फार आवडून गेली होती त्यांना सॅम. दोघे काय काय गप्पा मारायचे. मलाच alien असल्याचा फील यायचा. बाबांना डिस्चार्ज मिळणार त्यादिवशी सॅम ऑफिसला दांडी मारून आली होती, मी  विरोध करूनसुद्धा.

डिस्चार्ज प्रोसेसला वेळ लागणार होता. आम्ही हॉस्पिटलच्या कॅफेटेरियात बसलो होतो, मी चहा पीत आणि सॅम तिची लाडकी ब्लॅक कॉफी पीत. I was bit down that day. का माहित नाही. आईची खूप आठवण येत होती. आणि अचानक मी रडायलाच लागले. सॅम ने पटकन सावरलं मला. आणि मी कितीतरी वेळ तिच्या खांद्यावर डोकं ठेवून रडत होते. पोटभर रडून झाल्यावर माझी मलाच लाज वाटली. मी सॉरी म्हटलं सॅमला. तर म्हणाली, अगं असं मोकळं व्हावं कधीतरी आणि माझा खांदा आहे की हक्काचा .. I dont mind it.

I feel so safe around सॅम. इतक्या वर्षांत शिल्पा व्यतिरिक्त कोणाशीही इतकी घट्ट मैत्री झाली नव्हती माझी. I dont want to lose it at any cost. She makes me feel so special.

आणि तो ऑफिसच्या पार्टीचा दिवस. डिसुझाचं मोटिव्हशन कम टोमणे स्पीच झाल्यावर सगळेच चेकाळले  होते. अंड्या आणि सॅम केव्हाच डान्स फ्लोअरवर पसार झाले होते. खाणं-पिणं तब्येतीत चालू होतं. सॅमने नेहमीप्रमाणे डान्सफ्लोअर टेक ओव्हर केला होता. मी मात्र प्रेक्षक होते.

सॅम मस्त मूडमध्ये होती. she was looking hot. I love her dressing sense, bit masculine, yet so feminine the perfume she wears .. David Off Life: Cool Water. सुरवातीचा धांगडधिंगा संपल्यावर आणि almost सगळे पांगल्यावर DJ ने मस्त स्लो नंबर्स लावले. इतक्यात माझं लाडकं गाणं लागलं. क्लम स्कॉटचं, You are the reason. अचानक सॅम आली, आणि मला डान्सफ्लोअरवर घेऊन गेली. मी, सॅम, अंड्या आणि नेहा; आमची कलीग एव्हढेच होतो. मी आणि सॅम डान्स करायला लागलो. हळूहळू माझं अवघडलेपण गेले आणि मी सुद्धा मोकळेपणाने डान्स करायला लागले. Best friends do so, right? Sam was looking straight into my eyes, as if she was trying to convey something ...

I'd spend every hour, of every day, Keeping you safe

"cause I need you to see That you are the reason You are the reason

गाणं संपता संपता we both were so close as if we were about to, about to kiss .. गाणं संपलं आणि आम्ही भानावर आलो. थँकफुली, डिम लाईट्स आणि डान्सफ्लोअरवर अगदीच चार डोकी असल्यामुळे कुणाचंच लक्ष नसावं. मी मात्र नखशिखांत हादरले होते आणि त्याक्षणी मी वॉशरूमच्या दिशेने पळत सुटले.

शाल्मली. wait, wait .. सॅमच्या हाकांकडे मी पूर्ण दुर्लक्ष केलं. बहुदा तीही माझ्या मागोमाग येत होती. सॅम माझ्यापर्यंत पोचण्याआधीच मी एका रिकाम्या वॉशरूममध्ये स्वतःला कोंडून घेतलं.

शाल्मली, प्लीज, आपण बोलूया, बाहेर ये प्लीज .. प्लीज, सॅम वॉशरूमच्या दरवाज्यावर नॉक करत होती बराच वेळ ..

शेवटी मीच ओरडून सांगितलं, सॅम तू जा. जस्ट गेट लॉस्ट. LEAVE ME ALONE .

शाल्मली प्लीज एकदा बाहेर ये, बोलूयानं आपण. I am so sorry. सॅमची आर्जवं चालूच होती .

Get Out from here सॅम, कळत  नाहीये का तुला ? आणि हो इथे थांबू नकोस. जा.

मी खूप rudely बोलत होते सॅमशी. कळत होतं मला. पण वळत नव्हतं. I was totally blank. खरंतर घडलं होतं त्यात आम्हा दोघींचाही दोष नव्हता. तो क्षणच फसवा होता. कि नेमकं काय होतं ते ? मी हादरले होते कारण, कारण I also wanted to kiss her. आणि हेच नेमकं पचवता येत नव्हतं मला.

एवढ्यात कुणाचातरी आवाज आला ... शाल्मली, तू आहेस का इथे ? तुमचा ट्रान्सपोर्ट रेडी आहे .सगळे वाट बघतायत. ओह, म्हणजे परत सॅमला फेस करावं लागणार होतं. पण इलाज नव्हता. नशिबाने विद्याविहारपर्यंत जोशी आणि विकास असणार होते बरोबर. त्यामुळे त्यांच्यासमोर सॅम हा विषय नक्कीच छेडणार नव्हती. पण पुढे काय ? मी मुद्दाम फ्रंट सीटवर बसले. जोशी, विकास आणि सॅम मागे. विद्याविहारपर्यंत शांतता होती. फ्रंट मिरर मधून मला सॅमचा चेहरा स्पष्ट दिसत होता. I could feel the pain and hurt in her eyes.

जोशी आणि विकास विद्याविहारला उतरले. आता गाडीत मी, सॅम आणि ड्राइव्हर एव्हढेच. एकदा दोनदा सॅमने बोलायचा प्रयत्न केला. I royally ignored her. निघताना मी निरोपही घेतला नाही तिचा. फक्त त्या रात्री एक मेसेज केला डोन्ट कॉल ऑर मेसेज मी .

आज तिसरा दिवस मी ऑफिसला गेलेले नाही. I am struggling every minute .. not thinking about सॅम.

I am missing her badly. I am missing her presence; I am missing everything about her. हे काय आहे ? एव्हढे खोल बंध जुळू शकतात एखाद्याशी ? ही काहीतरी वेगळी फीलिंग्स आहेत नक्की.आणि हाच गुंता आहे शिलू . Are you there????

'Yes e_o, Very much there.'

'हे काय आहे शिले?'

'You are deeply in love with this सॅमी गर्ल definitely not as a friend.'

'Whattttt? What are you talking? आणि कशावरून?'

'The Truth माय डिअर फ्रेण्ड, the truth. डोन्ट पॅनिक. शांतपणे ऐकून घे माझं. गुंता काय आहे ते तुलाही माहितेय. तू हादरलीस कारण तू एका मुलीच्या प्रेमात पडलीयेस आणि असं होऊच कसं शकतं, स्त्री असून दुसऱ्या स्त्रीविषयी आकर्षण, प्रेम कसं काय निर्माण होऊ शकतं. याचा स्वीकार हा खरा प्रॉब्लेम आहे. नीट आठव, शाळेत असताना मुलींशी तू किती चटकन कनेक्ट व्हायचीस. तूला जवळचा म्हणावा असा एकही मित्र नव्हता. तू बुजायचीस मुलांबरोबर बोलताना. आठव, या अगोदरच्या तुझ्या असफल रिलेशनशिप्स. You were never comfortable with those guys. कोण तो ...समीर आणि दुसरा आकाश. तू नेहमी म्हणायचीस, की you dont feel safe and emotionally connected with them. Movies बघताना तुझ्या सगळ्या कॉम्प्लिमेंट्स नट्यांसाठी असायच्या. Its high time my friend, make peace with your sexual orientation, accept it. शमे, तुझं sexual orientation हे तुझ्या व्यक्तित्वाचा अगदी छोटा भाग आहे. It doesn't make you good or a bad person. शेवटी तू माणूस म्हणून कशी आहेस, हे महत्वाचं नाही का?

ह्या सॅमी विषयी तू किती भरभरून बोलते आहेस, तिच्या विषयीची अगदी बारीकसारीक माहिती दिलीस तू मला. . आणि समजा तू जर ती तुझी फक्त जवळची मैत्रीण आहे असं मानलं, तर तुझ्या किती मैत्रिणींना तुला kiss करावंस वाटतं? तुला जे सॅमबद्दल वाटतंय ते अगदी नैसर्गिक आहे. Love is Love ..Its your life your choice with whom you want to be. What gender has to do with love? कुणाची पर्वा करतेस तू? तुझ्या बाबांची? समाजाची? Why do you care? तू स्वतंत्र आहेस, स्वयंसिध्दा आहेस. So, technically you are not answerable to anyone but you. You deserve to be happy, loved, respected. तू किती passionately बोलत होतीस सॅमबद्दल. शमे, खरं प्रेम कधी, केंव्हा, कुठल्या रूपात तुम्हाला भेटेल नाही गं सांगता येत. Fortunately ते तुझ्यासमोर आलंय, go embrace it, don't hold yourself back for some stupid reasons. आणि एकंदरीत सॅमही ९९% सेम फील करत असणार. Please don't lose her.

उद्या गपचूप ऑफिसला जायचं, सॅमला सॉरी म्हणायचं आणि मोकळ्या करायच्या तुझ्या भावना. फारतर काय होईल, ती नाही म्हणेल किंवा resist करेल. पण असं होणार नाही. काहीही झालं तरी I am with you, there for I will never judge you for who you are, Congrats my friend; you are in love; this time you have found the right one who treats you right.

आणि हो, ह्या कौन्सिलिंग सेशनची फी म्हणून पार्टी हवी मला, तुझ्या सॅम बरोबर. I dont mind if you kiss each other in my presence. हा हा हा!'

'शट अप,शिले ... पण थँक्स .. आज माझी नव्याने ओळख करून दिलीस माझ्याशीच. I confess, I really love सॅम. आपण कुणाच्यातरी प्रेमात असणं हे किती भारी फीलिंग आहे.'

'True that. उद्या रात्री फोन करायचा आणि काय घडलं ते मला सांगायचं.' शिलूने धमकी देत फोन ठेवला.

खरंच आता खूप मोकळं वाटतंय मला. I am so excited to go to office tomorrow meet सॅम ....

**सॅम**

'ओह. तर हे असं घडलय तर..' अंड्या खात खात म्हणाला ..

'अंड्या, आयुष्यात पहिल्यांदा कोणावर तरी जीवापाड प्रेम केलंय रे मी .पण तो नाजूक क्षण टाळता नाही आला मला आणि आता मैत्रीपण गमावून बसले मी .काही व्यक्तिंशी आपण इंस्टंटली कनेक्ट होतो, जणू काही पूर्वजन्मीचं नातं असल्यासारखं. शाल्मलीला पहिल्यांदा पाहिलं नं तेंव्हा ते प्रकर्षाने जाणवलं मला. मी भस्सकन प्रेमातच पडले तिच्या. तिच्या डोळ्यांमध्ये हरवून गेले. मला माहितेय आनंद, मी समलैंगिक आहे म्हणजे तीही असेलच असं नाहीये. I can't force her to love me but I can't stop help loving her. मला तिची प्रत्येक गोष्ट आवडते. तिचा आत्मविश्वास, स्मार्टनेस, हट्टीपणा, विसराळूपणा, तिचं पटकन चिडणं. All of me loves all of her. ती नक्कीच माझा तिरस्कार करत असणार I can't take that. काय करू मी ? ती बोलतही नाहीये माझ्याशी धड. I can't face her ... नाहीशी होऊ का कुठेतरी ?'

'चिल..चिल माय शेरनी. आधी स्वतःला दोष देणं बंद कर stop assuming. और मैदान छोडके क्यूँ भागना ? फेस हर. apologize. Fix what is broken need be, tell her your truth.' इति अंड्या.

'कठीण आहे हे अंड्या .पण अंड्या, खरं सांगू .. somehow I strongly feel, she also wanted to .. wanted to...you know what I mean.'

'असं असेल, तर सोने पे सुहागा और मेरी जिगरी का घोडा गंगा में नाहायेगा .. हा हा .. और फिर बडी पार्टी..'

सॅम, I don't mind, you guys doing that in front of me ...you know what I mean ..

'चूप बे .. फिल्मी.' मी एक गुद्दा हाणला अंड्याच्या पाठीत.

लंच टाईम संपला. मी आणि अंड्या दोघेही आपापल्या डिपार्टमेंट मध्ये शिरलो. एव्हढ्यात डिसुझा प्रगटली.

'कलसे वो शाल्मली आयेगा .. मेसेज आया उसका ... वो स्वीस ग्रुप का डॉक्युमेंटेशन अलोकेट कर उसको .. और थोडा ब्रीफ भी कर उसकू और आनंद को बोल नेहा को मलेशिया ग्रुप का ब्रीफ करनेकु.'

Oops .... I dont want to face her, not so early. Okay Cool. मी नेहाला ब्रीफ करेन आणि अंड्या शाल्मलीला. अंड्याशी बोलते

**शाल्मली**

आज खूप उत्साहात आहे मी. नेहमीची ८.४७ ची लोकल पकडायला स्टेशनवर लवकरच पोचले. उत्साहात असले तरी थोडी नर्वसच होते. सॅम कशी रिॲक्ट होईल ? गेले तीन दिवस मीच संपर्क तोडला होता तिच्याशी, खूप वाईट वागले होते.कमीतकमी एकातरी मेसेजला उत्तर द्यायला हवं होतं. पण आता उपयोग नव्हता कशाचाच.

जे उसवलं होतं ते मलाच दुरुस्त करायचं होतं. सॅम करशील नं माफ मला ? विचारांची गर्दी दूर सारीत मी गाडीच्या गर्दीत घुसले. गर्दीतून वाट काढीत नेहमीच्या कंपार्टमेंट पर्यंत पोचले. नजर आपसूकच राईट साईड विंडो सीट कडे गेली.

सॅम नव्हती तिथे. मग सगळ्या कंपार्टमेंटवरून एकदा नजर फिरवली. सॅम कुठेच नव्हती. थोडीशी खट्टू झाले.. कदाचित लवकर गेली असेल का ? तिला डिसूझाकडून नक्कीच कळलं असणार, मी आजपासून जॉईन होतेय. टाळतेय का मला ? भडकली तर असणारच आहे. सहाजिकच आहे म्हणा ..

एकदाची ऑफिसला पोचले.

'काय मॅडम, तब्येत बरी आहे का ?' सदाने पंचिंग मशिनशीच हटकलं.

'हाय सदा, मी बरी आहे. थँक्स. सॅम मॅडम आल्यात का?'

'हो आल्यात की. चार कॉफ्या पण मारल्यात. ते दोन ग्रुपचं चालू झालंय नं लफडं.'

बरं बरं म्हणत, मी झपाझप माझ्या क्युबिकलच्या दिशेने निघाले. पटकन सेटल होऊया आणि सॅम आणि अंड्याला भेटायला जाऊया. चार कॉफ्या.. म्हणजे मूड ठीक नाहियेे सॅमचा

एवढ्यात डिसूझा आली. 'कैसा है टूम? अबी का अबी सॅमसे स्वीस ग्रुप का डॉक्युमेंटेशन का ब्रीफ ले .. बहोत लोड है.'

येस, शुअर... ये ब्बात... आता कामाच्या बहाण्याने का होईना मला सॅमला भेटता येणार होतं आणि सॅमला मला टाळताही येणार नव्हतं. कामाच्या बाबतीत सॅम एकदम प्रोफेशनल. मी खुश होत सॅमच्या क्युबिकलच्या दिशेने निघाले. पण पुन्हा सॅम गायब. कुणाला विचारावं?

'अगं ती नेहाच्या इथे आहे,' विकास म्हणाला ..

'ओह ओके, थँक्स.' आणि मी नेहाच्या क्युबिकलमध्ये शिरले .. सॅम होती तिथे.. पाठमोरी. नेहाला बहुदा ब्रिफींग देत होती.

'हाय नेहा, हाय सॅम .'.

'हाय शाल्मली,' नेहाने उत्साहात उत्तर दिलं .

'स्वीस ग्रुप ब्रीफिंग तुझा बॉस आनंद देईल. मी मलेशिया ग्रुपमधे बिझी आहे.' सॅमचं तसंच पाठमोरं उत्तर.

पण डिसुझाने सांगितलं ...

'आनंद देणार आहे ते ब्रीफिंग he must be waiting for you.'

सॅमने मला ॲकनॉलेजसुद्धा केलं नव्हतं आणि माझ्याकडे बघितलंसुद्धा नव्हतं. थोडक्यात मला, 'जा इथून' हे सौजन्यपूर्वक सांगितलं गेलं होतं. क्लासिक, प्रोफेशनल, खडूस सॅम.. आऊच... बट दॅट हर्टस्.

मग दिवसभर सॅम कुठल्या न कुठल्यातरी कारणाने मला टाळत राहिली. लंचलाही नाही आली. आनंदही क्लायंट मीटिंगला बाहेर गेला. एकटीच जेवले आणि ते एकटेपण अंगावर आलं माझ्या. How much we enjoy each other's company. I want it all back. हार मानून चालणार नाही. ऑफिस सुटल्यावर नक्कीच सॅमशी बोलता येणार होतं.

पुढ्यातलं काम आटपून साडेसातला उठले. एक नजर सॅमच्या क्युबिकल कडे टाकली. Good, she is there.

'हे शाल्मली, कशी आहेस?' अंड्या मला टपली मारत म्हणाला. 'आज ब्रीफिंग नंतर बोलताच आलं नाही गं तुझ्याशी.'

'अंड्या, सॅम कशी आहे?'

'ठीक दिसत असली तरी ठीक नाहीये ती. म्हणून तर उगाच फालतू काम करत बसलीये. लेट सीटिंग करणार म्हणाली. Crazy Girl.'

'चल, मग आपण तिला काम थांबवायला लावूया आणि नेहमीसारखं एकत्र जाऊया टीपी करत.'

'हॅलो ती सॅम आहे.. ती काम संपल्याशिवाय बघणार पण नाही आपल्याकडे.'

'किती वेळ लागणार म्हणाली?'

'अजून १.३० तास.चल, आपण निघुयात का?'

आम्ही निघालो. ऑफिसमधून बाहेर पडल्यावर मी अंड्याला म्हटलं. 'अंड्या, तू जा. मी थांबतेय सॅमसाठी, मला बोलायचंय तिच्याशी.' अंड्या just patted on my back. जणू तो 'ऑल द बेस्ट' म्हणत होता.

मी गेटशी थांबले, सॅमची वाट बघत.

**सॅम**

९ वाजले. चला आता घरी जायला हरकत नाही. सगळे नक्कीच गेले असणार. दिवसभर शाल्मलीला टाळण्यात यशस्वी झाले होते मी. पण उद्याचं काय? रोज टाळता येणारच नव्हतं .पंच केले आणि निघाले. Oh God, I do miss her.

'Can we talk? मला महत्वाचं बोलायचंय तुझ्याशी सॅम. प्लीज.'

मी चमकून पाहिलं तर शाल्मली होती गेटपाशी. ही मुलगी माझी वाट बघत इथे उभी आहे? कुणास ठाऊक किती वेळ. आता टाळता येणारच नव्हतं तिला.

'शाल्मली, are you mad? किती वेळ उभी आहेस इथे? ऑफिसमध्ये तरी बसायचंस.'

'म्हणजे मी ऑफिसमध्ये बसायचं आणि आपण टाळत राहायचं एकमेकींना???'

'शाल्मली, I am so sorry.'

'Don't be सॅम. माफी मला तुझी मागायचीये. मनापासून. गेले तीन दिवस मी खूप वाईट वागले तुझ्याशी. I pushed you off. I am really sorry. पार्टीच्या दिवसानंतर मी खूप अस्वथ होते. तिथे जे घडलं आपल्या दोघींमधे... I won't lie, मलाही ते घडायला हवं होतं. आणि नेमकं तेच मला हादरवून गेलं. ते स्वीकारणं कठीण होतं माझ्यासाठी. माझ्या मैत्रिणीशी बोलले तेंव्हा I realized सॅम, I am madly in love with you. Yes, I am lesbian, I am proud of it. सॅम, माझ्या आईनंतर कोणासमोर मोकळेपणाने व्यक्त झाले असेन तर ते फक्त तुझ्यापाशी. You make me feel so special, happy. You make me feel safe. मी जेंव्हा तुझ्याबरोबर असते तेंव्हा मला कुणाचीही पर्वा नसते. I love the way you take care of me . You are an amazing human being. हे तीन दिवस एक क्षणही तुझी आठवण आली नाही असा गेला नाही. I missed you. तू नकार दिलास तरी I will always love you.'

शाल्मलीने सिक्सरच मारली होती. Is it really happening? She just said, she loves me? एव्हढा आनंद मला कधीच झाला नव्हता. आत्ता डिसूझा जरी समोर आली असती तर पप्पीच घेतली असती तिची ...

'सॅम???'

हम्म्म मी भानावर आले. I looked straight into those beautiful big brown tiger eyes.

'शाल्मली, you surprised me, of course, pleasantly. तुला पहिल्यांदा पाहिलं, तेंव्हाच तुझ्या प्रेमात पडले मी. तुझे सुंदर डोळे... I got so lost into them की तुझ्याशी धड बोललेही नव्हते मी. I felt instantly connected with you. No one ever made me feel the way you make me feel. मी सुद्धा समलैगिंक आहे आणि मी कॉलेजमध्ये असतानाच मला ते कळलं होतं.

शाल्मली, मला कळतंय हे सगळं खूप नवीन आहे तुझ्यासाठी. आणि हा प्रवास नक्कीच सोपा नाही. I can't guarantee you, की सगळं छान छान सोपं –सरळ असेल but if we stuck by each other we will cruise through. Let's not complete each other, instead complement each other. I promise you, through thick thin I will always be there with you. Let's crush this life together. I love everything about you, I respect you more for your courage, of accepting your truth.

शाल्मली, would you be my girlfriend?'

'हमम ... Yes .. of course, Yes. सॅम..'

'So, GF .... पावणेदहा वाजलेत. निघूया का? एक एक कॉफी मारूया. Let's celebrate Us.'

'सॅम, आजच्या दिवसातली कितवी कॉफी असेल ही?'

'अ.. अम्मम १० वी कदाचित..... Why? Ohh. GF झाल्यावर लगेच बॉसिंग सुरु? आणि तुझ्यामुळेच इतकी प्यायले ... कॉफी..'

'Noted सॅमी .. निघूया.' हसत हसत शाल्मली म्हणाली.

नकळत आम्हा दोघींचे हात एकमेकींच्या हातात गुंफले गेले आणि आम्ही निघालो. आमच्या नव्या प्रवासाच्या दिशेने.

कानात Ed Sheeran गुणगुणत होता.

I found a love for me
Darling, just dive right in
nd follow my lead
Well, I found a girl, beautiful and sweet
I never knew you were the someone waiting for me



सुरज राऊत

.... पण त्यापेक्षाही जे मनात घर करून बसले होते ते तिचे झुमके......ते शानदार होते दिसायला, त्यावरचं नक्षीदार काम आणि त्यावर असलेले रंगीबेरंगी दाणे म्हणजे एका शब्दात सांगायचे म्हणजे मन मोहित करणारी वस्तू. ताईचे झुमके चोरून घालण्याची हिम्मत मला काही झाली नाही. दिवस सरले, वर्षे संपली तरीही झुमका मनात तसाच होता आणि गावातल्या दुकानात झुमके मिळतीलही पण गावात सारेच एकमेकांना ओळखतात एरवी काय जोशी काकूंच्या दुकानातून झुमके घेतले असते तर आईला किवा ताईला लगेच कळलेही असते..

# झुमका झुमका

## कथा


**© सुरज राऊत**

**ईमेल :** suraj.supran@gmail.com


'झुमका' या शब्दातच काही वेगळ्याच भावना आहेत. माझा पुरुषप्रधान समाज या झुमक्याला फक्त बायकांच्या कानातला दागिना म्हणूनच पाहत असतो. पण यामध्ये स्त्रियांच्याच काय, काही पुरुषांच्या भावनाही अडकलेल्या असतात. मी स्वतः एक पुरुष आहे आणि माझ्याही झुमक्याविषयी खास भावना लहानपणीही होत्या आणि आजही आहेत.... त्यात माझं बालपण हे गांगलगाव, म्हणजे अगदी छोट्या गावात गेलं.. जिथले लोक अडाणी आणि धर्माच्या नावाखाली काहीही खपवून घेणारे. त्यामुळे लहानपणीची ही आठवण आपसूकपणे सांगाविशी वाटते. मी आज जरी उघडपणे एक समलिंगी मुलगा म्हणून जगात वावरत असेल आणि जरी मी थोडाफार मेकअप करत असेन तरी माझ्या कानात असणारे माझे झुमके हे बरेच काही बोलून जातात. मला आजही लक्षात आहे एक झुमका घालण्यासाठी मला खूप वर्ष लागली... आज आई, ताई आणि सुशी या सगळ्या मला समजूनही घेतात. लहानपणापासूनच आईला, ताईला तेवढेच काय मास्तरीणबाईना आणि माझ्या सुषमा नावाच्या मैत्रिणीला नेहमीच मी कानात कानातले घालताना बघितले आहे. मी सुषमाला सुशी आणि कानातल्यांना मनापासून झुमका असंच म्हणतो. कारण झुमका हा शब्द कानी पडताच तो लोकांना आकर्षित करतो असे मला नेहमीच वाटायचे आणि कदाचित तसे असेलही, देव जाणे....

साधारण मी पाचवीत होतो आणि त्या दिवशी सुषमा नवीन झुमके घालून शाळेत आली आणि मधल्या सुट्टीत मास्तरीणबाईंची नक्कल करताना माझी नजर सुषमाच्या झुमक्यांवर गेली आणि पाहताक्षणी मी त्यांच्या प्रेमातही पडलो. मी सुशीला विचारले, काय गं, नवीन झुमके आहे. कोणी दिले वगैरे वगैरे... मग काय? सुषमाच्या जणू मी हात धुवून मागेच लागलो की मला तुझे झुमके दे ना, एकदा मला घालायचे आहेत. आणि माझे हे बोलणे ऐकून सुशी मला चिडवायला लागली म्हणे की बायला आहेस का बे तू?, मूलं वेगळ्या प्रकारची कानातली घालतात त्याला बाळी म्हणतात. हे सगळं बोलणं शाळेत झाले आणि शाळा सुटल्यानंतर उगाच मी सुशीवर नाक फुगवून एकटाच शाळेतून निघून आलो. सुशीचे बोलणे डोक्यात घर करून बसलेले होते, आणि सुशी तिच्या जागी बरोबरही असेल, तिला त्यावेळेस मी सांगू शकलो नाही, पण ते सुशीचं नाक फुगवून चिडून बोलणे, बायला आहे का बे तू, हे आठवून मला हसायला येत होते.

तशी ती येडीच आहे, तिचं सोडा.... पण त्यापेक्षाही जे मनात घर करून बसले होते ते तिचे झुमके.... ते शानदार होते दिसायला, त्यावरचं नक्षीदार काम आणि त्यावर असलेले रंगीबेरंगी दाणे म्हणजे एका शब्दात सांगायचे म्हणजे मन मोहित करणारी वस्तू. मला काही ते झुमके सुशीने दिले नाही आणि घरात आईचे किवा ताईचे झुमके चोरून घालण्याची हिम्मत मला काही झाली नाही. दिवस सरले, वर्षे संपली तरीही झुमका मनात तसाच होता, आणि दररोजच सुशीला झुमके मागणे यापलीकडे काही कामही नव्हतेच आणि गावातल्या दुकानात झुमके मिळतीलही पण गावात सारेच एकमेकांना ओळखतात एरवी काय जोशी काकूंच्या दुकानातून झुमके घेतले असते तर आईला किवा ताईला लगेच कळलेही असते.. त्यामुळे माझी कधी हिम्मतच नाही झाली.....आता मी दहावीत होतो आणि सुशीही माझ्यासोबतच ...मग काय? सुशीच्या परत मागे लागलो अर्थातच झुमक्यासाठी...मी अगदी तिची नक्कल करायला लागलो तिच्या समोर तिच्या आईची नक्कल केली...तिच्या आईचा एक डायलॉग मला खूप आवडायचा. त्या म्हणायच्या, हिच्या डोसक्यात भुस्कट भरलंय. हिले काहीभी सांगा त्याचा उलटंच करते ही पोट्टी....एवढा सगळं करूनही तिने मला पळवून लावले, आणि झुमके काही दिलेच नाही. नंतर मी ठरवले झुमका कसंही करून मी मिळवणारच आणि कानातही घालणारच. आमची सहल निघणार होती आणि मी सहलीला जायचे ठरवले.

सहल पण काही लांब नव्हती गेलेली. सहल जवळच शेगावला गेलेली. आणि सर्वांना माहितीच असेल शेगावला गजानन महाराजांचं मंदिर आहे...ठरल्याप्रमाणे सहल निघाली आणि मी खूप उत्तेजित होतो शेगावला जाण्यासाठी आणि सकाळी दहा वाजेपर्यंत आम्ही शेगावला पोहचलोही......आम्ही सर्वांनी महाराजांचे दर्शन घेतेले आणि मंदिराबाहेर पडलो मंदिराच्या बाहेरच वेगवेगळ्या वस्तूंच्या छोट्यामोठ्या दुकानी आहेत त्यातच काही झुमक्यांची दुकाने तिथे होती आणि मग काय माझे पाय काही थांबले नाही, मी सुशीला घेऊन दुकानात घुसलो आणि दुकानात माझेच काही हरवले आहे असा इकडेतिकडे नजर घालू लागलो आणि माझे डोळे येऊन थांबले एका सुंदर झुमक्यावर.... मी बोललो दादा तेवढे ते कानातले बघू आणि ते कितीला आहेत. दादांनी कानातली दाखवली आणि सांगितले पन्नास रुपयाचे आहेत.....तेव्हा मात्र सुशी मला चिमटे काढू लागली अरे ये माकडा काय चाललाय तुझं? तुला हा कसला नाद लागलाय कानातली घालायचा... मी शांत होतो पण तिची बडबड सुरूच होती...तिला मग मी संगितले तुला सगळं सांगतो फक्त मला एवढं विकत घेऊ देत आधी......ते झुमके मी घेतले आणि तिला डोळा मारत विचारले सुशे तुला काही घ्यायची इच्छा आहे का...ती मोठे डोळे करत आणि नाकावरचा घाम पुसत बोलली, मले काही भी नको भो, तू इथून चल पहिले......सुशी घाटावरची होती म्हणून ति अशीच भो तुले माले असच बोलायची..... ते सोडा, मला माझे झुमके मिळाले होते आणि आता मनाचा तोल घसरत होता ते झुमके कानात घालण्यासाठी कारणकी खूप वर्षापासूनची इच्छा पूर्ण होणार होती.

काही वेळाने गाडी निघाली आमची, म्हणजेच सहल संपली होती. शेगाव वरुन गांगलगावला जाण्यासाठी आमची बस निघाली आणि ही सुशी माझ्या बाजूच्या सीटवर येऊन बसली... आणि बडबडायला चालू झाली.

'सांग मले तूह्या डोक्स्यात काय चालून राहीलं ते...' तिला मी गप्प केले आणि बोलायला चालू केले... हे बघ सुशे माला झुमके घालायला आवडतात म्हणजे एक मुलगी त्या झुमक्यामधे जेवढी उठून दिसते ना तेवढाच उठून मीही दिसेल असे मला वाटते, ही एक माझी भावना आहे गं .कस सांगू तुला... जेव्हा आई ताई आणि तू झुमके घालतेस ना अगदी तसेच मलाही झुमके घालायला आवडतात आणि मी सध्या तुझ्याशिवाय कोणालाही हे सांगू शकत नाही कारण की लोक माझ्यावर हसतील मला चिडवतील तेवढेच काय घरी ही सांगतील गं...आणि

मग आई बाबा ताई काय बोलतील मला, या सगळ्याची मला भीति वाटते ..आणि माझ्या भावना काहीश्या वेगळ्या आहेत ते तुला वेळ आल्यावर नक्कीच सांगेन असा बोललो.....तिच्या डोक्यात काही घुसले की नाही देव जाणे....पण ती एकच बोलली मी हे कोणाले भी बोलणार नाही.....पण तू मले प्रॉमिस कर की तू एकदाच हे कानातले घालणार नंतर कधीच असले काही सोंग करणार नाहीस... मी तिला खूप अलगदपणे हो बोललो, कारणकी मला तिला शांत करायचे होते... आणि तो प्रवास संपला...घरी पोहोचलो आणि घरात माझ्या खोलीत गेलो, खोलीत जाताना आरसा लपवून खोलीत आणला होता मी, नाहीतर उगाच आईचे प्रश्न माझावर आले असते.......ते झुमके मी हातात घेतले आणि कानात घातले आणि आरशामध्ये स्वतःला न्याहाळत बसलो.....असो ...या प्रकारे शेवटी झुमका घातला मी आणि आजही घालतो. आजकाल तर सुशीच झुमके आणून देते मला....!

# ताकाला जाऊन...

## नाटक : एकपात्री मोनोलॉग



**बिंदुमाधव खिरे**

लेखक LGBTIQ ॲक्टीव्हीस्ट आहेत.

**ईमेल** : bindumadhav.khire@gmail.com

**मग इथे समोर हँडल बार आहेत. तिच्यावर पुलअप्स काढतो, स्विंग्ज घेतो. त्याचे लांब पाय, फुटबॉल प्लेअर्सच्या असतात तशा टंच मांड्या... (श्वास जोराने ओढतो आणि व्हीलचेअरच्या** armrest **ला धरून) असं बारला धरतो आणि दोन्ही हातांवर शरीर तोलतो. मग हळूच असं पुढे वाकून पाय ताठ मागे घेतो. मग जेवढे पाय वर जातील तेवढे घेतो.**

बिंदुमाधव खिरे गेली १८ वर्षे LGBTI ॲक्टिविस्ट म्हणून पुण्यात कार्यरत आहेत. ते बिंदूविअरर राईटस फौंडेशन चे अध्यक्ष आहेत.

(एक पंचविशीचा युवक व्हीलचेअरवर TV बघत बसलाय. पायावर शाल आहे. रिमोटने TV बंद करतो आणि व्हीलचेअर वळवतो व प्रेक्षकांसमोर व्हीलचेअर आणतो.)

ही TV वरची जाहिरात पाहिली आहे?.... दिव्यांग शब्दवाली... किती किळसवाणा शब्द आहे. बस, रेल्वे तर सोडाच, सालं, मला शेजारच्या बागेतसुद्धा व्हीलचेअरवरून फिरायला जाता येत नाही. बागेच्या पायऱ्यांपाशी रॅम्पच नाही. पूर्वी जायचो, तेव्हा प्रतु व्हीलचेअर ढकलत मला पायऱ्यांपाशी न्यायचा. मग मला उचलून पायऱ्या चढायचा, बाकड्यावर बसवायचा आणि मग व्हीलचेअर आणायचा. येताना परत तसंच.

(चिडून) नुसतेच नवनवीन शब्द शोधतात येडझवे (Pause) सॉरी... माझ्या भाषेतसुद्धा बदल झालाय...(मांडीवर हात मारत) हे गेल्यापासून. जाऊ दे. काहीही म्हणा रे. लुळं म्हणा, पांगळं म्हणा, अधू म्हणा, विकलांग म्हणा, दिव्यांग म्हणा पण 'access' तर द्या.

आम्ही 'तद्नुभूती' म्हणजे 'empathy'. 'empathy' आणि 'sympathy' मधला फरक. हे सगळं Psychology मध्ये शिकतो. मी ही शिकतोय. डिस्टन्स लर्निंगमध्ये, पण जोवर या खुर्चीत बसत नाही तोवर... तोवर आपला अनुभव इतरांपर्यंत कसा पोहोचवायचा? हाच यक्ष प्रश्न आहे.

(Pause)

ॲक्सिडेंटच्या अगोदर आणि ॲक्सिडेंटच्या नंतर (Pause). अगोदर आणि नंतर. नंतर पहिला महिना काही काळ बेशुद्ध, काही काळ शुद्धीत, कधी भास, कधी वेदना. या चौघांचा लपंडाव, बस... जरा बरं वाटायला लागलं तेव्हा लक्षात यायला लागलं की, "बाबा दुसऱ्या खोलीत आहेत, ठीक आहेत." हे जे सगळे सांगताहेत ते खोटंय. डॅडोबा गेलाय. तो इन्स्टंटली गेला. त्याला काहीच कळलं नाही. सुटला.

मग मला लक्षात यायला लागलं की, पायांना संवेदना नाहीत. डॉक्टरांना विचारायचो, नर्सना विचारायचो, "काय झालंय?" "तू फक्त आराम कर, सगळं

ठीक होईल.” निर्लज्जपणे सर्वजण खोटं बोलत राहिले. (कुचकटपणे हसत) आणि हे सर्व मला दुबळं समजतात. डॅडोबा असता तर त्यानी मला स्पष्टपणे वस्तुस्थिती सांगितली असती. काही असतात ज्यांना वाईट बातमी लपवून ठेवलेली हवी असते rather आवडते. मी, डॅडोबा त्यातले नव्हतो.

खरं तर, कोणी काही सांगत नाही म्हणूनच जास्ती धास्ती वाटली. आई सारखी पायाला काळे, लाल दोरे बांधत होती, अंगारे लावत होती. तेव्हा मी विरोध करायच्या परिस्थितीतच नव्हतो.

प्रतुसुद्धा, “नको टेन्शन घेऊस, आराम कर” माझे डोळे चुकवत म्हणायचा. You too Brutus?

By the way, (थांबतो, आवाज ऐकल्यासारखा करतो आणि व्हीलचेअरवरून खिडकीपाशी जाता जाता) प्रतिकला मी प्रतु म्हणतो आणि माझ्या डॅडीला मी डॅडोबा म्हणतो. एकेरीत. (खिडकी बाहेर बघतो. परत येता येता) यावेळी एक जण पेपर टाकायला येतो. विशीचा असेल, उंच, सावळा. त्याचा तो ठरलेला पांढरा टी-शर्ट आणि ट्रॅकची हाफ पॅन्ट. त्या पॅन्टवर त्याच्या ढुंगणावरून जाणारी पोपटी रंगाची कड. बाईक वरून येतो. आजुबाजूला पेपर टाकतो. मग इथे समोर हॅंडल बार आहेत. तिच्यावर पुलअप्स काढतो, स्विंग्ज घेतो. त्याचे लांब पाय, फुटबॉल प्लेअर्सच्या असतात तशा टंच मांड्या... (श्वास जोराने ओढतो आणि व्हीलचेअरच्या armrest ला धरून) असं बारला धरतो आणि दोन्ही हातांवर शरीर तोलतो. मग हळूच असं पुढे वाकून पाय ताठ मागे घेतो. मग जेवढे पाय वर जातील तेवढे घेतो.

त्याचा टीशर्ट खाली सरकतो आणि त्याचं गुळगुळीत पोट दिसतं. त्याच्या गळ्यातली चेन खाली लोंबते. एकदा तर (डोळे मिटून घेत) एक नाजूक सूर्याचा किरण त्या चेनच्या खड्यावर पडला आणि या राजहंसाच्या चोचीत एक मोती चकाकला. (डोळे उघडतो). मग तो पाय खाली घेतो मग पाय फाकवून बारवर ठेवतो. त्याचं टंच ढुंगण बघून मला प्रतुची आठवण होते आणि मी कमालीचा उत्तेजित होतो.... (Pause) फक्त मनानेच.

पहिला महिना हॉस्पिटलमध्ये असताना मला उत्तेजना येते का? हे जाणण्याच्या मी मन:स्थितीतच नव्हतो. पण हळूहळू परत प्रतुचं शरीर खुणवायला लागलं. त्याचे लांब पाय, रुंद गुळगुळीत छाती, शर्टाची वरची दोन उघडी बटणं, गळ्यात सोन्याची चेन, त्याचे जिममध्ये कमावलेले बायसेप्स. पण मला खाली काहीच जाणवत नव्हतं. सुरवातीला वाटलं की, ही पासिंग फेज आहे. मी मुद्दामून प्रतुबरोबर सेक्स करायच्या फॅंटसीज मनात आणयचो. पेपरमधल्या मेल अंडरवेअरच्या जाहिराती चाळायचो. त्याला हल्ली इनरवेअर असं असेक्शुअल नाव देतात. (Pause).... नो.... काहीही नाही....

(Pause)

छातीत अशी सणसणीत कळ उठली. पाय गेल्याचा त्रास झाला नाही तेवढा मला. (Pause) एकवेळ पाय गेले असते तरी चाललं असतं, पण....

(Pause)

माझा राग, दु:ख, भीति आणि असहाय्यता या सर्वांना एकच सावज हाती लागलं.... प्रतु

कारण तोच सगळ्यात जवळचा. माझ्या ॲक्सिडेंट नंतर माझ्यापेक्षा त्याचंच वजन जास्त घटलं. तो कॉलेजला महिनाभर गेला नाही. जिमला जाणं बंद केलं. त्याच्या हरणासारख्या डोळ्याखाली काळं आलं. जेवणाची, झोपण्याची आबाळ. अक्षरश: वेडापिसा झाला होता. माझं सगळं करायचा. जेवण भरवण्यापासून ते Sponging पर्यंत, युरीन बॅग बदलण्यापासून ते ढुंगण पुसण्यापर्यंत. (Pause) आपल्या गड्याबरोबर सेक्ससाठी नग्न होणं आणि अशा परिस्थितीत नग्न व्हावं लागणं, the indignity of it all.

(पाण्याची बाटली घेतो आणि पाणी पितो. झाकण लावतो.) तो आला की, मी झोपायचं नाटक करू लागलो. जागा असलो तरी बोलायचो नाही. तो बोलला तर उद्धट उत्तर द्यायचो. निष्कारण त्याला त्रास द्यायचो. करतोस ना माझ्यासाठी एवढं.... मग अजून कर...कर...कर... आणि तो शांतपणे सर्व सहन करायचा. एक दिवस त्याने मला प्यायला पाणी दिलं तर चिडून मी ते पाणी त्याच्या तोंडावर फेकलं. (बाटली खाली ठेवतो.) तो माझ्याकडे त्याच्या मोठ्या डोळ्यांनी नुसता बघत राहिला.

(Pause)

मला... मला कमालीची लाज वाटली. कमालीची. त्याला असं जवळ ओढून घेतलं आणि त्याच्या पोटाला मिठी मारून अगदी काळीज फाटेस्तोवर रडलो..... आणि तो मायेने माझ्या केसांवरून हात फिरवत राहिला. किती तरी वेळाने त्याला म्हणालो, "डॅडोबा गेला ना? पाय पण ना? इ...इ... इरेक्शनही गेलं रे." मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तो शांतपणे रडत होता. मला गच्च आवळून रडत राहिला.

कदाचित तो यासाठीही रडत असावा की, त्यानी भविष्य जाणलं होतं. (फोन वाजतो) मलाच ते लक्षात यायला वेळ लागला. (फोन घेतो.)

" हो,....अं... खामकर चौकात तू कुठे वळलास?.... नाही, नाही. परत उलटा ये. तू उजवीकडे वळायचं होतंस.... हो. आणि उजव्या हाताने सरळ ६ एक कि.मी. ये.....हो, आहे. मोठी पाटी आहे. शिवांगी हौसिंग सोसायटी. त्या पाटीपाशी आलास की मला फोन कर. मग मी पुढचा रस्ता सांगतो..... ओके बाय." (फोन ठेवतो.)

एखादी गोष्ट मिळत नसेल तर वाटतं की इतर सर्व आहे ना? मग याच्यावाचून काय एवढं अडलंय? (कुचकटपणे) 'इतरांकडे बघा. अनेकांच्या वाट्याला एवढंही सुख येत नाही. बघा जरा त्यांच्याकडे.' आपल्यापेक्षा कोणीतरी कोणत्यातरी प्रकारे जास्ती वेदनेत आहे हे बघून सुखी व्हायचं का? किती घाणेरडा विचार आहे हा. दिवस-दिवस उपाशी असलेल्याला "अरे, तिकडे मेळघाटात कुपोषित मुलं मरताहेत" असं सांगून त्याची आग शमणार आहे का?

मला विचारा.... माझ्या आत्त्याला विचारा.....

तिचा नवरा लग्नानंतर आठ-नऊ महिन्यातंच गेला.... ही माझ्या जन्मा अगोदरची गोष्ट. हळूहळू तिच्यात विक्षिप्तपणा तर आलाच... पण ती कुठल्याही लग्नकार्यात आली की आम्हा पोरांना खूप सावध राहावं लागायचं. मोठ्या पुरुषाला चार लोकांत स्पर्श करणं शक्य नाही, म्हणून की काय, आत्त्याला तरुण मुलांना स्पर्श करायची सवय लागली. कोणी गाफील असला की तिच्या हाती लागलाच. पाठीवरून हात फिरवणार, "एवढासा होतास, माझ्या मांडीवर सूसू करायचास, मग मी तुझा लंगोट बदलायचे" असं म्हणत सहज तिचा हात खाली स्पर्श करून जाणार. "बाप रे! आता केवढ्या मिश्या फुटल्यात" म्हणत पापा घेणार. दहावी-अकरावीत असतांना मी दोन-तीनदा तिच्या तावडीत सापडलोय. तिच्या तावडीतून सुटलो की तिने पापा घेतला तो गाल घसा-घसा 'ईई' करत पुसायचो. एका लग्नात आईने हे पाहिलं आणि मलाच ओरडली, "काय करतोस रे इथे आ? जा बाहेर." जर ही गोष्ट माझ्या आईच्या लक्षात आली होती तर ती सगळ्या जगाला नक्कीच माहीत असणार!

(Pause)

माझी इंद्रियं जणू रडार बनलीयेत. सतत त्या एकाच गोष्टीचा शोध घेतात, शरीर सुख. (Pause) नाही.

सेक्स...सेक्स... सेक्स.... (Pause) नाही. फक...फक...फक...फक...फक...फक...फक....फक... ('फक'...म्हणतांना स्पीड वाढत जातो आणि मग शेवटी कमी होतो, वीर्यपतन झाल्यासारखा).

माझी भाषा, माझी नजर सगळं बदललंय. पोर्नोग्राफी बघायची सवय जडलीए. प्रतु होता तोवर मला पोर्नोग्राफीची कधी गरजच पडली नाही..... शॉवरमध्ये, बेडवर, ओट्यावर, टेबलवर, टेबलखाली, रात्री माझ्या गच्चीवर-उघड्यावर, त्याच्या कारमध्ये.... मला वाटतं त्याच्या कारची ट्रंक आणि माझ्या घरचा माळा सोडला तर आमचं सर्व ठिकाणी सर्व काही झालंय. प्रत्येक प्रकारची जेली वापरलीये, चॉकलेट, स्ट्रॉबेरी, बनाना.... प्रत्येक फ्लेवर मी चाखलाय.... (Pause)

आणि डॅडोबाने आमचं नातं स्विकारल्यावर तर मनावर कोणतंच ओझं उरलं नाही. त्यांच्या कधी लक्षात आलं मला माहीत नाही, पण माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मला ते कळलं. "काय करू गोड संध्याकाळी?" आईनी विचारलं होतं. मी म्हणालो, "काही नको, मी पार्टीला जाणार आहे." तेव्हा डॅडोबा म्हणाला, "त्याला कॅंडल-लाइट डीनरला जायचं असेल प्रतुबरोबर, तू नको कबाब में हड्डी बनूस." मी धस्स होऊन झटदिशी डॅडोबाकडे बघितलं. शब्दात कुचकटपणा नव्हता, मस्करी नव्हती. माझ्या चेहऱ्यावरचा भाव बघून माझ्या पाठीवरून हात फिरवत म्हणाला, "You are lucky, to have found your love". माझ्या डोळ्यात टचकन पाणी आलं. मी डॅडोबाला घट्ट मिठी मारली. तोपर्यंत, "मग आताच औक्षण करून घेते" म्हणत आई स्वयंपाक घराकडे वळलीही होती. समोर सर्वकाही मांडूनही आईला काहीही दिसलं नाही.

मी लकी असलो तरी (थांबून वळून बाजूच्या माडीवर बघतो) "काय?... नको. आता माझ्याकडे एकजण येणार आहे. मला डिस्टर्ब करू नकोस" (परत पुढे बघत).... तरी डॅडोबा त्या बाबतीत लकी नव्हता. आईचं आणि डॅडोबाचं विळ्या-भोपळ्याचं सख्य. इतकं की डॅडोबा आईच्या बेडरुममध्ये कित्येक वर्षं झोपलाच नाही. वरच्या मजल्यावर त्याने त्याची बेडरुम थाटली. आणि नंतर शंभरवेळा तरी किमान आईने मला बजावलं, "बाहेर कुठे बोलू नकोस., याद राख!"

डॅडोबा, आई त्यांच्या गरजा कशा भागवत होते कोण जाणे?

डॅडोबा गेल्यावर मी आईला वरच्या मजल्यावर पिटाळायचं ठरवलं.... तिथे तिला काय महाराजांची ध्यान धारणा करायची ती करू दे!

खरं तर तो स्वावलंबनाचा माझा प्रवास हॉस्पिटलमधेच सुरू झाला. प्रतुच्या मिठीत आयुष्यभराचं एकदा रडून घेतलं....आणि मग.... आणि मग त्याच्या आधाराने स्वत:ला सावरलं. इतरांची अनावश्यक मदत घेणं बंद केलं. "जरा ते औषध दे, पाणी दे" "जरा बेल वाजव", सगळंच्या सगळं. प्रतुला खडसावलं, "मी जोवर मदत मागत नाही तोवर नुसतं तिथे बसायचं आणि बघायचं. हातातून गोळी, ग्लास खाली पडला तरी जोवर मी सांगत नाही तू उचलायचा नाही. नाही म्हणजे नाही."

ओल्या फडक्याने पायाचे सगळे अंगाऱ्याचे डाग पुसून टाकले. नर्सला नर्सिंग स्टेशनवरून कात्री आणायला लावली आणि सर्व गंडे-दोरे कापून टाकले. नंतर आईने कांगावा केलाच, "अरे, कुठेयत ते मंतरलेले दोरे...?" मी म्हणलं,"संडासात टाकलेत". मला जस जसं बरं वाटायला लागलं तस तसं आईच्या कपाळावर आठ्या पडू लागल्या. घरी आलो त्या दिवशी संध्याकाळी आई ब्लॅंकेट आणि उशी घेऊन आली की माझ्या खोलीत. मी

विचारलं, "हे काय?" ती म्हणाली, "तुला काही लागलं बिगलं तर?... मी इथेच झोपत जाईन. गादी आणते."

(Pause) मग मी स्पष्टच म्हटलं, "माँसाहेब जरा इकडे लक्ष द्या.... नीट ऐका. मी परत सांगणार नाही..... मला नागडं झोपायची सवय आहे.... मी नागडा झोपणार आहे....." असं म्हणून मी लेंग्याच्या नाड्या सोडून लेंगा खाली घ्यायला लागलो. आई छूऽऽऽ .

हिला मी वरच्या मजल्यावर पिटाळलं नसतं तर तिच्या संगतीत मी पांगळा झालो असतो. नातेवाईकांनी तिच्या बाजूनी मध्यस्ती करायचा प्रयत्न केला, पण मी भीक घातली नाही. फक्त चुलत काका माझ्या बाजूने उभा राहिला....

(Pause)

(खट्याळ हसत). (Pause) त्याची बायको बाळंतपणासाठी माहेरी गेली तेव्हा

आला आणि मला मोबईलवर 'गे ओरल सेक्स' ची क्लिप दाखवली. म्हणाला, "इंटरेस्टेड?" माझ्या नकारानंतर त्याचं येणं बंद झालं.

(Pause)

पण अगदी खरं सांगू? एक सेकंद मला मोह झाला होता. किती दिवस उपाशी होतो. शिक्षणात गुंतवून घेतलं. चित्रकला शिकायचा प्रयत्न केला. पण प्रत्येक क्रिया मला एकाच गोष्टीची आठवण करून देते.

(व्हिलचेअरने बाजूला जातो... आणि आरसा आणतो. त्याच्यात स्वत:चं प्रतिबिंब बघत)... मला आईच्या महाराजांचे डोळे दिसतात. उपाशी, चकाकणारे, वखवखलेले. नजरेने बलात्कार करणारे. (आरसा बाजूला ठेवत) मी एकदाच गेलो होतो त्या आश्रमात. तिथले सर्व ब्रह्मचारी. काही वीशीचे, काही ऐंशी ओलांडलेले. सगळ्यांची शरीरं कृष. माझ्या पायांसारखी दिवसातून एकदाच खायचं. दिवसभर जप, नामस्मरण, पूजा, आरती बस. मातोश्री खांद्यावर पदर घेऊन महाराजाच्या पाया पडायला वाकल्या तेव्हा माझी नजर होती महाराजावर. आणि त्याची नजर चकाकत होती मातोश्रींच्या (छातीला हात लावत). (सेल फोन वाजतो, उचलतो) जो काही अध्यात्मावरचा माझा विश्वास होता तो त्याच क्षणी उडाला.

"हॅलो..... हा..... ओके.... येस.... सरळ ये..... हो.... till the end of the road.... मग उजवीकडे वळ.... ती गल्ली संपते तिथला डावीकडचा बंगला..... 'पितृछाया'." (फोन ठेवतो).

ऑनलाईन डेट शोधायला जावं तर मी सत्य सांगितलं की उत्तरच येत नाही. त्याचीही आता सवय झालीय. प्रेम तर खूप दूरची गोष्ट. मग काय उरतं?.... शरीराची उपासमार. त्याचं काय करायचं?

दोन महिन्यातून एकदा रवी माझे केस कापायला येतो. साठीचा. पोट सुटलेला. सिगरेट ओढून ओढून पिवळी पडलेली बोटं. हल्ली..... त्याचाही स्पर्श मला हवाहवासा वाटू लागलाय. मी चांगल्या मूडमध्ये असलो आणि रवीचा विचार मनात आला, की एकदम किळस वाटते. पण कधीकधी मात्र तोही चालेल म्हणून मन कमालीचं हातघाईवर येतं. तो जेव्हा केसांवर स्प्रे मारतो तेव्हा मी डोळे मिटून घेतो आणि माझ्या केसांतून फिरणारी बोटं प्रतुची आहेत असं मी स्वत:ला भासवतो. दाढी करताना प्रतु अलगद माझ्या खालच्या ओठावर बोट ठेऊन खाली वस्तरा फिरवतो. मिशा बारीक करताना सहज प्रतुचं बोट माझ्या ओठांमध्ये घसरतंय..... कपाळावर कंगव्याने केस पुढे घेऊन अलगद कात्रीने केस आडवे कापताना मला...... (स्वत:ला सावरत).

म्हणून म्हटलं मसाजिस्टला बोलवू. (Pause) पोरगा असल्याचे फायदे आहेत....पोरगी असतो तर आईने

मला घरात कोंडूनच ठेवलं असतं. देवपूजा कर, भाजी निवड आणि TV सिरीयलस् बघ.

जाहिराती पाहिल्या, वेबसाईटस् पाहिल्या. फोनवर चौकशी केली. 'इतर सर्विसेस्' (हाताने Quote ची खूण करत) देता का?" काहीजण सरळ हो म्हणतात. पहिला आला आणि मला व्हिलचेअरवर बघितल्यावर 'नाही' म्हणाला. पण मला राग आला नाही. तो नकार मी अगोदरच अनुभवला होता.

प्रतुच्या वाढदिवसाच्या दिवशी तो जबर सेक्सी दिसत होता. छान डियोसेंट लावला होता. हातात चांदीचं कडं.... मीच ऑनलाइन मागवलेलं. त्याच्या हातात घातलं. त्याला न्याहाळलं आणि मग सहज त्याला जवळ ओढलं आणि त्याच्या बेल्टचं बक्कल काढायला लागलो. "काय करतोयस" म्हणत त्याने मला झटदिशी मागे ढकललं. (खूर्ची मागे करत)

मी गोंधळलो. याला काय रिस्पॉन्स द्यावा तेच कळेना. पण मला गांभीर्य लक्षात आलं नाहीं. " काय झालं बाळाला लाजायला? लहानपणी तू जेवढ्या वेळा नागला नव्हतास तेवढ्या वेळा माझ्यासमोर नागला झालायस.' मी लाडात म्हणालो.

" या परिस्थितीत हे सुचतंच कसं रे? शी..." म्हणत तो ताडकन उठून shoes घालायला लागला.

मला त्याचं म्हणणं कळलंच नाही. वाढदिवसाच्या दिवशीच आपण हे का करतोय? पण किती तरी वाढदिवस आम्ही असंच सेलिब्रेट करत आलोए... नाही.... हे...हे... माझ्या.... परिस्थिती म्हणजे?

" नात्यात फक्त एवढंच असतं का?" म्हणत प्रतु गेलासुध्दा.

ज्याचं वैराग्य मरत्या श्वासापर्यंत येत नाही त्याचं वैराग्य तो मला या वयात शिकवत होता. 'त्याच्या वाचून जीव जातो का? नाही ना? मग तो 'Optional add on' आहे' (बायकी आवाजात). हा.....

आणि गम्मत म्हणजे त्यानंतर मलाच अपराध्यासारखं वाटायला लागलं. आपण अशा परिस्थितीतही... आपल्यालाच असं वाटतं का? इतर 'differentely abled' (हाताने Quoteची खूण करत) लोकांचं काय होतं? कसं कळणार? कसं कळणार? कोणी बोलतंच नाही..... अणि बोललं असेलच तरी आपण कशाला ऐकतोय?

पण....पण त्यांना तसं वाटत असो किंवा नसो.... माझ्या सेक्श्युअल गरजा आहेत.... असेक्श्युअल जगणं मला मान्य नाही...नाही.

दररोज वाऱ्यापावसात न चुकता पार वाघोलीहून येणारा प्रतु आठवड्यानी आला. असा दोन हात दूर बसला. मान खाली घालून. त्याचा गळा आवळावासा वाटत होता. त्याच्या कुशीत शिरून हंबरडा फोडावासा वाटत होता. केलं काहीच नाही. फक्त त्याच्याकडे एकटक बघत राहिलो.

"काकू, काही बाहेरची कामं आहेत का?" म्हणत स्वयंपाक घरात गेला. यादी घेऊन आला.

मी विव्हळून म्हटलं, 'का रे बोलायचं नाही का'

'नाही.... सामान घेऊन येतो' म्हणत गेला.

त्यानंतर मग आठवड्या-आठवड्याने यायला लागला. ते 'Befriender' येतात ना तसे. सोशल सर्विस. मी बोललो तरच तो उत्तर द्यायचा. शेवटी जेव्हा तो म्हणाला "तू थोडी ध्यानधारणा कर नं, म्हणजे हे सगळं कमी होईल" तेव्हा मीच त्याला मुक्ती दिली (हात जोडत). एक सेकंद तो वाद घालणार असं वाटलं, पण नाही. ओझं उतरल्यासारखा तो मान खाली घालून निघून गेला. मी त्याचा नंबर डिलीट केला. FB वरून त्याला ब्लॉक केला.

(Pause)

मला वाटतं, जे झालं ते चांगलंच झालं. नाही तर.... कोंडमाऱ्यातून येणारा राग कोणावर तरी काढत बसायचं. एकमेकांना छळून छळून दुसऱ्याच्या वेदनेत सुख शोधायचं. एकनिष्ठ राहिला तरी मुद्दामून दुसऱ्यावर संशय घेत बसायचं आणि मग, आपण जे जाणूनबुजून खोटे आरोप करतो आहोत, त्यांच्यावर हळूहळू आपणच विश्वास ठेवायला लागायचं. "असेलच तुझं बाहेर काही तरी.... मला बाबा काय कळणार?" असं मिश्किलपणे बोलायला सुरुवात करायची आणि हळूहळू त्याला धार लावत दुसऱ्याला पार रक्तबंबाळ करायचं. अंहं... नकोच ते....

इतक्या दिवसांनंतर, हा पहिला मसाजिस्ट आहे जो माझ्या व्हीलचेअरवरचा सेल्फी बघून 'तयार झालाय'.... होय (Quoteची खूण करत) 'सगळी' सर्विस द्यायला. मी मनापासून त्या मसाजिस्ट कम वेश्येचा आभारी आहे. याला समाजसेवा म्हणता येणार नाही. कारण तो धंदा करतोय..... Infact 'पैसे जास्त घेईन' म्हणालाय. घे बाबा. घे. (बेल वाजते) आला. (व्हीलचेअर टेबलापाशी नेतो. स्प्रे मारतो) हा स्प्रे मारला की म्हणे बायका धावत येतात.... पुरुष येतो का बघू....

*

**टिप** : 'ताकला जाऊन' प्रयोगाचा मराठी रंगभूमी परिवेक्षण महामंडळाचं (Marathi Theatre Censor Board) प्रमाणपत्र क्रमांक आहे : DRM– ५१७/२०१८, तारीख : ११/०४/२०१८

# लिपस्टीक

## कथा

© सिद्धांत

चतुर्थी म्हणून मी, आई आणि तिची एक मैत्रीण दगडूशेठ गणपतीला निघालो होतो. बसची वाट बघत बसस्टॉपवर उभे असताना अचानक टाळ्यांचा आवाज ऐकू आला. आजपर्यंत ऐकलेला सगळ्यात मोठा आवाज होता तो...कोण्या तृतीयपंथीचा. सावळ्या रंगाची, पिवळ्या रंगाचा फुले असलेला कुर्ता आणि पांढरी लाल काठाची लुंगी नेसलेली, हातात हिरव्या बांगड्या आणि दुसऱ्या हातात घड्याळ, कानात सुंदर झुमके आणि ओठावर मस्त डार्क लिपस्टीक. केस वर बांधले होते. पावसामुळे मेकअप थोडा खराब झाला होता, पण छान दिसत होती ती. बस आली म्हणून काकू पुढे गेली पण पाहिजे ती बस नाही म्हणून मागे आली. त्याच वेळेस काकूंची नजर तिच्यावर पडली. नेहमीच्या सवयीप्रमाणे तिने त्यांच्याविषयी वाईट बोलणे चालू केले आणि मी माझ्या सवयीप्रमाणे त्या तृतीयपंथीकडे निरखून बघत होतो. ती जवळ आली आणि माझ्या शेजारी बसलेल्या मुलांना म्हणाली ए, काहीतरी दे ना. आई आणि काकू दोघी माझ्यापुढे उभ्या होत्या. तिने माझ्याकडे बघून एक छान स्मितहास्य केलं. मी ही हसलो. मग ती मला म्हणाली, दादा, तू तरी दे काहीतरी. कसे कोणास ठाऊक पण आईने मला १० रुपये द्यायला सांगितले. मी पैसे दिले. तिने आशीर्वाद दिला, डोक्यावर हात ठेवून. काकू आणि आईच्या डोक्यावर पण हात ठेवला. तिची नजर माझ्या आईच्या लिपस्टिकवर गेली आणि ती लगेच बोलली, तुमची आणि माझी लिपस्टिक सेम आहे. आमच्या चौघांच्या चेहऱ्यावर हसू आलं. ती पुढे निघून गेली, पण कुठे तरी माझ्या हृदयात एक जागा करून गेली.....!!!

**नेहमीच्या सवयीप्रमाणे तिने त्यांच्याविषयी वाईट बोलणे चालू केले आणि मी माझ्या सवयीप्रमाणे त्या तृतीयपंथीकडे निरखून बघत होतो. ती जवळ आली आणि माझ्या शेजारी बसलेल्या मुलांना म्हणाली ए, काहीतरी दे ना. आई आणि काकू दोघी माझ्यापुढे उभ्या होत्या. तिने माझ्याकडे बघून एक छान स्मितहास्य केलं.**



# कविता

## बरसून जा

बरसून जा बेधुंद होऊनी
आज तुझ्या मना सारखे होऊदे...

साठले नयनी होते जे अश्रू जुने
आज नव्याने पुन्हा ते वाहुदे...

दबल्या होत्या काही जुन्या आठवणी
आज त्यांना नव्याने जाग येऊदे...

अडकला होता जो श्वास ह्रदयी
आज त्याला थोडं मोकळं होऊदे...

निसटून गेला जो हात हातातूनी
नव्याने सख्या तो पुन्हा धरुदे...

आभाळी ह्या मोकळ्या
पुन्हा नव्याने रंगवेडा इंद्रधनू उमटू दे...


**© सोमनाथ राजेंद्र बावणे**
साताऱ्याचे आहेत.
Bcom केले आहे आणि नोकरी करतात.
छंद : फोटोग्राफी व कविता.
**ईमेल** : bavanesuraj17@gmail.com




## मी असा का वागतो ?

बोलण्यासाठी खूप गोष्टी असतात मनात,
पण तरीही मी अबोलच का राहतो ?
व्यक्त करण्यासाठी भावना खूप आहेत ,
तरीही अव्यक्तच मी का राहतो ?
हे सर्व कळतं ,
तरीही मी असा का वागतो ?
खूप अपेक्षा आहेत माझ्या ,
पण सांगायला का घाबरतो ?
खूप काही करण्याची इच्छा असते ,
पण का ते लपवतो ?
हे सगळं कळतं ,
पण तरीही मी असा का वागतो ?
स्वप्नांना पंख फुटू लागले ,
तेंव्हा ते छाटून टाकतो ।
नव्या इच्छा-आकांक्षा उमलू लागल्या की ,
लगेच मोडुन टाकतो ।
कोणा सोबत तरी खूप उंच उडाव वाटतं ,
पण मध्येच खाली पडतो ।
हे सर्व कळतंय मला
मग तूच सांग, मी असा का वागतो ?
या सर्व गोष्टी करण्यासाठी,
देशील का तुझी साथ ?
या तुटलेल्या मनाचा ,
बनशील का मदतीचा हात ?
भरकटलेल्या या नावेला ,
हवा एक किनारा ;
आयुष्यभर सोबत राहून,
होशील का माझा सहारा ??


**© केतन राठोड**
**ईमेल** : ketanrathodengg@gmail.com

# तृतीयपंथीयांची जीवनशैली आणि कोव्हिड१९– एक धोक्याची घंटा

## लेख

**© डॉ. हेमलता पिसाळ**

**ईमेल** : hemal1762@gmail.com

**बरं यांची घरं ती किती मोठी, अनेकांसाठी फक्त एक खोलीच. अनेकांच्या या एका खोलीची एक भिंतच पक्की विटांची, तीही दुसऱ्याच्या खोलीची. त्याला धरूनच बाजूच्या भिंती, पत्र्याच्या किंवा लाकडी फळकुटांच्या उभारलेल्या. वरचं छप्परही अर्थात पत्र्याचं. खोलीच्या कोपऱ्यात आडोसा उभारून आंघोळीसाठी छोटीशी म्हणजे कसं बसं एक माणूस बसू शकेल एवढी उघडी मोरी.**

जानेवारी २०२० या नूतन वर्षाची सुरुवात झाली तेव्हा कुणालाच या नववर्षात आपल्या पुढे काय मांडून ठेवले आहे याची कल्पना नव्हती. चीनमध्ये या विषाणूने घातलेल्या भयंकर थैमानाच्या बातम्या येत होत्या तरी हा विषाणू आपल्या भूक्षेत्रात येऊन थडकेल आणि एवढा हैदोस घालेल असे त्यावेळी अनेकांच्या मनातही आले नव्हते. परंतु या विषाणूने अल्पावधीतच सर्व जगास वेठीस धरले. एकवीस दिवस लॉकडाऊन करून त्याला देशातून हद्दपार करण्याची आपण स्वप्न पहात असताना त्याने मात्र आपण केलेल्या प्रयत्नांना हुलकावण्या देत सर्व देश व्याप्त करून, आपल्या देशाला आघाडीवर नेऊन ठेवण्याची घोडदौड सुरू ठेवली आहे.

लॉकडाऊनचा उपयोग विषाणूचा प्रसार थांबवण्यापेक्षा थोपवण्यासाठी काही अंशी झाला आहे हे निश्चित. अनलॉक झाल्यावर मात्र लोकांची गमनशीलता जशी वाढली तसे एकमेकांच्या संपर्कात येणे सुद्धा वाढले. अशा वेळी अनलॉक नंतर दैनंदिन वृत्तपत्रातून करोनाची लागण झालेल्या लोकांची दिवसेंदिवस वाढती आकडेवारी व मृत्यूंच्या बातम्या वाचायला मिळणे अपेक्षितच होते. यातच एक दिवस मृतांच्या बातम्यात तृतीयपंथी व्यक्तीचा उल्लेख वाचायला मिळाला आणि या महामारीत तृतीयपंथी समाजावर काय परिस्थिती ओढवेल याचे चित्रच डोळ्यासमोर उभे राहिले.

झोपडपट्टी किंवा इतर दाटीवाटीच्या वस्त्यांमधून बहुसंख्येने राहाणारा, तृतीयपंथी समाज माझ्या नजरेसमोर येत होता. या विषाणूची मोठी झळ ही झोपडपट्टी आणि इतर दाटीवाटीच्या वसाहतीत राहणाऱ्या रहिवासींना पोहचणार हे तर पक्के होते. याचे कारण विषाणूच्या प्रादुर्भावास या वसाहतींमध्ये असणारं पोषक वातावरण. दाटीवाटीच्या घरांनी गुंफलेली या वसाहतींची रचना, त्यातच उपलब्ध जागेच्या व्यस्त प्रमाणात प्रत्येक घरातून राहणाऱ्यांची संख्या, काही वेळा तर दिवसा काम करणारी माणसं रात्री तर रात्रपाळी करणारी माणसं दिवसा इथं शिफ्ट मध्ये एकाच घराचा वापर करतात. त्यातच मोकळी हवा, सूर्यप्रकाश, ऐसपैस तर सोडाच पण पाय पसरून बसायला जागा मिळणे या गोष्टी दुरापास्तच. वस्तीच्या गल्ल्या म्हणजे, कशी तरी दोन माणसं चालू शकतील एवढी रुंद बोळकांडच,

सार्वजनिक संडास, घराबाहेरून वाहणाऱ्या उघडया सांडपाण्याच्या वाहिन्या असलेल्या या वस्त्यांमध्ये स्वच्छता ही दुरापास्तच.

मुंबई-पुण्यातील वस्त्या-वस्त्यांमध्ये थोड्याफार फरकाने हीच परिस्थिती असते पण काही ठिकाणी फारच विदारक चित्र पहायला मिळते. उदाहरणच द्यायचं झालं तर ग्रॅन्टरोडच्या अशाच एका ठिकाणच्या ऑफिसमध्ये जाताना जाव्या लागणाऱ्या संपूर्ण गल्लीमध्ये काळवंडलेला अंधार. त्यातच पाळलेल्या बकऱ्या आणि संपूर्ण वाटेवर पसरलेल्या त्यांच्या लेंड्यांची घाण, सगळीकडे ओल आणि घाण दर्प यांनी भरलेले असं ते बोळकांड. विशेष म्हणजे अशा अस्वच्छ ठिकाणीही बाकड्यावर एक वृद्ध लुडकला होता आणि त्याच्या भोवती कल्पना करवणार नाही इतक्या असंख्य माश्या घोंगावत होत्या. अशा परिस्थितीतही असंख्य लोक राहतात हे एक विदारक सत्य पहायला मिळालं होतं.

बरं यांची घरं ती किती मोठी, अनेकांसाठी फक्त एक खोलीच. अनेकांच्या या एका खोलीची एक भिंतच पक्की विटांची, तीही दुसऱ्याच्या खोलीची. त्याला धरूनच बाजूच्या भिंती पत्र्याच्या किंवा लाकडी फळकुटाच्या उभारलेल्या. वरचं छप्परही अर्थात पत्र्याचं. खोलीच्या कोपऱ्यात आडोसा उभारून आंघोळीसाठी छोटीशी म्हणजे कसं बसं एक माणूस बसू शकेल एवढी उघडी मोरी. अशा या खोलीमध्ये काही माणसं कशीतरी चिकटून झोपू शकतील एवढीच काय ती रिकामी जागा. बरं असंही नसतं की यांची घरं सामानाने भरगच्च भरलेली असतात. सामान ते काय असतं घरात? फक्त एक स्टोव्ह, एखादा पाण्याचा हंडा, खाण्या-शिजवण्यासाठी दोन-चार भांडी. नाही म्हणायला यांत्रिकी उपकरणांपैकी मिक्सर तेवढा उपलब्ध असतो. पक्क्या भिंतीवरच्या फळ्यांवर माणसाच्या गरजेच थोडंफार सामान, झालं एवढाच काय तो संसार असतो यांचा. अर्थात आर्थिक परिस्थितीच्या फरकाने थोडीफार वस्तूंच्या रूपातली सुबत्ता म्हणजे टीव्ही, पंखा, एखादं कपाटं, एखादा पलंग आणि एखाद्याच्या खोलीत आतूनच काढलेला पोटमाळाही पहायला मिळतो काहींच्या घरात. क्वचित काहींच्या टाइल्सच्या गिलावा दिलेल्या पक्कया भित्तींच्या खोल्याही असतात. श्रीमंतीत न मोडणारे तरीही उपलब्ध आर्थिक परिस्थितीतीतही विविध स्तर तृतीयपंथीयांच्यातही पहायला मिळतातच. असं असलं तरी घरामध्ये मोकळी जागा, उपलब्ध पाणी आणि सकस आहार याची वानवाच असते अशा वसाहतींमध्ये. असे असूनही प्राप्त बाह्य अस्वच्छ परिसरातही तृतीयपंथीयांची घर आतून मात्र चकाचक स्वच्छ पहायला मिळतात. तरीही करोना विषाणूच्या संसर्गापासून बचावासाठी शारीरिक अंतर, वारंवार हात स्वच्छ धुणे, घरातच स्वतःचे अलगीकरण करणे, व्यायाम, योग्य आहार या महत्त्वाच्या गोष्टींचे पालन करायला सांगणे म्हणजे अशा परिस्थितीत रहाणाऱ्या सर्वच लोकांची मस्करी करण्यासारखेच आहे. कारण या गोष्टींचे महत्त्व समजूनही त्याची अंमलबजावणी करण्यात अशा गजबजीच्या ठिकाणी राहणारे लोक परिस्थितीजन्य असमर्थ असतात.

लॉकडाऊनमुळे सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य अशा सर्वच स्तरावर एक विशिष्ट श्रीमंत वर्ग सोडला तर सर्वच स्तरावरील लोकांची हानी झालेली आहे. परंतु एकीकडे या विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी अशा वस्त्यांमधून राहणाऱ्या असंख्य रहिवाशांची व्यक्तिगत असलेली असमर्थता आणि दुसरीकडे लॉकडाऊनमुळे भरून न येणारे आर्थिक नुकसान आणि त्यामुळे होणाऱ्या हालअपेष्टा अशा दुहेरी कात्रीत येथे राहणारा समाज भरडला गेला. लॉकडाऊनचा निर्णय घेतल्यावर अशा वर्गाच्या पोटापाण्याची व्यवस्था सरकारी तसेच संस्था-संघटनांच्या पातळीवर काही प्रमाणात करण्यात आली. पण ते पुरेसं पडणारं नाही हेही खरं. त्यामुळे या टाळेबंदीमुळे सगळ्यात जास्त होरपळला गेला तो असंघटित क्षेत्रात किंवा रोजंदारीवर काम करणारा मजूर वर्ग

आणि त्यांचे कुटुंबीय. मात्र आपल्या समाजाचाच एक घटक असलेला हा तृतीयपंथी समाज हा असंघटित कामगार म्हणूनही ओळखला जात नाही. कारण नोकर म्हणून तो कुठेही काम करत नाही. यांना कोणी रोजंदारीवरचा मजूर म्हणूनही ओळखत नाही. असे असले तरीही त्यांची कमाई ही रोजंदारीपेक्षाही वेगळी नाही. कारण या समाजाचा अर्थार्जनाचा प्रमुख मार्ग म्हणजे भिक्षा मागणे ज्याला ते मंगती म्हणतात आणि लग्न, बाळाचे नामकरण, भूमिपूजन, दुकानांचे उद्‌घाटन अशा कार्यक्रमात नाच गाणे करून किंवा आशीर्वाद देऊन बिदागी मिळवणे. ही मंडळी दुकानं, बाजार, ट्रेन, रस्त्यावरील चौक येथे फिरून, टाळ्या वाजवून पैसे मिळवतात. अनेकांचा हाच दिनक्रम असतो. या रोजच्या कमाईतूनच त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था होते. म्हणजे एक प्रकारची रोजंदारीच की.

तृतीयपंथीयांचही पोट रोज कमावून आणलं तरच भरतं. पण सगळंच ठप्प असलेल्या सध्याच्या परिस्थितीत मंगतीतून होणारी रोजची कमाई आणि कधीतरी मिळणाऱ्या नाच–गाण्यांच्या कार्यक्रमातून मिळणारी बिदागीची चांगली रक्कम, सगळीच कमाई बंद झाली आहे. कारण कमाई करणारे सगळेच स्रोत बंद आहेत. गुरू चेल्याची परंपरा असलेल्या या समाजात कमावून आणलेल्या कमाईतील अर्धी कमाई ही गुरूकडे जाते आणि त्या उत्पन्नातून गुरू आपला तसेच आपल्या चेल्यांचा उदरनिर्वाह करत असतो. पण अनेक गुरूंची ही धनपूंजी तुटपुंजी असते. ती त्यांच्याकडे असणाऱ्या चेल्यांच्या संख्येवर आणि त्यांच्या कमाईच्या कौशल्यावर अवलंबून असते. जसे भारतातील १ टक्का लोकांकडे एकूण संपत्तीच्या ५८ टक्के संपत्ती साठलेली आहे तसेच या समाजातही हातावर मोजण्याइतक्या काही गुरूंची आर्थिक स्थिती उत्तम आहे पण प्रत्यक्षात ही त्यांची संपत्ती रोकड पेक्षा स्थावर स्वरूपात त्यातही दागदागिन्यांच्या स्वरूपातच जास्त असते. ज्याचा आजच्या घडीला पोटापाण्याची गरज भागवायला किती उपयोग होईल सांगता येणार नाही. तसंही असे गुरूही बोटावर मोजण्याइतकेच आहेत. प्रत्यक्षात अनेक तृतीयपंथीयांकडे बँकेचे खातंही नाही. मोठ्या प्रयत्नांनंतर काहींना आधार आणि रेशन कार्ड मिळालं आहे. तसेच कमाई करून आणणाऱ्या तृतीयपंथीयांवर अवलंबूत असणाऱ्या तृतीयपंथीयांची संख्याही मोठी आहे. त्यातच या समाजात कमाई करून आणणाऱ्याचे वय ३५–४०च्या वर नाही. त्यामुळे त्याच्यापुढील आयुर्मान असलेले तृतीयपंथी सर्वच बाबतीत कमाई करून आणणाऱ्या त्यांच्या चेल्यांवरच अवलंबून असतात. त्यामुळे आत्ताच्या या कठीण काळात यांच्या पोटापाण्याचे हाल तर झाले असणारच पण ज्यांना कायमची औषधे घ्यावी लागतात त्यांची सोय करणेही कठीण जात असेल.

करोनाचा संसर्ग आणि कोव्हिड–१९ मधील घातक धोके याबाबतीतही यांची जीवनशैली पूरकच आहे. तसं पाहिलं तर आत्ताच्या टाळेबंदीमध्ये, ४०च्या पुढील वयोगटातील तृतीयपंथीयांकरता घरात बसून राहणे काही नवीन नाही. कारण ही मंडळी घरातच बसून असतात. यांच्यासाठी घराबाहेर पडण्यासाठी समाजाने दिलेल्या २–३ दावतच्या कार्यक्रमांना हजेरी लावणे, कधीतरी परगावातील किंवा शहरातील एखाद्या गुरूभाईकडे काही दिवस जाऊन रहाणे किंवा कुणाचा मृत्यू झाला तर भेट देणे अशी थोडीच कारणं असतात. त्यामुळे तृतीयपंथीयांच्या या वर्गासाठी लॉकडाऊनमध्ये घरात बसून राहावे लागणे काही वेगळे नाही. पण यांच्यातील तरुण वर्ग मात्र कमाईसाठी किंवा समूहातील लोकांना भेटण्यासाठी घराबाहेरच जास्त. त्यांचं समूहातील लोकांबरोबर घरात २४ तास एकत्र राहणं हे आपल्यासारख्या कुटुंबातील व्यक्तींनी घरात एकत्र राहण्याइतकं सहज सोपं नाही. सामान्य कुटुंबातील लोकांच्या घरामध्येही आज कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना, मानसिक आरोग्य बिघडणे याचे प्रमाण वाढले आहे. संसर्गाच्या भीतिने किंवा आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेले वाचायला मिळत आहे. तर तृतीयपंथीयांवर काय बेतले असेल.

तृतीयपंथीय समाजाची गुरू-चेला परंपरा ही शिष्टाचाराने बांधलेली आहे. साधं इकडून तिकडे फिरताना चेल्याच्या साडीचा स्पर्शही गुरूला झाला तर तो गुरूचा अपमान ठरतो. बसल्या जागेवर हात धुण्यासाठी गुरूच्या जेवलेल्या हातावर पाणी ओतण्यापासून त्यांचे पाय दाबून देण्यापर्यंत गुरूंची सगळी सेवा करणे हा यांच्या शिष्टाचाराचा एक भाग. अशा अनेक कडक शिष्टाचाराच्या नियमांचे पालन झाले नाही तर दंड स्वरूपात कडक शिक्षाही. म्हणजे सांगायचंच झालं तर एकदा डायबेटीसमुळे पाय कापाव्या लागलेल्या गुरूची जगण्याची शक्यता संपल्यावर त्याला हॉस्पिटलमधून घरी घेऊन जाण्याची त्याच्या चेल्यांची तयारी नव्हती. कारण तोंडाला मास्क लावून सडलेल्या पायाच्या जखमांचे ड्रेसिंग करणे म्हणजे गुरूचा अपमान ठरला असता. रुग्णाला बाहेरगावाहून इतर गुरूही भेटायला येणार. या गुरूंचीही शिष्टाचारांचे पालन करून सेवा करावी लागणार. त्यामुळे एका छोट्याशा खोलीत दाटीवाटीत ५-६ जणं एकत्र राहणाऱ्या तृतीयपंथीयांसाठी एका रुग्ण असलेल्या ज्येष्ठ गुरूची सर्व शिष्टाचार पाळून सेवा करणे ही जिकिरीची गोष्ट होते आणि पाहुण्यांची बडदास्त ठेवणेही. या एका उदाहरणातून यांच्या शिष्टाचाराने भरलेल्या जीवनशैलीचा अंदाज आपल्याला बांधता येऊ शकतो.

त्यामुळे अशा एक नाही अनेक कारणांमुळे तरुण तृतीयपंथीयांसाठी घरात बसून राहणे म्हणजे एक मोठी परीक्षाच. त्यातच सामाजिक अस्विकृतीमुळे, जीवनातील अस्थिरतेमुळे, कुटुंबातील भावनिक दुराव्यामुळे आणि प्रेमाच्या ओलाव्याच्या कमतरतेमुळे नैराश्याचे, पर्यायाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याचे प्रमाणही या समाजातील तरुणांमध्ये जास्तच. त्यामुळे करोनाच्या या अतिसंवेदनशील काळात यांच्या मानसिक आरोग्याचाही कस लागला असणार.

तृतीयपंथी समाजाची जीवनशैली आणि शिष्टाचार, त्यांना करोना विषाणूचा संसर्ग झाल्यास कोव्हिड-१९ आजाराच्या अती जोखमीच्या गटात नेऊन ठेवते. कारण एखाद्या तृतीयपंथीला गुरू म्हणून दर्जा मिळाला की गुरूच्या वर्चस्वाचा पायंडा चालू ठेवण्यात त्यांच्या स्वतःच्या शारीरिक हालचाली मर्यादित होत जातात. बरं गुरू होण्यासाठी वयाचा निकष असा काही नाही. अगदी विशीतली व्यक्तीही गुरू होऊ शकते आणि चेल्यांची संख्या जशी वाढत जाते तसे गुरूचे वर्चस्व आणि त्याचमुळे शारीरिक निष्क्रियताही, कारण घरगुती सगळी कामं करायला चेले असतातच. मग थोडं वय झालं की कमाई करता घराबाहेर पडणंही हळूहळू बंद होतं आणि खोलीमध्ये बसून राहूनच यांचा दिवस व्यतीत होतो. त्यामुळे कमी वयातच वजन वाढायला लागते. त्यात स्त्री संप्रेरकांचे सेवन केले असेल तर वजन अवाढव्य वाढते म्हणजे वजनाचा काटा ८० ते १०० किंबहुना त्यापेक्षाही वरच. म्हणजे अत्यंत धोकादायक परिस्थिती. कारण कोव्हिड-१९चा आजारात सगळ्यात धोकादायक परिणाम लठ्ठ व्यक्तींवर जास्त होतो. आयुष्यातील ताण-तणावांचे प्रमाणही यांच्यात जास्तच. या सगळ्याची परिणीती डायबेटिस, ब्लड प्रेशर आणि हृदयरोग यामध्ये होते. डायबेटिस तर यांच्यामध्ये अगदी २४-२५ च्या वयात झालेलाही आढळून येतो. गुरू-चेल्यांच्या सात-आठ जणांच्या एका कुटुंबात ४-५जण डायबेटीसच्या व्याधीने ग्रस्त असतात. एकंदरच या आजारांचे प्रमाण या समाजात जास्तच आहे. जोडीला टीबी, एड्स, नैराश्य या आजारांचे आणि व्यसनाधीनता याचे प्रमाणही जास्त आहेच. व्यायाम या क्रियेला यांच्या जीवनशैलीत स्थानच नाही. त्यामुळे करोना विषाणूचे संक्रमण झाल्यास होणाऱ्या कोव्हिड-१९ या आजारात अती जोखमीच्या ५ टक्के लोकांमध्ये आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये तृतीयपंथीयांची संख्या जास्त निघाली तर कुणाला नवल वाटायला नको.

एकंदरच एकीकडे सर्व आर्थिक-सामाजिक व्यवस्था सुरळीत होईपर्यंत इतर रोजंदार किंवा मजुरांवर होणाऱ्या दुष्परिणामांसारखेच या समूहावरही खूप अनिष्ट परिणाम होणार आहेत. तर दुसरीकडे एका विशिष्ट

व्यवस्थेत जगणाऱ्या  या समूहाच्या लोकांना त्यांच्या जीवनशैलीमुळे करोनाच्या विषाणूंचा संसर्ग होण्याचा धोका तर जास्त दिसत आहेच आणि संसर्ग झालाच तर वर उल्लेखलेल्या लठ्ठपणा, डायबेटीस, ब्लड प्रेशर, हृदयविकार या व्याधींमुळे कोव्हिड-१९ च्या आजारात जीव गमावण्याचा धोकाही तितकाच जास्त. करोनाच्या प्रादुर्भावापासून बचाव करण्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या काळजीबद्दल गुरूंनी गांभिर्याने घेतले तर यांच्या शिष्टाचारांनुसारच त्याचे पालन तृतीयपंथीयांकडून गंभीरपणे केले जाईल. हाच एक आशेचा किरण, इथे वर्तवलेल्या करोना संक्रमण आणि कोव्हिड-१९ आजाराचा तृतीयपंथीयांवर होणाऱ्या विदारक आणि क्लेशदायक परिणामांना खोटे ठरवू शकेल हीच अपेक्षा ठेवू या.

# ‘स्पंदने ही समलिंगी’
## फेसबुकवरील खाजगी गट

**© निखील समर्थ**
**ईमेल** : nikhilsamarth123@gmail.com

स्पंदने हृदयाची. स्पंदने समलिंगी मनाची. स्पंदने आपल्या माणसांची. फेसबुकवर असलेला ‘स्पंदने ही समलिंगी’ एक असा ग्रुप जो खास समलिंगी व्यक्तींसाठी बनवला गेला आहे. समलिंगी व्यक्तींना आपले मन मोकळे करण्यासाठी, आपल्या समस्या सोडविण्यासाठी असलेले हे एक व्यासपीठ आहे. फक्त कथा कवितांपुरताच मर्यादित न राहता हा ग्रुप, वैविध्य आणि नाविन्यपूर्ण गोष्टींसाठी पुढाकार घेत आहे. सर्वांना आपलेपणा वाटावा ह्यासाठी नेहमीच स्पंदने ग्रुपचा प्रयत्न असतो. ग्रुपवर सदस्यांना आपले विचार मांडायला नेहमीच प्रोत्साहित केले जाते. ग्रुपकडून समलिंगी व्यक्तींना योग्य मार्गदर्शन मिळावे हा ग्रुपचा मूळ उद्देश आहे. समलिंगी व्यक्तींनी घाबरून न राहता निडर बनायला हवं. समलैंगिकतेची लाज न बाळगता, स्वतःच्या समलिंगी असण्याचा अभिमान बाळगून ताठ मानेन उभं राहायला हवे. ह्यासाठी कायमच ‘स्पंदने ही समलिंगी’ हा ग्रुप प्रयत्न करत आलेला आहे. ह्या ग्रुपवर मराठी भाषेलाच प्राधान्य दिले जाते. म्हणून सर्व साहित्य आणि लेख हे मराठीतच असावे ही ग्रुपची अट आहे.

‘स्पंदने ही समलिंगी’ ह्या ग्रुपचे नाव आधी ‘आपलं माणूस’ असे होते. तीन वर्षे आधी हा ग्रुप बनविला गेला होता. नावात साधेपणा आणि आपलेपणा ठेवला होता. पण ग्रुपला त्यामुळे काही समस्या उद्भवू लागल्या. अनेक स्ट्रेट लोक यात आवेदन करत होते. अगदी स्ट्रेट स्त्रियासुद्धा. त्यामुळे कधी कधी समलिंगी पोस्ट रिपोर्ट होण्याचा धोका निर्माण झाला होता. यावर उपाय म्हणून ॲडमीन पॅनेलने विचार केला, की ग्रुपचे नाव बदलावे. पण हा निर्णय फक्त ॲडमीन पॅनेलने न घेता लोकशाही पद्धत पोल घेऊन वापरावी असे ठरवले. त्यासाठी ग्रुपचे नाव बदलावे की नाही ह्यासाठी मतदान घेण्यात आले. जर उत्तर होय असेल तर समलिंगी किंवा तत्सम शब्द वापरून ग्रुपसाठी नाव त्याच पोलच्या कमेंट्समध्ये सुचविण्यास सांगितले गेले. बहुमताने सदस्यांनी नाव बदलावे असा कौल दिला. तसेच सदस्यांनी सुचविलेली नावे शॉर्टलिस्ट करून त्यावर अजून एक पोल घेऊन मतदान घेण्यात आले. जास्तीत जास्त सदस्यांनी ‘स्पंदने ही समलिंगी’ या नावाला पसंती दिली आणि मग ‘आपले माणूसचे’ नामकरण झाले ‘स्पंदने ही समलिंगी’

समलिंगी व्यक्ती आपल्या भावना, आपल्या समस्या इतर कुठे मोकळ्या करू शकत नाहीत. मित्रांना, भाऊ बहिणींना, आईवडिल आणि नातेवाईक ह्यांना कसं सांगणार, की त्याला काय वाटते? लोक, समाज काय म्हणेल ह्याची भीति

**लोक, समाज काय म्हणेल ह्याची भीती सतत असते. मग कधीकधी बरेच जण आपल्या भावनांना वाट करून देण्यासाठी चुकीच्या मार्गाला लागतात. कारण त्यांना योग्य असे मार्गदर्शन मिळत नाही. बऱ्याच समलिंगी व्यक्ती अन्याय, अपमान, फसवणूक आणि मानसिक छळ ह्याला बळी पडतात. ह्याविरूद्ध लढायला समलिंगी व्यक्तींना योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य स्पंदने ग्रुपवर केले जाते. काही मान्यवर आणि ग्रुप सदस्य ह्यांना ग्रुपवर बोलण्यासाठी लाईव्ह ऑडिओ कॉल सुरू केला आहे.**

सतत असते. मग कधीकधी बरेच जण आपल्या भावनांना वाट मिळविण्यासाठी चुकीच्या मार्गाला लागतात. कारण त्यांना योग्य असे मार्गदर्शन मिळत नाही. काही लोक त्यांच्या समलैंगिकतेचा गैरफायदा घेतात. ह्यामुळे बऱ्याच समलिंगी व्यक्ती अन्याय, अपमान, फसवणूक आणि मानसिक छळ ह्याला बळी पडतात. ह्याविरूद्ध लढायला समलिंगी व्यक्तींना योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य स्पंदने ग्रुपवर केले जाते.

काही मान्यवर आणि ग्रुप सदस्य ह्यांना ग्रुपवर बोलण्यासाठी लाईव्ह ऑडिओ कॉल सुरू केला आहे. समलिंगी समुदायाला समर्थन आणि समुपदेशन करणारे डॉ. नील वाघमारे यांचा सर्वप्रथम लाईव्ह ऑडिओ कॉल झाला. त्यानंतर दोन कॉल बिंदुमाधव खिरे सरांचे झाले. दोघांनी अतिशय छान प्रकारे सदस्यांना माहिती देऊन मार्गदर्शन केले. सुयोग्य व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले तर नक्कीच समलिंगी व्यक्तींना खास करून तरुण पिढीला एक योग्य दिशा मिळू शकते अणि ह्यासाठी ग्रुप कटिबद्ध आहे. ग्रुपवर कथा लिहिण्यास प्रोत्साहन मिळण्यासाठी कथा स्पर्धा आयोजित केली आहे. अनेकांनी समलैंगिकतेविषयी कथा लिहिल्या. काहीजण सुंदर कविता सादर करत असतात. समलिंगी साहित्याला एक छानसे व्यासपीठ फेसबुकवर मिळाले आहे.

साधारण २ वर्षांपूर्वी ग्रुपला काही वाईट अनुभव सुद्धा आले. ग्रुप विरुद्ध राजकारण करण्याचे कारस्थान रचले गेले होते. ईर्ष्या, द्वेष मनात ठेऊन ग्रुपला रिपोर्ट करणे सारखे प्रकार घडले. काहींनी तर ग्रुप ताब्यात घेऊन बाकी ग्रुप ॲडमिन्सला हटविण्याचे प्रयत्न केले. पण आम्हाला ते कारस्थान वेळीच लक्षात आले आणि त्यामुळे आम्ही तो धूर्त डाव हाणून पाडला. अशाने ग्रुपला काहीच फरक पडत नाही. ग्रुप सतत उत्तम कार्य करत आलेला आहे. असे प्रकार फेसबुकवर समलिंगी विश्वात घडावे हे हास्यास्पद आणि आश्चर्य वाटण्यासारखे आहे. ह्यातून एखादा रुपयासुद्धा मिळत नाही की नावलौकिक वाढत नाही. कारण बरेच जण खऱ्या नावाने फेसबुकवर वावरत नाहीत. आपले हक्क मिळावे, आपल्याला मनमोकळे बोलता यावे, भावना मांडता याव्या ह्यासाठी सर्व समलिंगींना फेसबुकवर एकत्र आणण्यासाठी स्पंदने हा ग्रुप आहे. काही जणांचे प्रश्न खूप खाजगी असतात, गंभीर असतात. अशांना मार्गदर्शन देण्यासाठी ग्रुपवर समुपदेशन केले जाते. समस्या काहीही असो, 'स्पंदने ही समलिंगी' हा गट प्रत्येक ॲडमिन सदस्यांना मदत करतो. मग तो प्रश्न शिक्षण, नोकरी अथवा प्रेमसंबंधात काही अडचण असेल तरी त्यावर समुपदेशन केले जाते.

हे कार्य फक्त फेसबुक पुरतच मर्यादित न ठेवता पुढे अनेक काही उपक्रम घेतले जाणार आहेत. HIV आणि गुप्तरोग सारख्या विषयांवर सुद्धा संपर्क साधून त्यापासून दूर कसे राहावे ह्याबद्दल सहकार्य केले जाणर आहे.

# ‘मुंबई प्राइड’ – दशा आणि दिशा

## लेख

**© सौरभ बोन्द्रे**
**ईमेल :** saurabhusbondre@gmail.com



**सौरभ बोन्द्रे**

**यावर्षी जानेवारी महिन्यात वातावरण मुळातच नागरिकत्व कायद्यामुळे तापलेलं होतं. त्यामुळे आमच्या ‘प्राइड’मध्ये हा विषय येण्याच्या आणि समाजविघातक वृत्तींनी प्राइडमध्ये काही गोंधळ किंवा हिंसा करण्याच्या भीतीने पोलिसांनी ऐन वेळेस ऑगस्ट क्रांती मैदान–नाना चौक परिसरात प्राइडच्या आयोजनाला स्पष्ट लेखी नकार दिला आणि जास्त सुरक्षित अश्या आझाद मैदानात प्राइड करण्याचा सल्ला दिला. शेवटी आम्हीही उपलब्ध पर्याय स्वीकारला आणि आझाद मैदानाच्या तयारीला लागलो.**

लेखक सौरभ बोन्द्रे एक बहुभाषिक प्रशिक्षक आहे व अनेक भारतीय व परदेशी भाषांमध्ये तो लिपितज्ज्ञ म्हणून काम करतो. वाचन , संगीत , जलतरण, इ. त्याचे छंद आहेत. सन २००८ पासून तो क्विअर चळवळीत सक्रिय असून, गेली सहा वर्षे क्विअर आज़ादी मुंबई द्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या ‘मुंबई प्राइड’ या वार्षिक अभिमान यात्रेच्या मुख्य आयोजकांपैकी तो एक आहे.

मुंबईच्या क्विअर समाजात एक अस्वस्थ आत्म्यांचा गट आहे. असे गट सार्वजनिक कामात जगभर सगळीकडेच असतात. पण मुंबईतील हा गट क्विअर असल्यामुळे त्याच्याकडे एक विशेष असं ‘व्हिक्टिम कार्ड’ म्हणजे ‘वंचित’ आयडेंटिटी (ओळख) आहे, जिचा वापर हा गट फक्त आणि फक्त स्वतःचं घोडं पुढं दामटण्यासाठी करतो. या गटाला क्विअर समुदायाच्या अडचणी तर अगदी नेमक्या माहीत आहेत. पण त्यांवर उपाय शोधण्याची बौद्धिक कुवत नाही आणि दुसऱ्या कुणी उपाय शोधला तर त्यात सहभागी होऊन हातभार लावायची वृत्तीही नाही. कहर म्हणजे त्यातून मिळणाऱ्या यशाचं श्रेय लाटण्याची धडपड मात्र सतत चालू असते. एक तर हा गट उपायांच्या अंमलबजावणीत खोडा तरी घालतो, किंवा उपाय सुचवणाऱ्याचं खच्चीकरण करून त्यांना बदनाम करणं, असले किडके उद्योग करतो. आणि अगदीच यातून काही साध्य न होता उपाय यशस्वी झालेच तर कोणत्याही हीन पातळीला जाऊन श्रेय मात्र स्वतःकडे घ्यायचे प्रयत्न करतो. तेही नाही जमलं तर सोशल मीडियावर उलट–सुलट चर्चा घडवून आणून चाललेल्या कामावर किंवा झालेल्या कामाच्या यशावर संशय निर्माण करतो. या सगळ्याचं एक तात्कालिक समाधान त्यांना मिळतं. पण एकंदरीत चळवळीला त्याचा काही फायदा होणारच नाही, किंबहुना, असल्या वृत्तीचा त्यांना स्वत:लाही भविष्यात काही फायदा होणार नाही, हेदेखील त्यांच्या लक्षात येत नाही. प्रत्येक गोष्टीबद्दल वांझोटा निषेध नोंदवणं, समूहाला नावं ठेवणं, प्रत्येक व्यवस्थेत दोष दाखवणं, पण त्यावरचा उपाय सांगू न शकणं, काही जबाबदारी दिल्यास ती पार न पाडणं, इत्यादी या गटाची विशेष लक्षणं आहेत. सामाजिक काम असल्याने आम्हा कार्यकर्त्यांना यांची तोंडे बघावीच लागतात.

जानेवारी–फेब्रुवारीत होणाऱ्या ‘मुंबई प्राइड’चं आयोजन साधारण आदल्या वर्षाच्या जून–जुलैपासून सुरू होतं. कार्यकर्त्यांच्या बैठका होतात. ही मंडळी बैठकांतच येऊन गोंधळ घालतात. यांतील बहुतांश लोक एक–दोन बैठकांत काहीतरी तत्त्वज्ञान भकून गायब होतात. काही जण अजून थोडे टिकतात.

त्यांच्यावर प्रत्यक्ष कामं/जबाबदारी सोपवली की मग पुन्हा तोंड दाखवत नाहीत. यांच्यामुळे फेब्रुवारी २०२० च्या 'मुंबई प्राइड'चं भवितव्य नियोजनापासूनच धोक्यात आलेलं होतं.

आमच्या एका बैठकीत 'ठाणे क्विअर कलेक्टिव' आणि 'टिस क्विअर कलेक्टिव' नावाच्या संगठनांची काही फारच 'जागृत' मंडळी हजर झाली आणि 'कॅम'ने (क्विअर आज़ादी मुंबई) आजतागायत क्विअर समुदयासाठी फारसं काही केलं नसल्याचा त्यांचा जुनाच राग आळवायला लागले. 'कॅम'मध्ये सगळेच उच्चवर्णीय हिंदू आहेत, किंवा तसे नसले तरी त्यांच्यात उच्चवर्णीयांचे संस्कार आहेत, त्यामुळे ते क्विअर दलितांसाठी आणि इतर धर्मियांसाठी काहीच करीत नाहीत, शिवाय ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी काहीच केलं नसल्याचीही गाणी गाऊन झाली. शिवाय सरकारने यावर्षी नागरिकत्व कायदा आणूनही कॅमने त्याविरुद्ध आवाज उठवलेला नसल्याने कॅम कशी नालायक आहे वगैरे तत्त्वज्ञान मांडून झालं. कॅमला या विषयांची जाणीव होतीच आणि यांतील क्विअर समाजाच्या जिव्हाळ्याचे मुद्दे मुळातच आमच्या अजेंड्यावर होते. पण लोकशाहीवर ठाम विश्वास असल्यामुळे आम्ही वाद न घालता दोन्ही कलेक्टिव्हांचा आदर राखला. ट्रान्सजेंडर अधिकारांच्या अन्यायकारक कायद्याविरुद्ध आंदोलन हा या वर्षीच्या प्राइडचा मुख्य मुद्दा राहील व नागरिकत्व कायद्याविषयीही मुद्दे असतील असा ठराव मंजूर झाला. यासाठी पत्रकं काढणे व इतर लिखाण करणे अशी जबाबदारी या दोन्ही कलेक्टिववाल्यांवर आरदपूर्वक सोपवली. शिवाय उर्वरित सर्व नियोजनातही त्यांचा 'सल्ला' घ्यायचं मान्य झालं.

बास्स ! या दोन्ही कलेक्टिवांचे मूळ हेतू साध्य झाले. 'मुंबई प्राइड'चं आणि पर्यायाने मुंबईतील २०-२५ वर्ष जुन्या क्विअर चळवळीचं नेतृत्व आता आपल्याकडेच आलं आणि आता आपण म्हणू तीच पूर्व दिशा असेल' असा एक समाधानाचा निःश्वास सोडून ही सगळी मंडळी त्यांच्या स्वभावानुसार झोपी गेली. त्यांनी ना पत्रक लिहिण्यात पुढाकार घेतला, ना जनजागृतीचे काही संदेश पाठवले, ना पोस्टर बनवण्यात काही सहभाग घेतला. चळवळीचं नेतृत्व मिळवायला नेमकं काय घासायला लागतं हेही माहीत नसलेल्या मंडळींकडून मुळातच आम्ही फारशा आशा बाळगल्या नव्हत्या. त्यामुळे आमच्या अपेक्षेनुसार ही मंडळी चक्क गायब झाली. आणि फेब्रुवारी २०२० च्या प्राइडची अख्खी धुरा पुन्हा आमच्याचकडे आली.

मुंबई पोलिसांकडून प्राइडसाठी परवानग्या मिळवणं ही मोठी एक-दीड महिन्याची लांबलचक आणि समक्षच अनुभवायला हवी अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जे प्रत्यक्ष भाग घेतात आणि स्थानिक पोलिस स्टेशनापासून ते अगदी उपायुक्तांपर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या प्रश्न आणि शंकांना जे तोंड देतात ते या चळवळीचे खरे शिपाईगडी असतात. त्या प्रक्रियेसाठी आमच्यासोबत येण्याकरता जेव्हा या कलेक्टिवांना विनंती केली तेव्हा तर ते निरनिराळी निमित्तं सांगून गायबच झाले.

यावर्षी जानेवारी महिन्यात वातावरण मुळातच नागरिकत्व कायद्यामुळे तापलेलं होतं. त्यामुळे आमच्या 'प्राइड'मध्ये हा विषय येण्याच्या आणि समाजविघातक वृत्तींनी प्राइडमध्ये काही गोंधळ किंवा हिंसा करण्याच्या भीतीने पोलिसांनी ऐन वेळेस ऑगस्ट क्रांती मैदान-नाना चौक परिसरात प्राइडच्या आयोजनला स्पष्ट लेखी नकार दिला आणि जास्त सुरक्षित अश्या आझाद मैदानात प्राइड करण्याचा सल्ला दिला. शेवटी आम्हीही उपलब्ध पर्याय स्वीकारला आणि आझाद मैदानाच्या तयारीला लागलो. शिवाय जामिया मिलियातील एका विद्यार्थ्यावर बंदुकीचा हल्ला झाल्यामुळे आम्ही ठरवलं की या वर्षीची प्राइड हा उत्सव नसून एक संवेदनादर्शक सभा असेल.

सी.एस.टी. स्टेशनासमोरील आझाद मैदानात मात्र सुरक्षेचे अनेक कडक नियम होते. मी व्यक्तिशः कायदेशीर हमीपत्र दिल्यावर आणि आणखी आठ आयोजक कार्यकर्त्यांची नावे, पत्ता, फोन नंबर देऊन त्यांच्या वतीने नियमांच्या अंमलबजावणीच्या अटी व शर्ती मान्य केल्यावरच ही परवानगी मिळाली. त्यामुळे प्राइडच्या आधीच आम्ही सर्व सोशल मीडियातून ते नियम प्रसिद्ध केले जेणेकरून येणारी कुणीही व्यक्ती कळत किंवा

नकळत नियमांचे उल्लंघन करू नये, या नियमांविरुद्ध वागू नये.

आणि त्याच वेळेला झोपी गेलेले जागे झाले. 'आपल्या कलेक्टिव अनुपस्थितीत इतकं सगळं घडलं आणि आपल्याला माहीतच पडलं नाही. 'मुंबई प्राइड'चे आयोजक पोलिसांसमोर आणि सरकारसमोर झुकलेच कसे? आम्ही असतो तर असं होऊच दिलं नसतं' वगैरे वल्गना करून मग या गटाने आम्हाला आगाऊपणे वॉट्स-ॲपवर सांगितलं की त्यांची कलेक्टिव आझाद मैदानाचे नियम मानत नाही आणि त्यांना हवं तसं ते वागतील.

या कलेक्टिवच्या काही मंडळींनी प्राइडच्या मंचावरून भाषण देण्याकरता रीतसर नावही नोंदवलं. शनिवारी, ०१ फेब्रुवारी २०२० ला, प्राइडच्या दिवशी ही मंडळी हजर झाली. आपणच काय ते समतावादी, न्यायवादी क्विअर असल्याच्या आविर्भावात ते वावरत होते. राजकीय पक्षाचे झेंडेही त्यांनी आणले होते.

ठाणे आणि टिस अशा दोन्ही कलेक्टिवांच्या सदस्या असलेल्या, सगळ्यांत जास्त थयथयाट करणाऱ्या एका पात्राने मात्र केवळ आयोजकच नव्हे तर एकंदरच 'मुंबई प्राइड'च्या प्रतिष्ठेला बट्टा लावायचा उद्योग केला. त्या कार्यक्रमा आधी मी जर त्यांना ओळखत असतो तर मुळातच त्यांना सतर्कतेने वागण्याचा सल्ला नक्की दिला असता. तर या उच्चभ्रू पार्श्वभूमी असलेल्या महोदयांचे अत्यंत उच्चभ्रू अश्या शाळेत त्यांचे शिक्षण झालेले असून 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' या प्रतिष्ठित विद्यालयात सध्या अंडरग्रॅजुएट शिक्षण घेत आहेत. 'आज स्टेज मीच गाजवणार' असा यांचा तोरा होता. मग त्या स्टेजवर गेल्या आणि भाषणही दिलं. पण तेवढ्यावर समाधान न झाल्याने, काही वेळानं त्यांनी पुन्हा भाषणाची संधी मागितली. दोन-अडीच तासांच्या कार्यक्रमात अक्षरशः २६-२७ वक्ते असल्यामुळे अर्थातच त्यांना दुसरी संधी सादर नाकारली गेली. मग त्यांनी सांगितलं की त्यांना काही घोषणा द्यायच्यात. क्विअर समाजाबद्दलच्या घोषणा आहेत का? असं विचारल्यावर त्या हो म्हणाल्या व त्यांनी प्रेक्षकांतूनच घोषणा सुरू केल्या. दुर्दैवाने तिथे भरपूर गजबजाट असल्यामुळे त्यांच्या घोषणा मंचापर्यंत स्पष्ट ऐकूच येईनात. म्हणून शेवटी काही मिनिटांनी आयोजकांनी त्यांना आवरतं घ्यायला सांगितलं. हळू-हळू त्यांनी आवरून घेतलं आणि उर्वरित कार्यक्रम ठीक झाला.

पण समारोपाच्या वेळेस त्यांनी पुन्हा गोंधळ घातला. आम्हा आयोजकांचं असं ठरलं होतं की क्विअर व्यक्तींच्या ज्येष्ठ वयाच्या पालकांचा एक 'स्वीकार' नावाचा जो समूह आहे त्यांना मंचावर बोलवायचं आणि त्यांच्याकरवी समारोप करायचा. तर कलेक्टिवाच्या त्याच महोदया मंचावर उपस्थित झाल्या, त्यांनी ज्येष्ठ पालकांना सुनवलं की कार्यक्रमाचा समारोप त्याच करतील आणि आमच्याकडून माइकही आपल्या हातात घेतला. या वेळेस मात्र मी त्या महोदयांना सांगितलं की कार्यक्रमाचा समारोप हा ठरल्याप्रमाणे भारताच्या संविधानाची प्रस्तावना वाचण्यानेच होईल, अन्य काही चालणार नाही. या तथाकथित आंबेडकरवादी महोदयांना ती प्रस्तावना माहीत नव्हती. मग शेवटी पालकांपैकी एकांनी समजुतीची भूमिका घेतली, आणि एका कागदावर ती प्रस्तावना लिहून त्या महोदयांच्या हाती दिली आणि त्यांनी ती कशी-बशी वाचली.

कार्यक्रम संपला. आयोजकांनी पोलिसांच्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. पोलिसांनीही उत्तम नियोजनाबद्दल कौतुक केलं. शिवाय इतक्या संख्येने क्विअर व्यक्ती मोकळेपणे वावरत असल्याचं समाधानही व्यक्त केलं. मी बाहेर पडलो, बाहेरच जेवलो आणि घरी जाऊन झोपलो. पण सोशल मीडियावर मध्यरात्री आग लागली, जिची झळ मी रविवारी सकाळी उठल्यावर माझ्यापर्यंत पोहोचली. या महोदयांचा एक व्हिडियो व्हायरल झाला होता, ज्यात त्या आसामच्या शारजील इमामला समर्थन देणारी घोषणा देत होत्या आणि त्यांचे साथीदार त्यांना उत्तेजन देत होते.

मला तेव्हा लक्षात आलं की ही कलेक्टिवं निव्वळ नियमभंग करणारीच नव्हे तर नतद्रष्टपणे कायदेभंग आणि शांतताभंग करणारीही आहेत. कॅमच्या अनेक कार्यकर्त्यांना पत्रकारांचे फोन आले. मी आयुष्यात पहिल्यांदा

सकाळी पावणे अकरा ते दुपारी सव्वा चार पत्रकारांचे फोन घेत होतो आणि या सगळ्या प्रकाराबद्दल मीही किती अनभिज्ञ आहे ते मूर्खासारखा पटवून देत होतो. घडल्या प्रकाराला मी कारणीभूत जरी नसलो तरी कार्यक्रमाचा मुख्य संयोजक होतो आणि म्हणून जबाबदारी माझीच होती. शेवटी या अनाहूत कलेक्टिवाने दिलेल्या घोषणांचा आम्ही निषेध करतो आणि त्या आमच्या परवानगीने दिलेल्या नव्हत्या असे एक अधिकृत पत्रक कॅमने प्रसिद्ध केलं.

याची तक्रार पोलिसांपर्यंत गेली होती. पोलिसांनी मला चौकशीला बोलावले. मी आणि काही कार्यकर्ते रविवारी संध्याकाळी चौकशीला गेलो. आमचे जबाब नोंदवले गेले. आमच्यापैकी कुणीही त्या महोदयांना व्यक्तिशः ओळखत नव्हतो. त्यामुळे तेव्हा तरी 'व्हिडियोत अज्ञात इसम घोषणा देताना दिसत आहे' अश्या स्वरूपाचा आमचा प्रतिसाद होता.

प्राइडचा कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही पोलिसांचे आभार मानायला गेलो होतो. तेव्हाच, समारोपाचं जे भजं झालं, ज्येष्ठ नागरिक असलेल्या पालकांचा जो अपमान झाला, त्यावरून आमच्या अनुभवी कार्यकर्त्यांनी या महोदयांना खडसावलं, ते त्यांना आवडलं नाही आणि त्यांनी उद्धट उत्तरं दिली.

पल्लव पाटणकर नावाचा आमचा एक कार्यकर्ता गेली वीस वर्षे क्विअर समाजात काम करतोय. विशेषत: मुंबईतील क्विअर व्यक्तींना मदत करण्याकरता अनेक संस्था उभ्या करण्यात त्यानं सहभाग घेतला आहे. त्यामुळे तो या प्रकराने व्यथित झालेला होता. स्वत:च्या क्विअर मुलामुलींचा स्वीकार करणाऱ्या आणि त्यांना व त्यांच्या इतर क्विअर मित्रमैत्रिणींना मानसिक आधार देणाऱ्या वयस्कर पालकांचा कॅमच्या मंचावर सन्मान होण्याऐवजी त्यांना त्याच मंचावर कुणा तिऱ्हाईताने अपमानास्पद वागणूक द्यावी यामुळे पल्लव मनातून चिडलेला होता. त्यांनं लगेचच रविवारी पहाटे एक इमेल लिहिली, ज्यात त्यांनं या वागण्याचा निषेध नोंदवला.

घोषणा देणाऱ्या महोदयाचं नाव पोलीस तपासात कसं पुढं आलं माहीत नाही. पण महोदया मोबाइल स्विच ऑफ करून घरातून पळून गेल्या. पोलीसांच्या म्हणण्यानुसार त्यांनी महोदयांपर्यंत असा संदेश पाठवण्याचा प्रयत्न केला, की त्या जर जबाब देण्यासाठी पोलीस स्टेशनात हजर झाल्या तर प्रकरण सहज संपेल. पण महोदयांपुढे आल्याच नाहीत आणि संपर्कही होऊ शकला नाही. शेवटी देशविराधी घोषणांबद्दल पोलीसांनी नाईलाजाने शासनातर्फे महोदया आणि त्यांच्या अनेक साथीदारांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवला. पुढील तपासात पल्लव पाटणकरांनी लिहीलेली ती इमेलही पुढे आली. त्यांनंतर महोदयांचा गट आणि त्यांच्या समर्थकांनी सोशल मिडियावर असा कांगावा सुरू केला की पल्लव पाटणकरांमुळेच त्यांची ओळख पटली आणि गुन्हा नोंदवला गेला. हे सपशेल खोटं आहे. कारण घोषणा देणाऱ्या महोदयांनी पूर्वीही काही निदर्शने वगैरे केली होती आणि पोलीसात त्याची आधीच नोंद होती. त्यामुळे कॅम मधील कुणाच्या सांगण्यावरून त्यांची ओळख पटली वगैरे बनाव रचून पुन्हा त्याच त्या खोट्या कथा पसरवण्याचा उद्योग ही कलेक्टिवं आणि त्यांचे समर्थक करत आहेत आणि अर्थातच बहुतेक ठिकणी सत्य समोर आलं की तोंडघशी पडत आहेत.

पोलीस तपास सुरू झाल्यापासून मी आमच्या बहुतेक कार्यकर्त्यांसोबत जबाब नोंदवण्यासाठी पोलीस स्टेशनला किमान सात आठ फेऱ्या मारल्यात. आम्ही खटल्यात गुंतलेलो नाही. पण साक्ष म्हणून जबाब नोंदवण्यासाठी जावेच लागते. शिवाय कायद्याचे काम आहे त्यामुळे वैयक्तिक काम बाजूला ठेऊन जावे लागते. कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे असला एकंदर प्रकार आहे हा.

यातील बहुतेक प्रकाराची कोणतीही नेमकी खबर नसलेल्या भारतातील आणि भारताबाहेरील अनेक वाचाळवीरांनी सोशल मिडियात बरीच राळ उठवली. तथाकथीत डाव्या विचारसरणीचे लोक कॅममधील आमच्यासारख्या मध्यममार्गी कार्यकर्त्यांच्या नावाने अशी बोंब मारतायत की आमच्यामुळे एक गरीब बिच्चारी

विद्यार्थिनी राष्ट्रद्रोहाच्या खटल्यात अडकली. म्हणजे आमच्या अपरोक्ष तिने केलेली चूक राहिली बाजूला आणि आम्हीं मात्र समाजाच्या बिनबुडाच्या आरोपांचे नाहक धनी झालो. उजव्या विचारसरणीचे लोक आमच्यावर असा आरोप करतायत की आमच्या मवाळ धोरणामुळे डाव्या विचारांच्या लोकांचे फावते आणि त्यांना हे असले उद्योग करायला वाव मिळतो. त्या घोषणा जेव्हा चालू होत्या तेव्हाच्या तेव्हाच आम्हाला येऊन खबरदार करण्याऐवजी शांतपणे त्याचा व्हिडिओ घेऊन तो मध्यरात्री सोशल मिडियावर व्हायरल करणारी व्यक्ती ही याच उजव्या गटातील एक होती याबद्दल मात्र ते सोयिस्कर मूग गिळून गप्प बसतात.

मार्चअखेर कोरोनाचे संकट बळावले आणि ही सगळी धूळ खाली बसू लागली. पण अस्वस्थ आत्मेच ते, शांत कसे राहणार! इमेल लिहिल्याबद्दल पल्लव पाटणकरला अद्दल घडवायचे त्यांचे मनसुबे चालू होते. जगभर प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मुंबईच्या ‘कशिश चित्रपट उत्सवा’च्या पदाधिकाऱ्यांपैकी एक पल्लव पाटणकर होता. तर कशिशच्या आडून त्यांनी पल्लववर निशाणा साधला. या प्रकारात पुढे काय झालं ते सगळ्यांनाच माहीत आहे.

या सगळ्याचा आम्हाला मनस्ताप झालाच. ‘मुंबई प्राइड’सारख्या सामाजिक कार्यात हे असले उद्योग करून दुसऱ्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या गटाला यामुळे काही फायदा झाला का? तर नाहीच. उलट विनाकारण कोर्ट कचेरी वगैरे उपद्व्याप मागे लागले. शैक्षणिक नुकसान झालं. भवितव्य, करिअर, सामाजिक प्रतिमा अशी सगळ्याचीच वाट त्यांनी स्वकर्माने लावून घेतली. अजूनही त्यांना वाटलं असेल की त्यांनी खूप मोठं काहीतरी संपादित केलंय. पण प्रत्यक्षात अपकीर्तिखेरीज त्यांच्या पदरात काही पडणार नाही. आता तरी त्यांनी आत्मपरिक्षण करावं आणि आपलं वर्तन सुधारावं नाहीतर जे लोक त्यांची तळी उचलून धरत होते तेच उद्या संकटकाळी त्यांना वेदना भोगायला लावतील हे मात्र नक्की.

प्रामाणिक कार्यकर्त्यांनाही यातून एक धडा मिळाला की आपण निव्वळ काम करून भागत नसतं. तर आजूबाजूला काय घडतंय, कोण काय करतंय यावरही लक्ष पाहिजे. माणसं ओळखणंही महत्वाचं आहे. नाहीतर फार मोठे अनर्थ घडू शकतात. हे संकट ही एक इष्टापत्ती होय. यातून आम्ही शिकलो, शहाणे झालो आणि भविष्यात आणखी खबरदारीने काम करू शकलो तर हा सगळा त्रास आणि आमचे कष्ट सार्थकी लागले म्हणायचं.

एक महत्वाची आणि भविष्यात चळवळीला कायमच त्रासदायक ठरेल अशी गोष्ट म्हणजे पोलीसांचं व प्रशासनाचं या चळवळीबद्दल जे एकंदर अत्यंत सकारात्मक मत होतं, आपल्या मानवी हक्कांसाठी प्रामाणिकपणे लढणारा समुदाय असं जे ते कौतुकाने वारंवार म्हणत होते त्याला आता थोडातरी बट्टा लागलाय. आततायीपणे अनावश्यक उद्योग करून चळवळीला बदनाम करण्याचा एक घातक डाव हे तथाकथित डावे उजवे मिळून खेळले आणि त्यात प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते आणि पर्यायाने सर्वसामान्य क्विअर व्यक्ती भरडले गेले. आता इथून पुढे कुठल्याही सार्वजनिक कार्यक्रमासाठी परवानगी मागण्यासाठी कॅमचे कार्यकर्ते अभिमानाने मान उंच ठेवून पोलीसांत किंवा एखाद्या वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्याकडे जाऊ शकतील का हा प्रश्न आहे. तरीही जातील तेव्हा शरमेने मान खाली घालून या प्रकाराची स्पष्टीकरणं द्यावी लागतील.

चळवळीतल्या कार्यकर्त्यांसाठी ही वेळ सर्वच बाजूंनी निरीक्षण आणि आत्मपरिक्षण करण्याची आहे. चळवळीची आत्ताची दशा आणि भविष्यातील दिशा ठरवण्याकरता सखोल चिंतन करायची गरज आहे. जो कोणी हे लक्षात घेईल आणि काळाची पावले ओळखून दक्षपणे वागेल तोच काम पुढे नेईल आणि त्याच्याच प्रयत्नांना यश मिळेल हे नक्की.

# कोवीड१९ च्या लॉकडाऊनच्या काळात समलिंगी व तृतीयपंथी यांना बिंदू क्विअर राइट्स फाऊंडशेन व समपथिक ट्रस्टने राशनसाठी केलेली मदत

ही मदत करण्यास साद प्रतिष्ठान (पुणे), युतक ग्रुप (PCMC), राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (पुणे, कर्वेनगर व उत्तमनगर शाखा), अभिमान ग्रुप (कोल्हापूर), LGBT ग्रुप (औरंगाबाद), निरामय आरोग्य धाम (सोलापूर) यांचे मोलाचे सहकार्य व मदत लाभली. देणगीदारांनीही सढळ हाताने मदत केली. पुणे व PCMC त स्वयंसेवक अमोल शिंदे, पायल खळदे व मिलिंद पळसकर यांनी राशन वाटप केले. या सर्वांचे मनापासून आभार.

**राशन वाटप / राशनसाठी आर्थिक मदत**

| ठिकाण | तृतीयपंथी | समलिंगी/ उभयलिंगी व्यक्ती |
|---|---|---|
| पुणे | २३५ | २७ |
| पी.सी.एम.सी. | १०३ | ०९ |
| कोल्हापूर | ११ | ०२ |
| सोलापूर | २५ | ११ |
| नाशिक | १० | ०० |
| इतर | ०० | ०७ |
| एकूण = ४४० | ३८४ | ५६ |



अमोल शिंदे



पायल खळदे




मिलिंद पळसकर

## **प्रतिक्रिया :** समलिंगी, तृतीयपंथी पात्र असलेल्या जाहिराती

**टिपणी :** कोणत्याही पदार्थाचे अथवा वस्तूचे प्रमोशन करण्याचा या सदराचा उद्देश नाही.

**जाहिरात (१) नॉर सूप** (Knorr soup)




Youtube Link :https://www.youtube.com/watch?v=C20SmW662UQ

ही जाहिरात मी TV वर पाहिली होती. करण जोहर आणि अशमी गुलाटी (मॉडेलचे नाव (वर चित्रत झालेली ही नॉर सूप (Knorr soup) ची जाहिरात खूप गाजली. मला ही जाहिरात आवडली कारण सूज्ञ प्रेक्षकाला करण जोहरच्या भावमुद्रेमुळे त्याच्या मनात असलेले पुरुषाचे आकर्षण लगेच कळून येते. आजपर्यंत TV वरील जाहिरातीत समलिंगी लोकांच्या भावना ठळकपणे समोर आल्या नाहीत. पण ही जाहिरात लोकांनी स्वीकारली.

सूप्रसाद बारपांडे

---

**जाहिरात (२) प्रेगा न्यूज** (Prega News)




Youtube Link :https://www.youtube.com/watch?v=LTGAJX2_J4M

प्रेगा न्यूजची स्टोरी मनाला खूप भावली. ही जाहिरात मी TV वर पाहिली होती. मुलगा आणि मुलगी ह्यांत कसलाच भेदभाव नसावा हा खूप छान मेसेज यातून दिला आहे. बघता क्षणी डोळ्यातून पाणी यावं इतकी हृदयस्पर्शी आहे ही जाहिरात. या जाहिरातीत तृतीयपंथी व्यक्तिरेखा छान दाखवली आहे.

सूरज पाटील सातारकर

---

**जाहिरात (३) रेड लेबल चहा** (Red Lable Tea)



Youtube Link :https://www.youtube.com/watch?v=qYwmoiCUZPE

ही जाहिरात मी TV वर पाहिली होती. आपल्या मनात तृतीयपंथी टाळी वाजवून पैसे मागणार अशीच असते. परंतु ह्या जाहिरातीत तृतीयपंथी, पावसात प्रेमाने आजींना चहा देते व आजींनी पैसे देऊ केल्यावर ती नको म्हणते. आजी तिला आशीर्वाद देतात. तृतीयपंथीयांना सुध्दा मायेची व माणुसकीची गरज असते हे दाखवले आहे.

सूप्रसाद बारपांडे



१०० %
नैसर्गिक
धागा

BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION